भाव-भेट

काव्य
२९३६

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २९३६

REFBK-0004713
REFBK-0004713

मनोहर

९८३२

०/१०२१
२१३६

[redacted]
ता. 22/7/33



# प्रस्तुत लेखकाची वाङ्मयसेवा

## काव्य

काव्यकौमुदी ( एम्. ए. टेक्स्ट, मुंबई १९२९-३० ) २-८-०
धवलागिरी ( निवडक कविता ) ०-३-०
छत्रपति ( खंडकाव्य ) ०-३-०
मुशाफर, ( ,, )
महाराष्ट्र, ( ,, )

## कादंबरी

शांतियुग ( सरकारजमा ) [illegible]

## नाट्य

देशसेवा ( गद्य ) १-०-०

## निबंध

वाग्वैजयंतीचे टीकाकार ( महाराष्ट्रसाहित्य )
केशवसुतांचा संप्रदाय ( लोकमान्य )
टिळकांची कविता ( काव्यचर्चा )
गाथासप्तशती ( डेक्कन कॉलेज मासिक )
कवितेची उपयुक्तता ( विविधज्ञानविस्तार )
नीति आणि कला ( साहित्यसंमेलन )

## लघुकथा

विमा एजंट ( यशवंत, खास अंक )
प्रणयवंचना ( उद्यान )

## परीक्षणें

मोत्यांची माळ ( मनोरंजन )
मेजवानी ( यशवंत )
महाराष्ट्रशारदा-वेणुनाद ( लोकमान्य )
अहिल्योद्धार ( मनोरंजन )
हिंदी मासिकांची प्रगति ( रत्नाकर )
संघपद्धति ( प्रो. एम्. एस्. गोडबोले, पुणें )

## विविध लेख

भद्रायु, प्राविण्य वगैरेंत.

# भाव-भेट

मनोहर

REFBK-0004713

क्र. नं. ४८३

दु. क्र. ४७९३

१९३२] [किंमत १-४

प्रकाशक : गोपाळ गंगाधर पोतदार,
एम्. ए., एल्. टी.
४० सदाशिव, सातारा.

मुद्रक : रघुनाथ वासुदेव परांजपे,
"आर्यसंस्कृति-मुद्रणालय,"
टिळकरस्ता, १९८ । १७, पुणे.

# ओझरती ओळख

'मनोहरां'ची ओळख मराठी कवितेच्या वाचकांना करून देण्याची आवश्यकता नाहीं. आज अनेक वर्षे त्यांची स्फुट कविता निरनिराळया स्थळीं प्रसिद्ध होत आलेली आहे. त्याशिवाय कविता-संग्रहाचे संपादक, काव्यविषयक टीकाकार व कादंबरीकार म्हणूनही त्यांचें नांव परिचित आहेच. त्यांच्या एका कादंबरीला सरकारी अवकृपेला बळी पडण्याचें भाग्यही लाभलेलें आहे. तेव्हां 'मनोहरां' ची भावभेट म्हणजे आपल्या घरोब्याच्याच माणसाची फार दिवसांनीं झालेली पुनर्भेट आहे.

'मनोहर' माझे मित्र आहेत. त्यामुळें त्यांच्या भावनाशील स्वभावाचा मला चांगलाच परिचय आहे. त्यांचें मन अत्यंत हळवें व संस्कारक्षम आहे. भोंवतालच्या परिस्थितीचा त्यांच्या मनोवृत्ती-वर तात्काळ परिणाम होतो; व ते त्या परिस्थितीशीं पूर्ण तादात्म्य पावतात. कोठल्याही एकाद्या ध्येयाची जखडबंदी त्यांच्या कल्पनेला सोसवत नाहीं. त्यामुळें, व्यावहारिक जीवनामध्यें त्यांना जी 'तिर-स्थळी' घडलेली आहे तिचेंच प्रतिबिंब त्यांच्या कवितेंत यथार्थ उमटलेलें आहे. माहुलीच्या रामेश्वर घाटावर सद्गुरुस्तवनांत ते जितके रंगतात तितकेंच अड्यारच्या 'ब्रह्मविद्येच्या नगरींत' दंग झालेले आढळतात. 'प्रेमाच्या दारुण लीला' त्यांना जितक्या रड-वितात तितकेंच जुलमी सत्तेखालीं 'जड झालेलें जीवित' त्यांच्या डोळयांत अश्रू आणतें. प्रीतीच्या बाजारांतला सौदा जीवाचें मोल देऊन विकत घेण्यापर्यंत कधीं त्यांची मजल जाते तर कधीं पश्चात्तप्त

अंतःकरणानें ते मातेच्या पावलावर अश्रू ढाळीत बसतात. शृंगाराचे नाजुक विलास रंगविण्यांत ते कधीं बेहोष होतात, तर कधीं हातांत एकतारी घेऊन 'आतां धांव नारायणा!' अशी अभंगमय आळवणी करण्याची त्यांना उपरति होते. वीर दिसला कीं ते त्याला वंदन करतात. अन्याय पाहिला—मग तो राजकीय असो कीं सामाजिक किंवा धार्मिक असो—ते चिडून उठतात! त्यांच्या 'मुशाफरा' प्रमाणेंच त्यांच्या कवितेची लांबी प्रेमनिराश गोविंदाग्रजापासून तों राष्ट्रीय वृत्तीच्या बाणेदार नारायणराव बेहेऱ्यापर्यंत आहे.

सुरवातीची भाषेची कृत्रिमता सुटली. प्रेमनिराशेची छाया ओसरली. सांसारिक असमाधानाच्या अस्वस्थतेची रुखरुख हटली. आतां, समाधानाची, शांततेची व आत्मप्रत्ययाची कळी खुललेली दिसत आहे. यांतच 'मनोहरां' च्या काव्यशक्तीचें वैभव प्रगट होणारें आहे. 'सती', 'बंदी', 'भालतिलक', 'विधुराचें लग्न', 'दुर्दैव', 'विरहगीत', 'वीरवंदन' हीं भावगीतें 'मनोहरां'च्या काव्यवैशिष्ट्याचीं उत्कृष्ट उदाहरणें म्हणून देतां येतील. मराठी कवितेला हीच त्यांची मोलाची भावभेट आहे, असें मी समजतों.

स्थळकाळाची मर्यादा संभाळून माझ्यासारख्या त्यांच्या गुणग्राही मित्राला देखील यापेक्षां अधिक लिहितां येणें शक्य नाहीं!—आणि तसें पाहिलें तर याची तरी काय जरूरी होती!— पण!

१५ डिसेंबर १९३२.

प्रल्हाद केशव अत्रे.

d1181
२१३६

# निवेदन

कवींच्या मनांत उसळणाऱ्या भावना काव्याच्या स्वरूपांत अवतीर्ण होतात व त्या कविता कवींचें समाधान करितात व त्याच्या आनंदाला कारणीभूत होतात. ओठांच्या आंत घट्ट दाबून ठेविलेला दुःखप्रवाह नेत्रांतून अश्रूंच्या रूपानें बाहेर पडतो व मनाचें दुःख हलकें होतें. हृदयांत उचंबळणाऱ्या आनंदाच्या लाटा हास्याच्या द्वारें बाहेर पडतात. भावनाप्रधान अंतःकरणांत कोंडून राहिलेली सुख-दुःखाची, आशानिराशेची, उत्कंठाऔदासीन्याची कोणतीही भावना विविध मार्गांनीं बाहेर पडते व चितार्‍याचें मनोहर चित्र, गायकाची गोड लकेर, कवींचें सरस भावगीत जगांत पाऊल टाकतें. कलावंतांचा हा विलास फक्त जगाच्या आनंदासाठींच अवतीर्ण होतो. काव्यापासून तत्त्वज्ञानाची अपेक्षा करणें म्हणजे मोटारींतून हवेंत उडण्याचाच प्रकार होईल! विनोदी व आनंददायी चित्रपटांना जेवढी तुफान गर्दी जमते तिच्या एक शतांशही गर्दी शैक्षणिक रूक्ष चित्रपटांना होत नाहीं. मधुर कंठांतून निघणाऱ्या गोड भावगीतांवर रसिकांच्या उड्या पडतील पण वेदांतांतील मायाब्रह्माची चर्चा करणाऱ्या गीतापंचदशीकडे कांहीं बुद्रुक श्रोत्यांखेरीज कोणीही वळणार सुद्धां नाहीं. नर्तिकांच्या नयनांचा नाच पाहण्यासाठीं रसिकांच्या झुंडी जीवाचेंही मोल देतील पण पायांत चाळ बांधून देवाच्या नांवावर पोट भरणाऱ्या हरिदासांच्या भजनाला नीरस वृद्धांशिवाय दुसरें कोण जाणार?

काव्य आणि तत्त्वज्ञान यांचे प्रांत अगदीं निरनिराळे आहेत. काव्याचें ध्येय आनंदप्राप्ति तर तत्त्वज्ञानाचा शेवट परब्रह्मदर्शनांत. काव्याची नजर ऐहिक सुखांवर तर तत्त्वज्ञानाचा पल्ला पारलौकिक सुखसमाधीपर्यंत! काव्याच्या प्रांतांत तरुणतरुणींची गर्दी तर तत्त्वज्ञानमंदिरांत फक्त अधिकारी वृद्धांचाच संचार! काव्य हसवील तर तत्त्वज्ञान सुखवील. म्हणून काव्यामध्यें तत्त्वज्ञान हुडकणें म्हणजे कोमल तंतुवाद्यांत कठोर तबल्याचे बोल काढणेंच होय.

काव्याला अमुकच विषय घ्यावा हा आग्रह म्हणजे वधूनें वराच्या पायावरच सतत नजर ठेवावी असें म्हणणें होय. जी भावना कवीला रंगवून सोडील तीच तो कवितेंत ग्रथित करील, इतर भाडोत्री विषयांवरील नीरस ठरतील. कवीनें राष्ट्रीय विषयांवरच काव्यें लिहावीं, प्रेमविषयक कविता लिहूं नयेत असा आरोप जुन्या पिढींतले टीकाकार कधीं कधीं करतात. पण हा उपदेश अनाठायीं आहे. चितार्‍यानें सुंदर ललनांना चित्रित न करितां फक्त वीररसोत्पादक भीषण चित्रांनाच जन्म द्यावा असें म्हणणें कितीसें सयुक्तिक होईल? गायकानें मधुर भावगीतें न आळवितां फक्त उत्साहवर्धक राष्ट्रीय पोवाडेच म्हटले पाहिजेत असा दण्डक प्रसिद्ध झाला तर पुढील शिरगणतींत गवयांची पैदास कमी झालेली खास दिसून येईल. ज्याला ज्या रास्त गोष्टींत आनंदप्राप्ति होत असेल ती त्यानें मनमुराद करावी.

कलावंतांचा कलाविलास जगाला आनंद देतो, पण केव्हां? त्याला निष्कारण बंधनें नसतील तर. कवीनें कोणत्या विषयावर कविता करावी हें त्याच्या मनःस्थितीवर अवलंबून राहील. आयुष्याच्या मार्गावर विविध काव्यविषय पसरलेले असतात. ज्याला जे पटतात ते तो रंगवितो.

प्रि. २०६३

कवितेचा विलास विशेषतः तारुण्यांत ज्यास्त दिसतो असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. आयुष्यांतील अत्यंत उमेदीचा काळ, ऐन कर्तबगारीचा प्रसंग आणि भावनोत्कटतेची वेळ तारुण्यांतच असते. संसारसुखाच्या तोंडओळखीचा प्रसंग कोण विसरेल? त्या वेळीं शृंगारदेवी नटलेली असते, आशेला बहार येतो, सुखाच्या लाटा उसळत असतात, महत्त्वाकांक्षेचा वारा सोंसाट्यानें वहात असतो. अशा कालांत मनांत जी भावना प्रबळ असते तीच काव्यांत ग्रथित होते; म्हणून आधुनिक काव्यांत प्रेमगीतांची लयलूट झाली आहे. जुन्या कवितांत प्रेमगीतें पुष्कळ आहेत पण त्यांना भक्तिरसाचीं पुटें दिलीं आहेत. 'राधाकृष्ण' 'शुकरंभा' या नांवामागें दडून जुन्या कवींनीं आपली श्रृंगाराची हौस भागविली आहे. आधुनिक कवी बेडर असल्यानें ते या बुरख्याचा आडपडदा न ठेवतां मनांत आलेले बोल जनांत उधळून देतात. प्रेमभावना ही मानवी मनांत नेहमींच प्रबळ असते, तेव्हां ती काव्यांत प्रामुख्यानें चमकल्यास तो दोष नाही. पण मनुष्यस्वभावच असा आहे, कीं, खरें असेल तें लपवायाचें व खोटें पुढें करावयाचें. वस्तुतः प्रेमविषयक कविता कोणाला आवडत नाहींत? सर्वांना आवडतात. पण आजचे वृद्ध शिष्ट आपलें तारुण्य विसरून जाऊन तरुणांच्या कृतीवर 'अश्लील' असा शेरा मारतात. ओलेतीच्या वादाच्या मुळाशीं हीच भावना आहे. अश्लील चित्रें पाहून कोणी अनीतिमान बनत नाहीं किंवा प्रेमळ कविता वाचून कोणाची नीति बिघडत नाहीं. कला व नीति यांची विनाकारण सांगड घालण्यांत कांहीं फायदा नाहीं. या शृंगारराजानें मानवी मनावर आरंभापासून सुलतानी गाजविली आहे व ती शेवटपर्यंत अशीच गाजणार. फक्त या

प्रेमरसाचें अविष्करण योग्य मर्यादेंत व्हावें याबद्दल दुमत होईल असें वाटत नाहीं. उत्तान शृंगार शिष्टसंमत नाहीं तरी तो संस्कृत नाटकांतून व काव्यांतून असलेला चालतो पण त्याची कोठें छटा मराठी कवितेंत दिसली कीं, झाली अश्लीलपणाची सीमा! या दृष्टीनें प्रस्तुत लेखकाचें 'मुशाफर' हें खंडकाव्य आणि इतर प्रेम-गीतें वाचलीं तर शिष्टाचाराचें उल्लंघन करितात कीं काय हें टीकाकारांनीं ठरवावें.

आयुष्याच्या विवक्षित भागांतच कवीकडून अभिजात काव्याची निर्मिति होते ही गोष्ट बऱ्याच कवींच्या बाबतींत दिसून येते. १९०७–१५ पर्यंतच गोविंदाग्रजांनीं सुंदर कविता लिहिल्या; पुढें त्यांच्या प्रतिभेला नाट्यलेखनांत वाव मिळाला. रोज एकतरी कविता लिहिल्याशिवाय निजावयाचेंच नाहीं असा ज्यांचा नियम असेल त्यांची गोष्ट निराळी. पण पुष्कळसे कवी काव्योद्रेकाच्या विवक्षित काळानंतर पुढें मूक बनतात. हे कवि 'बी', तांबे, माधव ज्यूलियन इत्यादिकांच्या उदाहरणांवरून दिसून येईल. याचा अर्थ असा नाहीं कीं, त्यांची वाङ्मयसेवा बंद पडते. फक्त त्यांची स्फूर्ति नाट्य, विनोद, कादंबरी इत्यादि विविध मार्गांनीं अवतीर्ण होते.

प्रस्तुत लेखकाचा काव्यांतील दर्जा टीकाकारांनीं ठरवावयाचा आहे. पण १९१८–२५ पर्यंत झालेल्या लिखाणानंतर पुढें जवळ जवळ विराम पडला आहे असें वाटतें.

आधुनिक कवींची तरफदारी करतांना त्यांच्या दोषांकडे डोळे-झांक करण्याचा पक्षपात होऊं नये याबद्दल कोणीही समंजस लेखक दक्ष राहील. आधुनिक कवींत प्रामुख्यानें दिसणारी बाब म्हणजे काव्यप्रकाशनाचा उतावळेपणा व प्रसिद्धीबद्दल घिसाडघाई. मा

कै. १०८३



कांची बेसुमार वाढ झाल्यानें वाटेल त्या भल्याबुऱ्या कवितेला प्रकाशन मिळणें ही गोष्ट सुकर असल्यामुळें हल्लीं प्रसिद्ध होणाऱ्या कविता पुष्कळशा वाचनीय नसतात, या आक्षेपांत पुष्कळ तथ्य आहे हें विसरून चालणार नाहीं. या बाबतींत कविसंमेलनासारख्या जबाबदार संस्थांनीं नियंत्रण घातलें तर गचाळ कवितांच्या बेसुमार प्रकाशनास बराच आळा पडेल अशी आशा करावयास जागा आहे.

प्रस्तुत लेखकाचा बराचसा काळ मुशाफरींत गेला आहे त्यामुळें भावभेटींत विरहगीतांचें वैपुल्य आडळून येईल. व प्रकाशनाच्या वेळींही लेखक आग्र्याच्या ताजमहालाजवळ भटकत असल्यामुळें मुद्रणदोषांबद्दल रसिकांनीं क्षमा करावी.

विविध मासिकांत व काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या माझ्या कविता एकत्र करून त्या मुद्रणालयांत पोचविण्याचें श्रेय माझ्या रसिक व प्रेमळ सहधर्मचारिणीलाच दिलें पाहिजे.

भावभेटीनें रसिकांना थोडीतरी आनंदप्राप्ति झाली तरी प्रकाशनाचें चीज झालें असें मी समजेन. टीकाकारांचे घाव न सोसण्याइतकें माझें हृदय भावनाप्रधान राहिलें नसल्यामुळें त्यांच्याकडून होणारी संभावना मी आनंदानें ग्रहण करीन.

सातारा
विजयादशमी, शके १८५५

विनीत
मनोहर

# अनुक्रमणिका


| कविता | वृत्त | प्रकाशनस्थल | स्थान |
|---|---|---|---|
| कृष्णधाम | शार्दूल-विक्रीडित | ... | १ |
| अभिवादन | चंद्रकांत | काव्यरत्नावलि | १ |
| श्रीरामदर्शन | अक्रूर | ... | ३ |
| अभंग | अभंग | ... | ४ |
| धांवा | उद्धव | ... | ६ |
| श्रीचरणपादुका | भूपतिवैभव | ... | ८ |
| श्रीसद्गुरुचरणांची स्मृति | अक्रूर | ... | १० |
| गुरुमाउली | फुलवेल | ... | ११ |
| जयलक्ष्मीचा धिःकार | चंद्रकांत | ... | १२ |
| गुरुपादुका | भूपति वैभव | ... | १५ |
| स्वार्थी जग | उद्धव | राजारामीयन् | १५ |
| बालमुकुन्द | स्वर्गङ्गा | कवनगुच्छ | १७ |
| विनंति | केशवकरणी | ... | १८ |
| आशास्वप्न | सुनीत | काव्यरत्नावलि | १९ |
| तुंबळसागर | मणिबंध | कवनगुच्छ | १९ |
| नैराश्याचे निःश्वास | चंद्रकांत | कवनगुच्छ | २० |
| आमचें ध्येयही एक | उद्धव | तरुणभारत | २१ |
| पंचप्राणांची पूर्णाहुति | चंद्रकांत | विविधकाव्यमाला | २३ |
| मेलेलें प्रेम | कोकिळा | कवनगुच्छ | २४ |
| लोकमान्यनिधन | दिंडी | धवलगिरी | २५ |
| फुलांची ओंजळ | चंद्रकांत | कवनगुच्छ | २६ |
| वंचना | सुनीत | मनोरंजन | २६ |
| तालाचा बेताल | स्वर्गङ्गा | कवनगुच्छ | २७ |
| सौंदर्याचें वेड | गझल | ... | २८ |
| काव्यकुंजकारास | दिंडी | ज्ञानप्रकाश | २९ |
| मुळशी | आनंदकंद | ... | ३० |

| कविता | वृत्त | प्रकाशनस्थल | पान |
|---|---|---|---|
| आली कां माझी आई ? | उद्धव | विविधज्ञानविस्तार | ३१ |
| अभंग | अभंग | ... | ३४ |
| वसुधावस्त्रहरण | स्वर्गङ्गा | काव्यरत्नावलि | ३४ |
| संसाराचा खेळखंडोबा | " | " | ३५ |
| अभागी | चंद्रकांत | महाराष्ट्र-साहित्य | ३६ |
| इशारा | मणिबंध | काव्य कौमुदी | ३७ |
| आम्ही कोण ? | सुनीत | काव्यकौमुदी | ४० |
| दरिद्री गर्विष्ठास | स्वर्गङ्गा | ... | ४० |
| महाराष्ट्र देश | चंद्रकांत | काव्यरत्नावलि | ४१ |
| मायदेश | अश्वधाटी | गोविंदाग्रजमंडळ | ५३ |
| छत्रपति | पोवाडा | दादर | ५३ |
| सारंगीवाला | मनमोहन | ... | ६४ |
| माता कीं कांता | स्वर्गंगा | काव्य-कौमुदी | ६५ |
| पूर्वी आणि आतां | ... | काव्य-रत्नावलि | ६६ |
| विनंति | भूपतिवैभव | ... | ६७ |
| सांत्वन | चंद्रकांत | ... | ६८ |
| रांगोळी पुसलेली पाहून | शार्दूलविक्रीडित | वेणुनाद | ६८ |
| जीवनास | स्वर्गंगा | काव्यरत्नावलि | ६९ |
| अंतरपाट | अंजनी | ... | ७० |
| लग्नसोहळा | " | ... | ७१ |
| विरहगीत | चंद्रकांत | काव्यरत्नावलि | ७१ |
| नजरभेट | वसंत | वेणुनाद | ७३ |
| दुर्दैव | आनंदकंद | महाराष्ट्र-साहित्य | ७४ |
| धांवा | घुंगुरवाळा | काव्य-रत्नावलि | ७५ |
| जड जीवित | भूपतिवैभव | ... | ७६ |
| विनंति | पांडव | लोकमान्य(खास अंक) | ७७ |
| वीर-वंदन | सुनीत | काव्य-कौमुदी | ७८ |
| पृच्छा | ... | लोकमान्य | ७८ |

| कविता | वृत्त | प्रकाशन स्थल | पान |
|---|---|---|---|
| यशोगिरीस | ... | धवलगिरी | ७९ |
| मुशाफर | स्वर्गंगा | काव्यरत्नावलि | ८० |
| भेट | पाण्डव | ... | १०२ |
| गोविंदाग्रजास | स्वर्गंगा | काव्यरत्नावलि | १०३ |
| प्रेमगड | दिंडी | धवलगिरी | १०४ |
| विनवणी | पद | ... | १०५ |
| वीर-वंदन | शूर्पणखा | महाराष्ट्र शारदा | १०६ |
| ,, | परवशता | डे.कॉ.त्रैमासिक | १०७ |
| विरह-गीत | ओवी | महाराष्ट्र शारदा | १०८ |
| कर्तव्यपथ | सुनीत | ... | ११० |
| वंदन | ... | ... | ११० |
| आवाहन | संग्राम | धर्मजागृति | १११ |
| विरहगीत | ... | ... | ११२ |
| ओढणी | ... | ... | ११४ |
| विधुराचें लग्न | | | ११५ |
| वीरवंदन | | | ११६ |
| अभंग | | | ११७ |
| सती | | | १२० |
| बंदी | | | १२१ |
| हुतात्मा | | | १२२ |
| मदिरा | | | १२३ |
| शुद्धि संघटन | | | १२३ |
| धर्ममार्तंड | | | १२४ |
| वीरवंदन | | | १२४ |
| भालतिलक | | | १२५ |
| दिग्विजययात्रा | अभिसारिका | | १२६ |
| टीकाकारांस— | | | १२८ |

प्रेमळ सहधर्मचारिणीस

## रसिकांस—

तुला, रसिका, वाहिली भाव-भेट,
भाव-भक्तीची उघडुनिया पेठ.
विविधवृत्तींची बांधुनिया मोट,
तुला देवो ही भेट सुख अवीट.
मूक प्रोत्साहन तुझें, रसिकराया,
सहानुभूतीचा शब्द तशी माया,
आणि कुतुकें जो दाविसी जिव्हाळा,
कसा होऊं उतराइ मी दयाळा !
मुदें आली जी भावना मनांत,
तिचा उठला पडसाद गायनांत;
तुला आवडली भेट, भाग्य माझें,
नको स्तुतिचें मजवरी लादुं ओझें !

१९३२, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 8693
ठाणे

# भाव-भेट

## कृष्णधाम

साकेताधिप-दास-वास गिरि हा नामें जरंडेश्वर,
वाहे पादतलास सह्यतनया वेण्णाहि चेतोहर.
यांचे संगमिं क्षेत्र माहुलि, जिथें तो घाट रामेश्वर
तेथें रूप धरोनि दृश्य बसतो श्रीकृष्ण योगेश्वर!
वस्त्रें धूत, तनूहि सावळि, जटा माथां, पदीं पादुका,
भक्तासाठिं धरोनि मानवि तनू दावी जना कौतुका.
भक्ता माय जसा, कराल यमसा दुष्टांसि, जो वाटला,
श्रीमत्सद्गुरु कृष्ण नम्र कविनें कृष्णातिरीं वंदिला. २

१९१४, रामेश्वरघाट, माहुली.

---

## अभिवादन

तारा सुमनें गेलिं उडोनी भू-कुसुमें फुलली
क्षितिजावरती मांगल्याला बालरवी उधळी
तारुण्याच्या, बाल्याच्या त्या रम्य तटावरती
होतों, नव्हती पुण्याची वा पापाची महती!
तटिनितटावर बसुनि करावें तटिनि-गान श्रवण!
अवलोकावें बालरवीकृत—प्रमुदित—सुम—वदन.

मंदानिल सुमकेलि बघावी निर्मल, निष्काम
गिरिशिखरावरि विहगासंगें गावें प्रभु – नाम.
आयुष्याच्या मौजेचे ते दिन ऐसे जाता
भाग्यकाल मम समीप तेव्हां होता हो पुरता.
परमेशाचें दर्शन झालें, देहपांग फिटले
चिर शांतीनें, चिर सौख्यानें ठाणें मनिं दिधलें.
सह्यागिरीगत पावन सलिला तटिनितटावरती
परमेशाची मूर्ति मनोहर दिसे तदा पुढती
रेखिव बांधा, मोहक काया, तनू कृष्ण–गौर
लोळत होता मानेवरती सान जटाभार.
वैराग्याचें तेज झळाळे वदनीं तेजस्वी
षड्रिपु ज्यातें थरारती बहु ऐसा ओजस्वी.
कटिं पीतांबर, पदीं पादुका, कुबडी हस्तांत
वनसुमनांची माला शोभे सुरुचिर कंठांत.
धावतील सुर वंदायाला ज्या चरणा वेगें
त्या चरणांना 'अभिवादन' मीं केलें अनुरागें।
आनंदाची सीमा झाली, दुःख होय चूर!
नयनांतोनी प्रेमाश्रूला आला झणिं पूर.
हंसली कृष्णा, बालरवीही हंसला गगनांत,
गुरुकृपेची लाट हांसरी हंसवी मच्चित्त!

१९१४, रामेश्वरघाट, माहुली.

---

# श्रीरामदर्शन

[ चालः—अक्रूर ]

मज वाटे कीं भाग्योदय मम झाला,
ये पूर्व पुण्य फलतेला.
श्रीरामाचें, जानकि-प्राणपतीचें,
विश्वाच्या आनंदाचें,
मज दीना दर्शन घडलें,
चरणाम्बुजिं मन हें जडलें,
तो जगताचा प्राण दृष्टिला दिसला
दिनमणि कीं दिसला कमलां.
दो नयनीं कीं इंदुरवी जडवीलें,
तें तेज पाहुनी गमलें,
मस्तकीं मुकुट रत्नांचा,
शिर पेंच शोभतो वरचा,
ते केशांचे गुच्छ अहा भुरभुरती
वायूसह क्रीडा करिती.
मृदु कर्णांत लुटलुटताती डूल,
पाहतां पडे मज भूल.
आकर्ण चारु हें नयन,
मृदु हास्ययुक्त हें वदन,
वन सुमनांची माला कंठीं रुळतें,
शर पंक्ती स्कंधीं डुलतें.
मृदु हस्तांत आयु धारण केलें,

अरि जेणें जर्जर झालें,
पीतांबर शोभे कटिला,
पद लाजविती कमलाला,
ती वामांकीं स्थित हो सीताबाई
जगताची केवळ आई.

१९१४, रामेश्वरघाट, माहुली.

---

## अभंग

गेह पवनांचें, निधान सौख्याचें, माहेर शांतीचें, गुरुरूप
गुरु रुप येतां हृदय कासारीं, मोदाच्या लहरी उठताती.
उठताती दोष, पळती विकल्प, सद्गुरु नायक सेवितांची,
सेवितां श्री सद्गुरु चरण प्रेमानें, स्वर्लोकीचें जीर्ण, तुच्छ वाटे।
तुच्छ वाटे तेव्हां कामाचा तो चाळा, मन घेई आळा भजनाचा.
भजनाचा आळा जन्म मृत्यू नाहीं, होती दिशा दाही गुरुमय.
गुरुमय होता संसाराची चिंता, षड्रिपुचा गोता फोल होई.
फोल होई जन्म गुरु कृपेवीण, दुःखासी कारण संसारची.
संसाराची नदी दुस्तर विशाल, सद्गुरु कृपाळ तोषवावा.
तोषवावा भावें जगाचा नायक, विश्वाचा पालक गुरुदेव.
गुरुदेव ध्यावा सद्भावें आपुला, भेद सद्गुरुला नाहीं कोठें.
नाहीं कोठें भिन्न जल घटांतील तैसें अब्धींतील एक रूप.
एक रूप गुरु नाम वेव न्यारे, मायेचें पसारे गुरुलीला !
गुरुलीला गावी सदा सर्व काळ, विनवी गोपाळ, कृष्णदास.

१९१४, रामेश्वर घाट.

कष्टला हा जीव, वृत्ति भांबावली, आठवण केली गुरुराया,
गुरुराया मज तुज वीण कोण, कष्टासी कारण आप्त मित्र.
मित्र हे गांजिती, सोयरे छळिती, सुखाची हो माती क्षणोक्षणीं.
क्षणोक्षणीं त्रास, मन हो उदास, शांततेची आस तुजपाशीं.
तुजपाशी जीव माझा हा गुंतला, तुझा ध्यास मला अहोरात्र.
अहोरात्र गातो, प्रेमें तूझे गूण, स्वद्रूप सगूण दावी आतां.
दावी कैसे वागूं दुःखद संसारीं, असे मूढ जरी तरी तूझा.
तुझा मी बालक, तूं माझा रक्षक, आनंददायक तूझें ध्यान.
तूझें ध्यान राहो माझे हृदयांत, त्वन्नाम मूखांत सर्वकाळ.
सर्वकाळ जरी मज अल्प त्रास, देई सूख रास तूझी स्मृति !
तुझी स्मृती मनीं, तूझें रूप ध्यानीं, दुःखाची जांचणी मुळीं नाहीं,
मुळीं नाहीं दुःख सद्गुरु भक्ताला, गोपाळास आला अनुभव.

१९१४, सातारा

३

भाग्य माझें फळा आलें, गुरुचरण दिसलें,
लक्ष सर्वही वेधलें, प्रेमें आपुलेसे केलें.
चंचलता सर्व नेली, चित्तीं शांतता ठेविली,
द्रव्य, दारा, पायाखालीं संसृतीला तुडवीली
गुरुराज, कृष्णनाथा, गोपाळाचा पदीं माथा.

१९१४, सातारा.

४

गुरुराज, दास बहुत पातकी, मूढ, अविवेकी, परी तूझा,
बालक मी सान, मज नाहीं ज्ञान, नित्य नेम ध्यान कांहीं नेणें,
तुझीये भेटीची आस धरियेली, सद्गुरु माऊली भेट देई.

आरंभीले तप करोनी निश्चय, राहो ध्यानींमनीं मूर्ति तूझी.
निश्चय मी केला शेवटासी न्यावा, बाळ उपेक्षावा ब्रीद नोहे.
नासोनी टाकावा दुःखद संसार, सर्वही असार वाटो मज.
निश्चय करोनी बैसला गोपाळ, रूप तें प्रेमळ राहो मनीं.
१९१५, पुणें.

५

रात्रंदिन मना कान्तेचाची ध्यास, मन हें उदास तुझे ठायीं,
नाहीं संध्या, ध्यान, जप, योग याग, वाटे व्हावा योग कान्ते संगे,
कामाची वासना, भक्तीची हेळणा, ज्ञानाच्या वल्गना व्यर्थ जीणें,
दोष कळो येती, रोष अनावर, घोष भक्ति फार, लोभ पोटीं,
समर्था, दयाळा, ऐसा मूढ दास, तारी तारी यास दीनानाथा.

## धांवा

गुरुमाय, धांव झणिं आतां, जिव माझा दमुनि गेला,
तुजवीण वाटतें शून्य, शून्यचि हा संसृति डोला!
हृदयांत शांतता नाहीं, लागली आग सौख्याला!
कांहीं न सुचे चित्ताला, आळवुं किती वेळों वेळां?
हंसुं बघुनि कुणाला माई?
पदीं पडूं कुणाच्या आई?
रडूं कोठें ठेवुनि डोई?
तुजविण ना थारा मजला जिव० ॥
चौऱ्याशि लक्ष योनीच्या जलयंत्रीं आत्मा बसला,
भरपाई झालि पुण्याची, फिरतां नर देह मिळाला.
पूर्व भाग्य उदयां आले, गुरुवरा लाभ तव झाला.
मत्प्राण जाय जरि निघुनी सोडणार नाहीं तुजला.

पडलों तव चरणा जवळीं,
तूं तार मार माउली,
मम चिंता तुजला सगळी,

म्हणवी मी तुझा गे मजला  जिव० ॥
पूर्व पुण्य उदका वरती  तनु नलिनी उदया आली !
चित्ताम्बुज विकसित झालें  षड्रिपु भृंग उडि पडली !
अज्ञान शर्वरी होती  नाचत त्या कमला जवळीं !
रिपु-मधुप प्रीतिला भुलली  अरविंद पाकळी मिटली !

मन सुमीं धूमाकुळ झाला !
अरि भृंग गांजिती कमला !
कमलाचा जिव बहु दमला !

गुरु मित्रा ये उदयाला-  जिव० ॥
भवगिरी चढाया सजलों  वाटाड्या एक मिळाला,
अविचार तयाचें नांव,  सन्मार्ग दूर बहु झाला,
मोहाचें सर दावीलें,  भुलवूनी नेलें मजला.

लोभाची लाट हि आली,
हा बुडलों मत्सर चिखलीं,
हाय हाय चाललों खालीं,

दे हात नाविका मजला  जिव० ॥
तिन्हीं युगीं तारुनी भक्ता  गुरुराया कीं श्रमलासी ?
ध्रुव बाळ पुन्हां एकाकीं  वनिं जाय तिथें गेलासी ?
कीं भक्तराज बलिराजा  पूजित तो बसला तुजसी ?
रविराय होउनी व्योमीं  तळ मळ कीं अमुची बघसी ?

तुज पोट-भरी पाहूं दे,
मनसोक्त तुला गाऊं दे,
चिरकाल पदीं राहूं दे,
ना ध्यास दुजा गोपाळा जिव० ॥

---

## श्रीचरणपादुका

तोडोनि संसृती बंध बसावें जेव्हां
श्री ध्यान कराया दिसति पादुका तेव्हां.
पादुका नव्हे ह्या सत्य त्रिदिव – सोपान !
भव – कर्दम – रत मनुजा जो मुळि सोपान !
कीं संसृति – गर्ता – दर्शक – दीपक – ह्याच.
दाविती प्रकाशा त्यजण्या खळगे खांच
कीं भवार्णवीं जो जीव निमज्जित झाला
या तरी स्वरूपें येती तारायाला ?
कीं करवाली ह्या श्रीभक्तां उद्धरिती
मारुनी षड्रिपू जेव्हां दासा छळिती
स्मरुनियां होतसे शांत – मन्मन,
ना दुजा विषय चित्तांत – गुरुविण,
आपाप येती वदनांत – गुरुगुण,
कधिं जाईन, पाहिन. गुरुचरणा स्थिती होई
गुरु स्वरूप नाचे हृदयीं ठायीं ठायीं.
गुरु-चरण-पादुका स्मरुनी वेडा होतो,
त्यावीण दुजा मग छंद न मुळि मनिं घेतों.

नेत्राश्रु जलानें गुरुचरणां न्हाणीतों.
सत्कर्मांच्या सित वसनें त्यांना पुशितों.
मग ज्ञान चंदनें मंडित करि गुरु-चरणां,
त्यावरीं अर्पितों काव्य सुमांनां नाना.
अज्ञान कर्पुरा ज्ञान-ज्योति लावोनी,
ती ओवाळी मी धन्य धन्य जन्मोनीं !
गुरु-चरणांचीं ती गानें गातां गातां,
मी वेडा होतों, वेडी हो मम कविता !

हें गोड वेड नित् लागो – मन्मना,
हें असेंच जगतां सांगो – गुरुगुणा,
दुर्गूण, कुबुद्धी भागो – क्षणक्षणां,

हें वेडच माझें जगां वेड लावील !
श्री चरण सुधाब्धी मधें पूर्ण बुडवील.
श्री चरण पादुका प्रेमळ आमुची माय,
तव कृपा साउली खालिं उणें हों काय ?
गुरु चरण पादुका स्थलावरुनी ज्या गेल्या
त्या स्थळीं लोळतां कुडया वासना मेल्या !
ती पुनित जाहली भूमि जेथ गुरुचरण,
किती सुभाग्य त्यांचे उद्धरितीं पाषाण !
गुरुचरण संग, गुरुवदनामृत नितश्रवण,
गुरुपदाम्बुजाची सेवा, दर्शन, ध्यान,
या गोष्टि जयाला लाधे त्याला नमन,
तें सत्य सत्य हा भवगिरि जाई चढुन.

बाकीचे आले गेले — कितितरी,
संसारिं गुंग जे झाले — बहुपरी,
गुरफटुनी माया जालें — अंतरीं,
परमेश — गेह पथ दुर्लभ ज्याला झाला
तो फुकाच जन्मा आला आणि गेला.

१९१५, पुणें.

---

## श्री सद्गुरुचरणांची स्मृति

गुरु चरणांची सुखकर स्मृति ती होतां,
गुरुमूर्ती मनाला दिसतां,
गुरु वदनींचे शब्द सुधामय तेव्हां
गुणगुणती कर्णीं, देवा,
तों हृदयाचा, जगताचा तो स्वामी
जई येई हृदया धामीं,
षड्रिपु क्षणिं काळें करितां,
असुखें ती सगळीं पळतां,
मग मोदाचें, आनंदाचें राज्य,
चालतें शांति साम्राज्य !
गुरुचरणाला घट्ट मिठी मारोन,
भिजवीन कधीं गुरुचरण ?
गुरुचरणिं कधीं मनसुमना अर्पीन ?
संसार बंध तोडून,
तें मोदाचें, शांतीचें माहेर,

का. ता.

## भाव-भेट

कधिं पाहिन मी दिनभर ?
चित्ताची स्थिती हो ऐशी,
मन विस्मरतें जगताशीं,
मम गुरु तो मी, प्रेमळ त्याचा दास,
ना दुजी स्मृती चित्तास,
ये झंझाता, उडवि मला गगनांत,
दे फेकुनि गुरु गेहांत,
खग सखया—रे चपल गती तव देई,
झणिं जाइन मी गुरु गेहीं,
झंझात, तटिनि, खग सगळे.
हे निष्ठुर कैसे झाले ?
प्रिय गुरुराया, दासा दर्शन द्यावे,
उद्धरून भक्ता न्यावें.

१९१५, पुणें.

---

## गुरुमाऊली

ब्रह्मा नाहीं ठावा मजला,
क्षीरार्णविं तो विष्णू निजला,
शंकर रामध्यानि—रत झाला,
वंदु कोणाला ? गुरु ज्ञात नसे जो मजला.
निशिदिनीं ज्यातें चित्तीं ध्यातों,
प्रेमें ज्यांचीं गानें गातों,
सद्भावें ज्या चरणां नमितों,

तोच गुरु माझा, जो अखिल जगाचा राजा.
पाहिन कधिं गुरु ऐसे होतें,
पाहतां वृत्ति तल्लिन होतें,
देहभान मग गळुनीं जातें,
वृत्ति जाणावी, वृत्तीच्या जाउनि गावीं.
मोहित हो मन गुरुगृहीं जातां,
हालूं नयेसे वाटे चित्तां,
केवळ विरहाची स्मृति होता
मना हुरहूर, लागते न जी हो दूर.
दडला तो मम हृदया कोषीं,
स्फूर्ती देतो मज काव्याशीं,
प्रेरणा त्याची, जुळणी मीं करि शब्दांची.
१९१५, पुणें.

---

## जयलक्ष्मीचा धिःकार

जा. जय लक्ष्मी जाकर काळें कुठें तरी जगतीं,
कृपा नको मज तुझी सदा कर कोपच मजवरती.
जय लक्ष्मीनें माळ घातली प्रमत्त नर झाला,
परमेशाची श्रीसद्गुरुची स्मृति कुठली त्याला ?
'मी मी' करितां स्वर्ग उरे मग दों बोटें त्याला.
चंचल लक्ष्मी ठावें व्हावें कैसें मूढाला ?
दो दिवसाची चंचल लक्ष्मी जाय यदा त्यजुनी,
ईश स्मरे तो मूढ, आळवी त्या करुणा वचनीं.

रीत जगाची दुर्दिन आले परेश अळवावा !
सुदिन उगवतां, विस्मृति डोहीं त्यातें बुडवावा !
रीत जगाची राहो जगतीं, मम पथ ही न्यारा,
चिकटुनि जगतां कुणिं कवळावा दुर्गतिचा फेरा ?
जगा आवडे सुदिन, परी मी करि त्याचा द्वेष,
दुर्दिन येतां, दूर पळे जग, मी त्या पाठीस.
क्षणिक सुखाच्या प्रमोद डोहीं डुंबो ही जनता,
अक्षय सुखिचें अब्धीक्रीडन आनंदवि चित्ता.
सुखा पाठि जग सदा धांवतें दुःखा चुकवोनी,
लाथ मारिली सुखावरी मी, दुःखा कवळोनी.
सुखनिधी येतां हातीं, जाई परेश बहु दूर,
डोंगर दुःखाचा कोसळतां प्रेमा ये पूर !
तदा गुरुचें ध्यान करावें, प्रेमें गुण गावें,
नाम स्मरणी दंग होऊनी जगतां विसरावें,
इच्छा होई चित्ता ऐसी श्रीपद मनीं येती,
त्या चरणांना घट्ट कवळितां—घ्या पण ही प्रचिती.
कुठलें सुख मग दुःखहि कुठलें ? अलिप्त दोहोस,
विस्मृती पडली ज्यास जगाची विकार ना त्यांस.
हाव धरावी ज्या गोष्टीची लभ्य न ती होई,
लाथें खालीं तिला तुडवितां चरणीं नत राही.
जिथें फलाशा तिथें निराशा हेंच वचन उक्त,
नको फलाशा, नको निराशा, दोहोंतुनि मुक्त,
अजिंक्य आम्हीं कृतांतासही सद्गुरुचे दास !
सदा रिपूंची छाती नाहीं जवळीं येण्यास.

माय कुणाची ? बाप कुणाचा ? मित्रहि कोणाचा -
जो तो अपुला, वेडी जनता घेइ ध्यास त्यांचा.
ठावा नाहीं देव कसा तो काळा कीं गोरा,
दंभ माजवुनि उगीच पिटितां त्याचा डांगोरा !
अडांत नाहीं पोहऱ्यांत ये कुठलें मग नीर ?
ठावा नाहीं, स्तवितां कैसा आश्चर्यचि फार !
नयनां दिसतें, चित्ता कळतें, मनासही पटतें,
सद्गुरु मूर्ति प्रेमें अळवा व्हां नरका परतें.
उठा, उठा, ही झोप पुरी कां अझुनी नच झाली ?
पळा, पळा, जा, दृष्टी तुमची अंध कशी झाली ?
माय जगाची प्रेमें जवळीं तुम्हां घेईल,
कुरवाळोनी आनंदोनी सत्पथ दावील.
देव कुठे जर असला जगतीं तर सद्गुरुमाय,
पुराणांतरीं असती थोडे अनुभव हो काय ?
देव जगाचा ज्यातें वदतां तो सीताराम,
वसिष्ठचरणाम्बुज मधु होऊनी घेई आराम.
मन मोहन तो नटवा गोपी–गोप–प्रेमसाठा,
सांदिपनी गृहीं फोडि लाकडें विसरोनी ताठा.
जगा विसरला, मना विसरला श्री शंकर भोळा,
स्मशानवासी झाला परि घे रामाचा चाळा !
मोठे मोठे ज्या मार्गानें गेले तो सुपथ,
वदनें आळवा, हस्तें कवळा, श्री सद्गुरुनाथ.
या तर येथें, बघा एकदां येथिल जल्लोष,
गुरुचरणाचें ध्यान गोड किति गोड नाम घोष.

१९१५, सातारा.

---

## गुरुपादुका

संसृति गत अति आधिव्याधी या दुबळया चित्ताला
यदा गांजिती तदा स्मरावें श्रीपद कमलाला.
गोड किती ती ! अहा गोड किति ! स्मृति गुरुरायाची,
गुरु-गेहाची, गुरुसंगाची, गुरुपदकमलाची.
विस्मृति पडते भवतालींच्या सगळया वस्तूंची,
स्मृति पट चित्रित गुरु मूर्तीला मनश्चक्षु वाची !
दांभिक जग दांभीक दृष्टिनें बघुनि मला हांसो
मत्काव्याला अतीशयोक्ती काजळ हें फासो.
पर्वा नाहीं मला अशा या भवसुम-भृंगांची,
धन-सुत-दारा विषयपूर्तता ध्येये मूढांची.
जगा न कांहीं अर्थ समजला जरि मत्काव्याचा
चर्वित चर्वण म्हणुनी निंदो राग-न मज त्याचा.
गुरु चरणांचा अल्प संग या दासाला घडला
त्या संगानें भव रंगाचा फंगा जिरवीला !

१९१५, सातारा.

---

## स्वार्थी जग !

सौख्यास्तव तळमळ सारी, स्वार्थी जग गमते भारी !
बहुमूल्य सृष्टिचीं रत्नें, दडविलीं भूगर्भांत,
अब्धीची करुनी पेटी, जलचर हे रक्षक त्यांत !
परि आटाआटि करोनी,
पृथ्वीचीं रत्नें हरुनी,

निजतनुवरी तीं घालोनी
मिरवी जग अपुली थोरी! सौख्यास्तव०
जाणुनी हें मग सृष्टिनें, दडविलें अंगीं सोनें,
परिस्वार्थपरायण जगता, नाहीं कीं हें ही खपणें!
रक्ताचें पाणि करोनी,
सोनें तें वरि काढोनी,
निजकाया भूषित करुनी,
चाले मग मारामारी! सौख्यास्तव०
लतिकेचीं कोमल बालें, स्वार्थी जग खुडितें नेमें,
लतिकेचे अश्रू बघतां, 'दंव' म्हणुनी हंसती प्रेमें,
परि विशीर्ण होतां सुमन,
मधु, सौंदर्याविण प्रसुन,
देतात ते फेंकून,
उन्मत्त करोनी चोरी! सौख्यास्तव०
जें नयनमनोहर फार, जगताला त्याची हांव,
बळ अपले दाउनि घेती, जैसी कीं त्यांची ठेव!
'पोळीवर आपुल्या तूप'
ओढुनियां सुखि ते अमुप!
परदुःख सूख त्यां गप्प!
ही काय जगाची थोरी? सौख्यास्तव०

१९१५, कोल्हापूर.

# बालमुकुन्द.

बाळमुकुंदा, नंदाऽऽनंदा, आनंदकंदा, गोविंदा,
प्रेममरंदा, पदारविंदा तुझ्या भाळला, जिव बंदा!
आयुष्याच्या सट्टयामाजी सौदा सौख्याचा फसला!
शांत जाहलें शांतीचें तें मुद्दल, जिव हा घाबरला!
बाह्यांगाची आवड, नावड अंतरंगिची व्यवहार
जगताचा हा सदा, कुणाला सौख्य कसें वद मिळणार?
सुंदर युवतीसंगें काढुनि आयुष्याची अमदानी!
कीर्ति, लक्ष्मिच्या पायीं लागे जनता मग ही प्रौढपणीं!
वेदांताच्या बाष्कळ, निष्फळ, सोज्वळ गप्पा मारोनी!
परेश–भक्ती–यत्न–विचारीं, जग मग लागे वृद्धपणीं!
प्रफुल्ल जीवित–सुम–सुख–भृंगें हुंगुनि जेव्हां तें सुकतें!
वृद्धपणीचें म्लान पुष्प तें कोणां देवा आवडतें?
देवासाठीं तारुण्याचा ऐन उमेदीवर पाणी
सोडुनि, काडें झाडांची जे करिति धन्य ते वीरमणी!
कुंजविहारी, मुरलीधारी, चेतोहारी, श्रीकृष्णा,
तव पदकमलावरी वाहिल्या संसृतिच्या साऱ्या तृष्णा!
श्याम कन्हया, नको धावुनी घालुं मिठी या हृदयाला,
परमपावना जरि ती, दिसते विपरित विषयी जगताला!
स्वमुख मन्मुखीं ठेउनि चुंबन घेउं नको रे घननीळा!
पापी जगतां पापी दिसतें शुद्ध शुद्ध रे गोपाळा!
बैस असा तूं यमुनाकाठीं, सदा सर्वदा गोविंदा,
जनदृष्टीच्या समोर बसली अशी, पहा, ही ही राधा!

प्रेम चोरटें सदा जगाचे फुलतें बहुपरि एकांतीं !
शुद्ध प्रेमा बहर, माधवा, आपण आणूं लोकांतीं !
डोळे भरुनी मला, कन्हय्या, पोटभरी तुज पाहूं दे.
मंजुळ मुरलीनादें माझी सौख्यसमाधी लागूं दे !
कल्पनेंतलें रूप पाहुनी प्रत्यक्षीं तव वनमाळी,
अंत होउं दे, राधा–वैयक्तिक–जगताचा या काली !
बालमुकुंदा, नंदाऽऽनंदा, आनंदकंदा, गोविंदा,
प्रेममरंदा, पदारविंदा होय 'मनोहर' तव बंदा.

१९१६, इंदूर.

---

## विनंती

कामाग्नीची ज्वाला भडके मनविपिनीं वरीवरी,
विवेका भस्म जाळुनी करी.
अनुतापाचे तुषार उठती क्षणभरि अग्नी विझे,
पुनरपी चित्ता जाळू सजे.
कृपार्णवाची लाट वळू दे दीन अनाथावरी,
प्रभंजन कामाचा ने दुरी.
पावन लतिका दुर्बल झाली, शांति सुमना हरी,
गुरुवरा, धांव धांव सत्वरी.
निशिदिनीं जाळितो मदनाग्नी या मना,
लोभाच्या उठती वरीवरी कल्पना
जीव गांजला नैराश्यानें प्राण नको जाहला,
गुरुवरा पदरिं घे झणि मला.

१९१७, इंदूर.

---

## आशास्वप्न

रूपाला बघुनी सदैव मन हें वेडें बनावें पुरें !
नित्याचीच मना असे सवय ही होतें बहू बावरें,
औदासिन्य जनांसि दाखवुनियां चित्तें झुरावें मनीं,
प्रेमाला लपवावयांस्तव सदा रीती अशी ही जनीं !
मार्गानें फिरतां विषण्ण हृदयें, दृष्टीं पडे सुंदर —
बाला कोणि अतीव मोहक बहू नाजूक चेतोहर,
बाल्याची पहिली छटा भरुनिया, सौंदर्य लोळे मुखीं !
कैचें दुःख तयास ज्या मनि मुळीं नाहींच चिंता फुकी ?
लोकाचार म्हणूनि दृष्टि फिरवी अन्यत्र तेव्हां कवी,
कैसें चित्त वळेल पाहुनि अशी सृष्टी विधीची नवी ?
आशेची पहिली मनांत उठली जी लाट, ती थांबली,
सौख्याची न कधीं मनां सवय, ती दृष्टीहि भांबावली !
दुःखांची अनुभूति नित्य असलें हें चित्त, देवा वदे,
आशास्वप्न कधीं वठेल मम हे प्रत्यक्ष सृष्टीमधें ?

१९१७, इंदूर.

---

## तुंबळसागर

तुंबळ सागर खळवळला, तुफान वाराही सुटला,
लहरीवर उठती लहरी, फेन नाचतो वरीवरी.
रत्नाकर हृदयीं भरला, रत्नांचा बाजार खुला,
आला नाविक बहु शूर, रत्नें काढाया चतुर.
एक लाट ने स्वर्गाला, दुसरी दावी पाताळा,
नाविक दमला, यत्नीं हरला, मनि घाबरला,

गगनचुंबि सागरलहरी, धरिती नाविक घट्ट उरीं.
झाली मगरमिठी सैल, प्रेमाचा चुकला ताल,
जीवाचें दिधलें मोल, यत्न जाहले परि फोल.
निर्जिव नाविक जलावरी, होता लोळत बहूपरी,
आयुष्याची अमदानी, विषय सुखाच्या लहरींनीं.
खळवळली हृदयीं फार, मन नाविक मनिं वेजार,
स्वधर्म, नीती, अमोल मोतीं, तळीं हांसतीं !
येतिल केव्हां हाताला, प्रभुराया, ठावें तुजला.

१९१८, इंदूर

---

## नैराश्याचे निःश्वास

(उदास मनाचें रडकें गाणें सुखांत पोहणाऱ्या जीवांना कंटाळवाणें वाटेल !)

कल्पनेंतली रम्य कल्पना प्रेम-सौख्य-भास !
प्रत्यक्षीं परी जीव नाचवी उल्हासी आस !
आयुष्याचा स्वर्ग खेळतो बालपणीं हृदयीं !
तारुण्यामधि भयाण दुनिया नशिबाला येई !
सौख्याशेच्या अंधुक रात्रीं मिटलेले डोळे,
कल्पनेतल्या रम्य दिनांचे बघती सोहाळे !
सौंदर्याचा स्वर्ग पाडितो नयनाला भूल !
आशा लहरी हृदयावरती करिती कल्होळ !
दुनियेच्या या सुंदर असल्या उघडया बाजारीं,
नैराश्याच्या निःश्वासांची गर्दी ही सारी !
मृतप्रेमाची जिवंत भूतें जगतीं फिरतात !
मनोहराचे डोळे का परि भरुनी येतात ?

१९१९, पुणें.

# आमचें ध्येयही एक

विश्वाच्या इतिहासांत, चमकली भरतभू पूर्वी !
न्हाउनियां ऐश्वर्यांत, नाचली सुखाच्या पर्वी !
रामायण, भारत सांगे, कीं धन्य धन्य ही उर्वी !
परि दिन ते गेले पहिले,
आतां हे आले असले,
दुर्दैव कसें ओढवलें !

जें अपुलें त्याच्यासाठीं, परक्यांस मागणें भीक.
जरि हिंदराष्ट्र वाद्याला, बहु जाति, पंथ, कुल, तारा,
तामील, हिंदि, गुजराथी, बंगालि, मराठी, तोरा,
पारशी, महंमदी, हिंदि, धर्मांचा सर्व पसारा,
परि वाद्यां एकचि गान,
हो स्वरसंमेलन पूर्ण,
प्रेमाचा ताल धरून,

तें एकचि फोडी हांक, आमुचें ध्येयही एक.
पुनरपी शक्य ना आतां, स्वरभेद गायनीं होणें,
विश्वासें धरुनी हात, एकाच पथानें जाणें,
मार्गांत संकटें येतां, कलिकाळालाहि न डरणें,
गीतानें भडका उडला !
विश्वासहि जागृत झाला !
आळसाला पडला आळा,

सांगणें तयांना चोख, कीं ध्येय आमुचें एक.
" एकराष्ट्र तुम्ही नाहीं, विविधता फार तुमच्यांत "

जाति, पंथ, भाषा, अठरा, अठरांच्या कडबोळ्यांत,
हा तिरस्कार नच कामीं,
एकी ही भिनली रोमीं,
हृदयांच्या अंतर्यामीं,
बोलोत कांहिंही लोक, आमुचें ध्येयहि एक.
विविधता जरी बहु असली, तरि रुची लागतां गोड,
तीच कार्यसिद्धि न म्हणणें, कसलें हें कुठलें वेड ?
कीं वेड घेउनी जाणें, पेडगांवि असली तेढ !
जरि अठरा धान्यें असलीं,
तरि एकजीव तीं झालीं !
ऐक्यांत विविधता भिनली,
आतां न दुहीचा धाक, आमुचें ध्येयही एक.
ही आत्मवंचना करणें; गोष्टही दृष्टिच्या आड,
वंचना न ऐसी करितां, प्रेमाची करणें फेड,
ही राजनिष्ठ हृदयांची, आकांक्षा समजुनि गाढ,
हरि, हरी मनींची चिंता,
कधिं स्वराज्य देशिल नाथा !
बघुं नको अंत भगवंता !!
पदरांत माप दे रोख कीं ध्येय आमुचें एक.

१९२०, सातारा

# पंचप्राणांची पूर्णाहुति

(संपन्नतेच्या रामराज्यांत सुद्धां दुष्काळाचा वनवास घडतो !)

उत्कंठेची सीमा झाली आतां या पुढती,
आशेचाही अंत जाहला, या दुर्बल चित्तीं !
आनंदाचें वारें कुठलें आतां या नशिबीं ?
परिचित झाली या हृदयाला सौख्याची गरिबी !
ओळख नाहीं मुळि हास्याची ! पूर निराशेचा,
आला, झाला हार गुंफुनी तयार अश्रूंचा !
आयुष्याच्या खडतरतेचा कडेलोट झाला,
दीन मनाच्या शून्य दृष्टिला विषयहि ना उरला !
पहावयाचें आतां कांहीं नुरलें या जगतीं,
'मनोहरा'च्या मना मस्तकीं लावि मृत्यु-विभुती !
नैराश्याच्या भेसुर असल्या जळत्या आगींत,
प्रभुराया, दे एकतरी चिर शांतीचा स्रोत !
विषण्णतेच्या भयाण भीषण या अंधारांत,
अंधुकशी तरी, देवा, दे रे समाधान-ज्योत !
सर्वस्वाची आहुतिहि घे, दुर्दैवा, आतां
पंचप्राणांची पूर्णाहुति घ्या जीवन-नाथा !

-१९२०, सातारा.

# मेलेलें प्रेम

काळोखाच्या काळ्या रातीं,
निद्रित विश्वाच्या एकांतीं,
हंसणाऱ्या तारांच्या पंक्ती,
तारानाथा ! आनंदानें झाल्या बघ बेहोष !

"येइल भुवनीं जीवनराजा,
सौख्यनिधी तो परेश माझा,
पुरविल मनिच्या अगणित चोजा,"
तरुण मनाला सौख्यावाचुनि काय दुजें दिसणार ?

म्लान अशी का तारा झाली ?
लाली विरली वदनावरली !
हास्याचीहि उकळी निवली !
हाय ! खेळतो चंद्र भूवरी सागरलहरीशी !

उत्कंठेचा सुटतां धीर,
नैराश्याचा मनिं अंधार
आनंदाला करि बेजार !
प्रेमनिराशा सौख्यमंदिरां लावी भीषण आग !

विषण्ण होउनि तारकमाला,
सज्ज जाहली अर्पायाला,
मनसुमनाला हृदयेशाला,
भग्न मनांच्या राशी दिसती रात्रीं आकाशांत !

असंख्य आशा-तारा चित्तीं,
निष्ठुर चंद्रा बघुनी गळती,
मेलेल्या प्रेमाला गीतीं,
गातां येते 'मनोहराला' हास्य बहू बेसूर.

१९२१, सातारा.

---

ता. ....... २५

# लोकमान्य निधन

दाह ग्रीष्माचा भूमि हाय जाळी,
पारतंत्र्यानें हिंद अश्रु ढाळी,
जलद आला सुखवावया धरेला,
लोकमान्यांचा धीर भारताला.
करी वर्षा वर्षाव अमृताचा,
जोम उसळे मग थोर चळवळीचा,
हरित वसना भू होय त्या क्षणाला,
स्वयं सत्तेचा ध्यास भारताला.
शरद आला भू शस्यशालिनी हो,
स्वराज्याचा हिंद फोडीत टाहो.
रान सोन्याचें भूवरी हसेल,
हिंदभूला सुखसूर्य हा मिळेल.
तोच आला हेमंत दुःखकारी,
लोकमान्याविण शून्य दिशा चारी !
फळें गळलीं, सुकलीं फुलें तरुंची,
मूर्त खचली हा ! धीर साहसाची.
भयें कांपे भू शिशिर हाय ! येता,
देशभक्ताला बंदिवास लाथा,
उडवि गगनीं झंझांत फुलें पानें,
दैव करितें परि नवें जुनें सोनें.
कदा भूला मधुमास हांसवील ?
सौख्य सविता भारतीं कार्य उदेल ?

सृष्टीसतिच्या द्विजवरा हाच ध्यास,
हिंदभूमीच्या या नम्र सेवकास.

*　　*　　*

देवा हे पाहुनि दृश्य दुःखानें ऊर फाटतो,
दाटतो कंठ हा भारी अश्रूंचा पूर लोटतो.

१९२०, मुंबई.

---

## फुलांची ओंजळ

नव्या वसंता उधळ सुखाचीं सुमें त्रस्त भूवरतीं !
क्षुब्ध सागरीं शांत हंसू दे तळचीं माणिक-मोतीं !
आशेचे मृदु किरण नाचुं दे चिर नीला ऽऽ काशीं !
प्रत्यक्षाची गांठ पडूं दे काव्यकल्पनेसी !
नव प्रेमाची नगरी माझी मागें झाली खाक !
हातीं आली भूतकालच्या सुख-स्मृतीची राख !
त्या जीवाला भरलेलें तें हृदय दिलें हें असलें !
रितें, गोड ध्या करुनी रसिका, मनसुम सुकलेलें !

१९२०, सातारा.

---

## वंचना

भोळा जीव मदीय हा भुलविला, बाले, तदा तूंच ना !
सौख्याची नव्हती मनीं मुळि यदा अंधूकही कल्पना;
दृष्टिक्षेपहि गोड टाकुनि किती केलीस जोपासना
प्रेमाची, स्मित नित्य मोहवि तुझें या भाग्यशाली मना !
केव्हां गालिं खळी, कधीं वच तसें उत्साहदायी अती,
तैसा तो सहवास जेथ उसळे उन्मादकारी मती !

प्रेमाचीं वचनें दिलींस मजला कां सांग अप्रार्थित !
सौख्याचा सुखस्वर्ग आणि गमले, झाला तदा अंकित !
गेले ते दिन; संपली सुरुचिरा श्रीशारदोपासना,
हातीं ये पदवी, करी मन तुझी सप्रेम आराधना,
अन्याला कर देउनी मज असें कां वंचिलें ? चंचले,
संसारीं मधुवृत्ति दुःखकर ! जा, नातें तुझें संपलें.
चित्ताचें सुम वाहिलें प्रथम हें सोत्कंठ, बाले, तुला !
आतां देउं कुणां पुन्हां सुमन हें ? निर्माल्य झालें मला !

१९२०, पुणें.

---

## तालाचा बेताल

रान रानचीं फुलें आणिलीं, देवी तुजला पूजाया,
दहा दिशाला उधळुनि दिधलीं तूंच सुमें ती कां वाया !
तव इच्छेच्या तालावरतीं सूर जीवाचा सम लागे,
तुझ्याच जीवासाठीं केलीं नवीं नवीं तीं किती सोंगें.
तुझ्याच एका जीवासाठीं लाथ मारिली जगावरी,
अनेक तोडुनि एक जोडणें गमलें तेव्हां सुखकारी.
पुरवाया तव लहर एक कीं जिवा जिवाचें मोल दिलें,
हाय ! परंतु कांहीं नाहीं तुझ्या मनाला ते आलें.
आकाशाची चटक चांदणी येईल हाताला म्हणुनी,
पुढतीं केला हात त्यावरि फत्तर पडला हा ! वरुनी.
नाचविले या मना सदा तव नयनांच्या तालावरती,
तालाचा बेताल बेतला कसा सखे जीवा वरती ?
वेड लागतां प्रेमाचें हा जन्माचा होतो खेळ !
मनोहराचा जीव धुंडितो कोणाला रानोमाळ ?

१९२०, सातारा.

---

# सौंदर्याचें वेड

तव रुप संपदेला, दृष्टी गरीब भुलली,
सौंदर्य सागरानें, नत्रक्ष माळ फुलली.
सौंदर्य माधुरीला, जिव हा सदा भुकेला,
दिलदौलतीस माझ्या, सौंदर्य हाच कलिजा.
सौंदर्य संपदेचा, बंदा गुलाम जीव,
या प्रेमदान देवा, येणार कां न कीव ?
सौंदर्य स्तोत्र गायी, रसवंति प्रेमला ही,
नाहि स्थिती समान, गुणधर्मी साम्य नाहीं.
जरि भाग्य नाहि असले, तरि डोइ ठेवि पायीं,
नक्षत्र पाहुनिया, दगडास येइ भरते.
परि तें कुठें ? कुठे हा ? नातें न कांहिं गोतें,
कां घाव चित्त घेई, कां भाव ठेवि तेथें ?
परि भावबंधनाचे व्यापार सर्व उलटे !
सौंदर्य वेड बघुनि, गणिशील पीर वेडा.
सौंदर्य वेड गोड, हरि मानसीक तेढा !
सापेक्ष प्रेमस्वार्थी, जीवास या न शिवले.
सौंदर्य देवपूजा, निरपेक्ष भालि आले,
वाणी नकाच शिणवू, माझ्याशी बोलण्यांत.
किंवा न स्थान द्यावें, दीनास या मनांत,
नैराश्य सागरांत, तव दृष्टी सौख्य नौका !
परि दृष्टी प्रेमला ती, कुतुकें क्षणैक टाका,
जिव सौख्यसागरांत, पोहेल सर्व काळ.

## भाव-भेट

सुख गायनास माझ्या, देईल मोद ताल,
सौंदर्य दृष्टी फेक, जगवी किती जिवांना?
सौंदर्य मूक वाणी, हंसवी किती मनांना!
अज्ञात या जिवाची, नति घ्या मनोहराची.

१९२१, मुंबई.

---

## काव्य-कुंजकारास

चित्त भुललें पाहुनि काव्य-कुंज,
काव्य-सुमनांचा मधुर गोड पुंज,
त्रस्त हृदयाचा शीण घालवील,
भाग्यवंताला मुदित हा करिल.
येथ नाहीं अति गूढ तत्त्वज्ञान,
शाहिराचें कोरडें युद्ध गान!
भावगीतें, नाहींत वा सुनीतें,
दायित-दायितांची गोड प्रेम-गीतें.
व्यावहारिक दें सहज मधुर बोल,
रसिक हृदयीं शिरतात परि खोल,
आणि आला हृदयांत जो उमाळा,
स्वयंस्फूर्तीनें गात कवि तयाला.
तीच कविता जी भूलविते मनास,
सत्कवीला ना कीर्तिचाच ध्यास!
मनीं खळबळलें गीत मुखें गावें,
स्वयें रंगुनि जगतास तोषवावें.

ग्रंथ संग्रहालय २९ ता. ठा.
ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ठाणे

वृत्ति सात्विक सद्वृत्त शील थोर,
सहानुभूति अत्यंत मन उदार,
पाहुनिया रसवंति लुब्ध होई,
अशा कविच्या पदिं ठेवितसे डोई.

१९२५, पुणें.

---

## मुळशी

प्रभुराज वांचवाहो, दीना अनाथ मुळशी,
संपत्तिच्या मदानें, छळिली अनाथ बाला.
सामर्थ्य सागरांत, बुडली निराश तरणी।
जुलुमी विखारी साप, मुळशीस चावतो हा.
सत्ता प्रमत्त परकी, छळिते अनाथ देशा,
धरिली सति अनाथ, श्रीमान् नराधमानीं.
मुळशी मराठभूमी, लुटितात चोर परके,
श्रीमंतीच्या पुरानें, बुडती गरीब गांव!
असहाय दीन जिवा, प्रभुवीण कोण वाली?
प्रभुराज हात द्याहो, मुळशीस वांचवाया.
श्रीमंति वाचवाया, गरिबीस कां छळावें?
झाला अनाथ जीव, किति पाहणार अंत?
सत्ता जगवायाला, जर मारणें गरीबी,
मुळशीस मारुनिया, मुंबापुरी जगो ही!
बुडणार ही असेल, तर ती बुडोनि जावो,
परि हाल या जिवाचे, सरणार केधवां ते?

सह्याद्रीच्या कड्यानें, चुरडून जाइना कां ?
परि ही अनाथ गाय, नाडू नका दयाला.
घ्या प्राण एकदाच, परि हे नकोत हाल,
चिरकाल येथ नांदो, परकी खुशाल सत्ता.
मारा क्षणांत तर ही, सरतील हाल मग ते,
तुमच्या दयार्णवांत, द्या स्थान या सतीला.
तुमच्या कृपा कराचा, आधार द्या दयाळा,
परि हे नकोत हाल, जिव कापती थरारा.
महाराष्ट्र स्वार्थ त्यागी, रणवीर दीन झाला,
मुळशीस मारुनिया, मुंबापुरीस जगवा.

१९२२, मुंबई.

---

## आली कां माझी आई ?

दुर्दैव सागरावरती – तळमळे अभागी जीव,
राहिली अतिशय दूर – मायेची त्याची शीव !
परदेशीं कोणा येइ – कधितरी कुणाची कींव !
बडबडे जीव तापांत,
होऊनी मनाला भ्रांत,
त्या भयाण परदेशांत,
आपणाशीं ऐसें कांहीं – नाहीं कां आली आई ?
अंगांत ताप फणफणला – डोळ्यांतूनि गळती धारा,
धडधडे सारखा ऊर – जिव झाला गोळा सारा,
तडफडे बिछान्यावरतीं – बहु झाला गोरामोरा.

अंगाची होते लाही,
मस्तकांत शूल न मायी,
परि उघडुन डोळे पाही,
अस्पष्ट विचारी कांहीं, आली कां माझी आई ?
उघडतां झाकले डोळे, अंधार भोंवतीं दिसला,
क्षणमात्र प्रश्न दुमदुमला, पडसाद विरोनि गेला,
चरकला जीव त्यावेळीं, आशेचा अन्तही झाला.
फिरविले भोंवती डोळे,
आईच्या कोमल बाळें,
घुटमुळे जीव त्यावेळं,
अडखळे शब्द परि नाहीं, आली कां माझी आई ?
पुनरपि झाकिले डोळे, चित्तास काय मग दिसले ?
कासाविस होऊनि जीव, मनिं विचार कसले आले ?
तडफडे कसा तो बाळ, हैराण कसें मन झालें ?
ठाऊक हें त्याचें त्याला,
कल्पना न ती जगताला—
दुःखाची न ओच सुखाला,
तोंडांत पुटपुटे कांहीं—नाहीं कां आली आई ?
बघण्यास अंतिं आईला—गुंतला जीव बाळाचा,
परदेश विसरला तेव्हां, अभ्यास, प्रश्न पोटाचा,
विसरली परीक्षा, भावी तो खेळहि संसाराचा !
डोळ्यांत पातले प्राण,
कायेंत न उरलें त्राण,
मायेची घालुनि आण,

कळवळुनी शेवटीं बाही, भेटशील केव्हां आई ?
त्या काळया अंधारांत, डोळयावर झापड आली,
त्या भयाण परदेशांत, शेवटीं तनू गारठली,
धांवत्या मनाची धांव, थांबली शेवटीं सगळी.
आईचा प्रेमळ बाळ,
घेऊनि चालला काळ,
एकुलता प्रिय वेल्हाळ,
राहिली दूरवर आई–भेटणार कैशी आई ?
राहिली परीक्षा मागें–अभ्यास जेथल्या तेथें,
आकांक्षा मरुनि गेली–उन्नतिची सगळी येथें,
जीवनार्थ कलहाची ही–धडपड मग राहे येथें.
परि अन्तरला आईला,
राहिला व्याप मग सगळा,
बाजार सर्व आटपला,
परदेशीं कर्तव्याला–निजप्राण बाळ बळि देई !
किति तरणे ताठे जीव–हिंडतात परक्या ठायीं,
विद्यार्जन करण्यासाठीं–प्रभु, घरीं आळवी आई,
आकाश वरुनि कोसळतां–रडताती धायी धायी.
या हतभागी जीवांना,
आईच्या वेल्हाळांना,
या मनोहराच्या नयनां,
दिसणार केधवां आई–आली कां माझी आई ?

१९२१, बनारस.

## अभंग

संसारी सुटला संकटाचा वारा, डोळयांतुनी धारा वाहताती,
चित्त भांबावलें, जीव घाबरला, प्राण गोळा झाला, प्रभुराया.
संकट समयीं, कोण कामा येई, मन प्रभु पायीं लीन झालें,
भाव देखुनीया अनन्य मानसीं, द्रवे कृपाराशी दिनानाथ.
अनाथांचा नाथ भक्तासाठीं उभा, संकटीं सर्वदा रक्षिताहे,
देवावरी भार सर्वही घालावा मनीं प्रेमें ध्यावा दिनानाथ
अनाथांच्या नाथा, सद्गुरु समर्था, तुझे पायीं माथा दास ठेवी.

१९२१, बनारस

---

## वसुधा वस्त्रहरण

नव हेमंता, रांजिस आली दीना वसुधा तुजपुढती,
अश्रुहि गेले सुकुनि पांढरे ओघळ दिसती तनुवरती !
थरथर कांपे जीव सतीचा अर्धा मेला बघ झाला,
सांजसकाळीं पांघरलेला पिवळा शेला ही विरला !
आकाशाच्या अंगणांत मग अमित चिता त्या पेटवुनी,
कुडकुडणाऱ्या थंडी संगें झगडे वसुधा, सह रजनी.
वस्त्रहरण हे पुरे निर्दया, गोरीमोरी ती झाली,
जरतारी हिरवे शालू हे फेडु नको रे अवकाळीं !
फाडुनि नाजुक हिरवीं पिवळीं वसुधा वसनें स्वकरांनीं,
त्या चिंध्याची माळ घालिसी गळा सतीच्या कां फिरुनी ?
लज्जेनें मेलेली वसुधा काळवंडली मृदु काया,
झाकायाला दहा दिशांचे वृक्ष पसरती निज माया !

आशा वसनें फाटुनी गेली चिता घडाडे प्रेमाची,
जळली नाहीं थंडी कां मग दुर्दैवी जीवाची ?

१९२१, बनारस

---

## संसाराचा खेळखंडोबा

जीव घाबरा झाला पाहुनि संसाराची भीषणता,
सुखस्वर्गाच्या खाली दडली विषयांची भेसूर गर्ता !
विषयसुखाची ज्वाला जाळी दुर्बल तृणवत ही काया,
विषयांचा अतिरेक दावितो मार्ग सुखें नरका जाया.
नर जातीला स्त्री देहाची कोणी दिधली सुलतानी ?
मत्तमदन व्याघ्रास सांपडे अबला कोमल ही हरिणी.
अन्योन्याची इच्छा, संमति, काळ वेळ, त्या मुळि नाहीं,
तीन्ही त्रिकाळीं नरजातीची घरांत माजे पुंडाई !
कोमल ललना या गृहलक्ष्मी, पुण्यवंत अर्धांगी या,
परमेशानें दिधला कां हा बळीच पुरुषांच्या विषया ?
हाय हाय ही काय दशा या नाजुक रमणी सुमनांची,
मत्त भ्रमर नर केविलवाणी करितो स्थिती हा किती यांची.
प्रभुराया, तो जरा राहुं द्या विश्वाचा संसार,
बेसुमार ही विषय वासना करा सत्वरि परि ठार.
न्यायमतानें विषय सुखाचा स्वाद नरानें मित घ्यावा,
अर्धांगीचा देह पतींना पवित्र जगतीं वाटावा.
तारुण्याच्या भयाण रातीं विषयाचा झंझावात,
विवेक दृष्टी अंध करितसे द्या हो प्रभुराया हात.

प्रभुपदसेवा, विषयसुखाचा ठेवा परिमित नित ध्यावा,
मनोहराच्या संसाराचा खेळ न खंडोवा व्हावा.

१९२२, बनारस.

---

## अभागी

सुंदर इसरी तारा दिसली पहिल्या दृष्टिला,
बाल मनाला गमलें कीं जणु स्वर्ग करीं आला.
चित्ताची मग लावुनि दृष्टी त्या जीवावरती,
काळ कंठिला कसा तरी त्या अंधाऱ्या रातीं.
कितीक डोंगर नैराश्याचे चढुनी धैर्यानें,
किती तुडविलीं अपमानाचीं काटेरीं रानें!
बाहुबलानें विषण्णतेच्या सरिता तरताना,
चळला नाहीं जीव, सौख्य दे तारा परि नयना.
दुःखाचाही असह्य वारा झोंबे शरिराला,
भावि सुखाच्या प्रेमाचें परि विरल वसन तनुला.
बाल्यामधुनी तारुण्याच्या रम्य सिमेवरतीं,
पाय ठेविता सुंदर आशा लहरी मनिं उठती.
अंतर तुटलें मुग्धपणाचें ये जीवा जवळी,
परि जीवानें जाळुनि केली शरिराची होळी!
जळता हृदयीं हाय जाहली आशेची राख,
जीवनग्रंथा मधुनी गळला सौख्य शब्द एक!
आयुष्यांचें सरले नाहीं नाटक, परि विरळा,
प्रवेश असतो सौख्याचा हें पटलें चित्ताला!

ता. ३७
ग्रं. मुं.

## भाव-भेट

वाटत होते जीवन लतिका पुष्पित होईल,
चित्त-भूमिवर सुख सुमनांचा वसंत नाचेल.
जीवन सरिता सौख्य सागरां मिळतें हें ज्ञान,
दुर्दैवाच्या स्वानुभवानें केले अज्ञान !
चिर सौख्याचें रामराज्य कुणी अखंड भोगावें,
रडत परी कुणि वनवासामधिं सदैव भटकावें !
संसाराचीं फुलतीं सुमनें सेवावी कोणी,
आणि स्मशानीं राख सुखाची फासावी कोणी !
आनंदाच्या संसारीं कुणि मांडावा खेळ,
रडगाण्याला नयनाश्रूंचा द्यावा कुणी ताल !
जलक्रीडा कुणि सुखें करावी शीत निर्झरांत,
हृदय कुणाचें परी जळावें जळत्या खाईंत !
निज कवनानें जग हंसवावें कुणी शाहिरानें,
मनोहरा, तुजसवें रडावें परि का जगतानें !

१९२३, मुंबई.

---

## इशारा

हिरवळ सरलीं बाल्याची, हंसण्याची बागडण्याची,
तारुण्याच्या वनामधीं, जाण्याची आली संधी !
उत्कंठेनें हृदय भरे, मन बांधी सुख डोलारे !
कुणास ठावा, विधिचा कावा !
करूं नको गाजा वाजा, जपून जा गडे जपून जा.
सौंदर्याचें वेड जडे, पैशाचे अंगिं पोवाडे !
कीर्तीविण कां कांहिं अडे ? मानाचें तें बंड बडें !

प्रेमाच्या या हृदयांनीं, परस्परांना करिं धरुनी
गिरि शिखरावरि, निर्झरतीरीं,
चल, आपण गे करुं मौजा, जपून जा गडे जपून जा
हात दिला परि दैवानें, खरें पडे पदरीं नाणें !
कल्पनेंतलें चित्रच तें, प्रत्यक्षामधिं जणुं वठतें !
मनोरथांची उंच उडी, आकांक्षेची पैल थडी ?
माझी झाली, हातीं आली,
ये, विरहाला देउं रजा. जपून जा गडे जपून जा.
लज्जादीपक मालवुनी, गांठ भिडेची सोडोनी !
गोड शांतिचे बोल मुके, बोलूं अगणित, राहुं मुके !
हृदयाच्या वीणेवरती, चल, सौख्याच्या छेडुं गती !
आनंदाची, नाविन्याची,
करुं लीला ही तिन्हि सांजा, जपून जा गडे जपून जा!
ओसरला पहिला पूर, रूपाचा बदले नूर !
दृष्टिची बिजली थिजली, पोटाची चिंता जडली,
संसाराच्या फेऱ्यांत, कल्पनेंतल्या राज्यांत
सांपडलेला, बावरलेला
जिव रडे, कुठल्या मौजा ? जपून जा गडे जपून जा !
संसाराचा हव्यास, वाढे चिंतेची रास,
वरच्या लत्तेला माथा, दिली तीच खाली लत्ता !
एकाचे करुनी दोन, दोहोचे शत संपूर्ण,
चंचल नारी, श्री हि सुंदरी
हसतां, वाढे जगिं दर्जा, जपून जा गडे जपून जा.
मरणाच्या दारीं पडला, जीव मनीं बहु घाबरला !

भूतकालचीं भुतें जितीं, नाचतात नयना पुढतीं
डोळयाला पाणी आलें, पुसायास कोणी नुरलें !
हर ! हर ! गेलें, आयु संपलें !
नाहिं रिझविला प्रभुराजा, जपून जा गडे जपून जा-
आयुष्याचा आरंभ, हृदयभावना स्वच्छंद ।
ऐश्वर्याच्या ऐनपर्णी, भरतीचें चढतां पाणी,
विसरुनि मंगल प्रभुचरणा, भुललों निर्जिव चित्रांना,
आशा मेली ! हौस पळाली !
विस्मृतिचें विष मज पाजा, जपून जा गडे जपून जा ?
जपून जा कोठें आतां ? जाण्याची सरली वार्ता !
जातांना नाहीं दिसलें, मन मोहाला हें फसलें,
कल्पतरूचें सुम दिसलें, परि तें स्वकरें चुरगाळिलें !
काम घेउनें, चालुनि येणें
परि तिजला वदणें जा, जा, जपून जा गडे जपून जा.
चिंतामणि हातीं आला, हाय ! दूर तो भिरकविला !
गंगा ये आळशावरती ! दुर्दैवें केली परती !
जन्माची झाली माती ! दगड निराशेचे हातीं !
पश्चात्तापी, असला पापी,
उद्धरशिल का प्रभुराजा, जपून जा गडे जपून जा.

१९२२, मुंबई.

## आम्ही कोण ?

आम्ही कोण ? मनांस प्रश्न पुसतां, अंगीं भरें कापरें,
आम्ही वंशज दुर्बल प्रबल त्या विराग्रणींचे खरें,
धारातीर्थ करुनि पूत निजले ते मायदेशास्तव,
सेवाधर्म करुनि आम्ही जगतो या क्षुद्र पोटास्तव !
ते होते बहु दानशील, विजयी, उत्साहदायी शुची,
आम्ही कंजुष, राव नित्य रडके, हा ! वादमार्गी रुची,
त्यांनीं ईश पदांबुजें कवळिलीं संसारमार्गी सुखें,
आम्हां मत्सर, काम जाळिती सदा, आयुष्य गेलें फुकें.
देशोद्धार करावयास झटले ते शूर रात्रंदीन,
एकी साधुनि बेकिनेंच आमुचें हो राष्ट्र निर्दालन,
अन्योन्यावरि वाक्प्रहार करुनी, स्वीय प्रतिष्ठा सदा
वाढावी, म्हणुनी सदैव झटतो आम्ही अहा संपदा.
धर्माची अवहेलना, विषय ज्या प्राणाहुनि ही प्रिय,
ऐसे ते कवि वावदूक वदती वाटेल ते निर्भय.

१९२४, धुळें.

---

## दरिद्री गर्विष्टास

अफाट सागर शांत हासतो भरुनी राही पृथ्वीला,
परी खळाळा वाहुनि ओढा दावि जगा निज अल्पजला !
तेजोनिधी श्री प्रचंड भास्कर प्रकाश देतो विश्वाला,
परी गर्विता तारकमाला दांत दाविती रात्रीला. !
वीर फाकडा गडी मराठा समरीं चालवी समशेर,
शब्दशूर वाचाळ बडबडे युद्ध-कथा भुवनीं फार !

शाहीराच्या रसवंतीला रसिकोत्साहें ये पूर,
अहंमन्य परि पद्यकार तो स्पर्धा समरीं बहु चूर !
गरुड भरारी मारी गगनीं काक घडपडे भू-वरतीं,
मूक हसे वागीश, जळफळे मनांत गायक तो स्वार्थी !

-१९२४, पुणें.

---

# महाराष्ट्र देश

सुंदर देशा, पवित्र देशा, भाग्यवान देशा,
कणखर देशा, मोहक देशा, महाराष्ट्र देशा.
नरवीरांच्या स्वतंत्र देशा, आडदांड देशा,
रामदासि बाण्याच्या देशा, महाराष्ट्र देशा.
सत्पुरुषांची, मुत्सद्यांची तूंच, सख्या, खाण !
रसवंतीच्या वागीशांची तुला न कधि वाण !
पतिव्रतांच्या देशा, मंगल साध्वींच्या देशा,
पाणथळीच्या हिरव्या देशा, माळांच्या देशा.
प्रभुवर आले दण्डक विपिनीं शरयू तळमळते !
पंचवटीला गोदावरिचें हृदय उचंबळतें !
आयोध्येचा राजकुमर ये, तुझ्या जनस्थानीं,
गाया संसाराचीं पहिलीं नवीं गोड गाणीं !
रघुवीरांच्या संसाराचें फुलें येथ फूल !
परदेशी दैत्यांस चारिली तूंच सदा धूल !
हस्तिनपुरच्या पांचालीचे दिव्य पंचप्राण,
पतिव्रतेच्या पावित्र्यास्तव घालिति थैमान !

विराट नगरीमाजी तुझिया, भीमकाय भीम,
प्रमत्त कीचक वधुनी करितो पावन तव धाम.
विराटगड हा, पांडवगड हा, हीं पांडवलेणीं,
सह्याद्रीवर गातीं अजुनी द्वापरचीं गाणीं !
रत्नाकर तुजसवें घालितो सदैव धिंगाणा !
रत्नागिरिला उधळुनि देतो रत्नें, मणि, नाना !
त्या रत्नांचा प्रकाश फांके तुझ्या पठारांत,
लेखणिनें, कुणि समशेरीनें, नाचविती तख्त !
स्वातंत्र्याची, वैराग्याची, पहिली आरोळी
दिधली, ज्यांनीं करुनी भेकड भीतीची होळी !
शक्ति, युक्ति, मति, भक्तीचा जो दयावंत राणा,
अष्टांगांचा प्रमाण माझा रामदासचरणां !
समर्थ स्वामी रामदासकृत ही अद्भुत लीला,
परळीला शुभ चरण लागतां सज्जन गड झाला !
जपुनि ठेविली शिवथर घळिला पुण्याची ठेव !
समर्थचरणावरी लोळती अजुनि किती देव !
प्रथम लावुनी हृदयीं राष्ट्रप्रेमाची ज्योत,
जागा करि जो निद्रेंतुनि तुज रामदास पंथ.
त्या पंथाचें आद्यपीठ तव उर्वशीचें कांठीं,
तुला लाधलें, महाराष्ट्रा तव पूर्व पुण्य गांठीं !
त्या पंथाचा एक एक रणवीर, शूर, गाजी,
गांवोगांवीं मेलीं हृदयें करी पुन्हां ताजीं !
त्या पंथाची साथ करित तो देहूचा वाणी,
ज्याची वाणी येतां कानीं डुले चक्रपाणी

त्या पंथाचा आद्यग्रंथ जो लिहिती कल्याण,
चाफळखोऱ्यामधें उघडली सौख्याची खाण !
परमार्थाचा, व्यवहाराचा, सुंदर आदर्श,
दासबोध हा ग्रंथराज तुज देत सदा हर्ष.
रामदासपंथाचा पहिला करडा उमराव,
कल्याणांचें नांव थोपवी कामाची घाव !
रामदासपंथाचा पहिला, वीर राजबिंडा,
रायगडाचा राया रोवी स्वराज्य-सुख-झेंडा !
परदास्याची धूळ उडविली शिवबांनीं दूर !
स्वातंत्र्याचें लेणें दिधलें तुला पुरेपूर !
छत्रपतींचा कर्मयोगही उज्ज्वल, निष्काम,
भगवा झेंडा अझुनि सांगतो शिवबाचें नाम !
समर्थचरणीं शिवरायांची भक्ति किती सार्थ,
साक्ष देत तें रामघळीला आज कुबडि तीर्थ !
गो-ब्राह्मण-प्रतिपालक, स्वराज्यसंस्थापक प्रभुला,
शाहीराचा मुजरा पहिला त्या शिवभूपाला !
महाराष्ट्रा, तव आकाशांतिल शुक्राचा तारा,
अजिंक्य ताऱ्याजवळी बसला सुंदर सातारा !
महाराष्ट्रा, तव कोंदणांतला हिरा चमकणारा ?
शिवशाहीचें हसरें वैभव, सुंदर सातारा !
स्वराज्य बाजाराची पहिली स्वतंत्र ही पेठ !
स्वराज्य देवीच्या गालावरि हा सुंदर तीट !
प्रेमळ दृष्टी साताऱ्यावरि या सज्जनगडची !
पडते प्रेमें कृपासाउली त्या यवतेश्वरची !

सातान्याच्या पाठीशीं हा उंच अजिम्-तारा,
शिवशाहीचा भव्य कळस हा नभीं तळपणारा !
इकडे राखी द्वार जरंडेश्वर साताऱ्याचें !
सज्ज सदाचें धनुष्य तिकडे भार्गवरामाचें !
अजिंक्यतारा सुखें खेळवी उर्वशीस इकडे !
कृष्णामाई वेढा घाली जरंड्यास तिकडे !
उभा जरंडेश्वर पाठीला, कृष्णा पायाशीं,
इकडे कोमल वेण्णा बाला खेळे माहुलिसी !
गजांत लक्ष्मी, अखंड वैभव या साताऱ्याचें,
दिमाख दसऱ्याच्या स्वारीचा उत्तरेंत नाचे !
हात जोडुनी उभे निरंतर महारुद्र अक्का,
चाफळच्या श्रीरामाभोवति, दरडाविति शङ्का !
बुक्का उडवुनि आनंदानें हो पंढरि काळी !
उडवुनि भंडारा देहावरि पाली हो पिवळी !
हरिनामाचा गजर होतसे श्रीरंगापुढती !
खंडेरायापुढतीं मुरळ्या सदा नाचताती !
औदुंबरचें नित्यनिरंजन पूजिसि तूं भक्त,
नृसिंहवाडी समूळ पळवी खोडसाळ भूत !
खेडोंपाडीं खडे टाकले सदैव बजरंग,
कुस्त्यांचा फड करितो गांवीं जत्रेला दंग !
रानफुलांची माळ सावता माळी तुज घाली !
नाचे गोरा मोदें, मेलें पोर पदाखालीं !
सजीव रेडा कापुनि भरितो हंडि रंगनाथ !
उठवी मेली घार अंबरीं दासांचा नाथ !

भावभक्तिनें नामा फिरवी दगडी राऊळ !
जनाबाइसह गाणीं गातो नंदाचा बाळ !
वेद बोलवी रेड्याकरवीं संन्याशी पोर,
साध्वी मुक्ताबाई लाजवि संन्याशी थोर !
शांति ब्रह्माचा तो पुतळा भक्त एकनाथ,
घरांत ज्याच्या पाणी भरितो सुखें रमाकांत !
ब्राह्मण लुटिती दामाजीचें भरलें कोठार,
एकनाथ मृत पितर जेववी विप्रांचे थोर !
छत्रपतींचें राज्य वाढलें समर्थ-झोळींत !
पंचप्राणांची पूर्णाहुति संभाजी देत !
जबडा फाडी वाघाचा तो जवान संभाजी,
मोगल सेनासागर उसळे टक्कर दे जिंजी.
मर्द धनाजी गनिमी कावा लढवी रणगाजी,
सैरावैरा मोगल पळवी जवान संताजी.
कल्पित छाया बघुनी उदकीं थरारती वाजी,
येत धनाजी वदतां पळती मोगल रणगाजी.
'कृष्णा' घोडी कडेकपारी उधळे चौफेर,
छत्रपतींच्या चितेंत घाली उडि "मोत्यां" वीर.
तानाजीला बरकत देई विजयी 'यशवंती'
पाटिलबोवांची रणिं चमके 'बिजली' पानपती !
श्रीधर कविची अलंकारमय रसाळ रसवंती,
हरिविजयांतुनि वाहे तुझिया कृष्णेच्या प्रांतीं !
भक्तिरसाची निर्मल गंगा, मुक्तेश्वर वाणी,
करुणरसानें सदैव आणी तव नयना पाणी.

यमक्या वामन पंडित चढवी यमकाऽलंकार,
भाव उसळला कविता बाला हृदयीं गंभीर !
मयूरपंडित भक्तिरसाच्या कवितेचा श्वास !
भारत, रामायण मंथुनि तुज देई रत्नांस.
नाथ, दास, ज्ञानेश, तुका हे मूर्तिमंत वेद,
गोविंदाला वेड लाविती महाराष्ट्र वेद.
सह्याद्रीच्या, सज्जनगडच्या डोंगराळ देशा,
साताऱ्याच्या, श्रीकृष्णेच्या, महाराष्ट्र देशा.
दिल्लीहुनि ये साताऱ्याला राज्याची हाव !
साताऱ्याहुनि पुण्यपत्तनां शौर्य घेइ धांव !
छत्रपतींची दमली पुढती विजयी समशेर !
पेशवाइची बाहिर आली निजली तरवार !
रत्नागिरिवर उगम पावली शौर्याची गंगा !
अलोट लाटा अफाट करिती उत्तरेंत दंगा !
दख्खनची ही टोळधाड मग करी बेचिराख
उत्तरेंतला दिमाख घाशी बाजिपुढें नाक !
दख्खनचा हा सिंह लोळवी दिल्लीचें धूड !
बंगाल्याचें नरडें फोडी गरुड काडकाड !
अटकेवरती नाच नाचला दख्खनचा भाला
हिंदुस्थानां दरडावी मग दख्खनचा डोळा !
हा रणगाजी हिंदुस्थानीं करितो थैमान !
सुंदर मस्तानी परि करिते याला बेमान !
वरची सुंदर चपला भेटे शौर्यसागराला !
गंभीर सागर उसळे बघतां चटकचांदणीला !

विश्वासाच्या, मस्तानीच्या सुंदरशा देशा,
बाजि, धनाजी, मल्हारीच्या आडदांड देशा.
पुण्यपत्तनां रक्षयाला, पुण्याचा कोट,
आळंदीचे संत देहुचे, बांधतात नीट !
गिरिच्या बाला, सान टेकड्या खेळति भवताली,
शृंगाच्या रम्य कल्पना जणुं वीराजवळी !
शनवाराच्या वाड्यामध्यें श्रीमती खेळे !
सौंदर्यानें, मंजुळ गानें, हिराबाग, डोले !
डोकें लढवी चातुर्यानें तो नानावाडा !
वानवडीला नाचे उमदा सदा लाख घोडा !
श्रीमंताचा वाडा बघतो मोठ्या डौलानें !
मस्तानीचा महाल पाही खालीं लज्जेनें !
सरस्वती, श्री, शौर्यदेवता यांचें माहेर,
भारतभूला शहरपुण्याचा सुंदर आहेर !
शहरपुण्यानें धुळीं मिळविले मोगल रणगाजी !
परदेशी चोरांना अजुनी पाणी हें पाजी !
दिल्लीच्या तख्ताचीं शकलें सदाशीव उधळी !
पानपतावरि लाख बांगडी दुर्दैवें फुटलीं !
ऐश्वर्याचा कळस मोडुनि पानपतीं पडला !
राघु भरारी अरिचीं [illegible] अटकेला !
रडूं नको, प्रिय सख्या, [illegible], महाराष्ट्र देशा,
सूर्यावरती मेघ धांवती, कमूनशिवी देशा !
घरीं लेखणी खेळे, [illegible] स्वार,
नाना बघती घरात, [illegible]रि स्वार.

पुन्हां पुण्याला धरुनि आणली विजयश्री रुसली,
पाटिलबोवावरी तारका नशिबाची हंसली !
खर्ड्यांवरतीं माधव लिहितो तव वैभव-गीत !
कोरेगांवीं बाजीरावी गेली मातींत !

उभा रायगड, निजे भवानी, महाराष्ट्र, आतां,
हिंदुस्तानीं गाजे तुझिया लेखणिची सत्ता !
दीड शहाणे बारभाइच्या कारस्थानांत,
पाटिलबोवा डाव खेळति हिंदुस्थानांत.
पुण्यपत्तनीं गोळा झाले तमाम सरदार,
श्रीमंताचा विवाह, हौशी नाना करणार !
पेशवाइच्या ऐश्वर्याचा पाहिलास पूर !
महाराष्ट्रा, तूं पाहिलास ना सोन्याचा धूर !
धारवाडि न्यायाचा काटा धरी रामशास्त्री,
कारंजावरि उडी घेतसे पेशवाइ रात्रीं !
समरभूमिवर मल्हारी हा उडवी कल्होळ !
दर्यावरती करी सावळ्या दंगा तांडेल !
सौंदर्याच्या, संपत्तीच्या हे हंसऱ्या देशा,
रणीं लढोनी. घरीं हसावें हाच तुझा पेशा.
समरीं संगर खेळुनि दमले यापुढती हात !
महाराष्ट्रा, तव मस्तक करि मग जगावरी मात !
धनंजयाला सांगे गीता समरीं गोपाळ,
सांगे गीतारहस्य तुजला तुरुंगांत बाळ !
वाणी, करणी एक जयांची असे लोकमान्य,
आर्यनिवासस्थान शोधिती हे विद्वन्मान्य.

रत्नागिरिचें रत्न चमकलें हिंदुस्थानांत !
प्रभा तयाची दूर फाकली साऱ्या विश्वांत !
अज्ञानासह ज्ञान झगडतें, शक्तीसह युक्ती !
परदास्याचें नरडें दाबी देशाची भक्ती !
स्वार्थाला दे लाथ, सुखाच्या मानेवर हात !
कर्मयोग निष्काम आचरी हा भगद्भक्त !
महाराष्ट्राचा पंचानन हा बाळ टिळक वीर !
शहर पुण्याचा पंचप्राण हा लोकमान्य धीर !
शिवरायांची कर्तबगारी, दासांचें ज्ञान,
महाराष्ट्रा, तुज तारायाला आलें धावून !
विद्वन्मणि, नरशार्दुल, योगी, भक्ता, टिळकवरा,
महाराष्ट्राच्या अनभिषिक्त भूपाला हा मुजरा !
राजकारणी, मुत्सद्दी हा महाराष्ट्रप्राण
स्वार्थत्यागी वीर अरींची करि दाणादाण !
विद्वानांच्या, भिषग्वरांच्या, वक्त्यांच्या देशा,
धुरंधरांच्या सचिलदेशा, लोकमान्य देशा.
शहर पुण्याचा वीर केसरी जेथें गुरगुरतो,
अचुक मारुनी 'भाला' फेकी 'काळ' तेथ हसतो,
विनोदपंडित श्रीपादांची हंसरी रसवंती,
'मनोरंजनाकरितां' धांवे सचित्र तंव जगतीं.
भारतगौरवमाला गौरवि तुला महाराष्ट्रा,
अभिनव काव्याची माला तुज हसवि महाराष्ट्रा.
'विविधज्ञानविस्तार' करी तव ज्ञानाचा जेथें,
'रत्नावलि'चें सुंदर लेणें कवितेला तेथें.

अखंड कीर्ति कविवर गाती तुझी मायदेशा,
अजाण कविचा मुजरा घे हा महाराष्ट्र देशा.
कविरत्नांच्या पूर्ण काव्यमय महाराष्ट्र देशा !
कवी मनोहर तुजवरि बांधी उन्नतिची आशा !
अनंतफंदी नरजन्माचे कटाव गातात,
विनायकाच्या जोहाराची आग पेट घेत !
उसळे ' स्फूर्ती ' मनीं, ' तुतारी ' वाजवि हस्तानें,
' नवा शिपाई ' ' श्रेय हरपलें ' शोधी 'प्रतिभेनें.
मनीं ' झपूर्झा ' खेळे, ऐके ' बोल सतारीचे ',
बघुनी ' म्हातारी ' केशवसुत काव्य ' भृंग ' नाचे !
' प्रणयकथन ' करुनियां सांगतो मग ' आम्ही कोण ' !
गोविंदाग्रज कविच्या गुरुला सद्भावें नमन.
' संध्या ' रागें रंगुनि उसळे ' अरुणा'च्या हृदयीं !
' निर्झर ' तीरीं 'फुलराणी'ला बालकवी गाई !
सुष्टिसतीचा प्रेमळ गायक बाल ' धर्मवीर ',
उदास गोविंदाग्रज हृदयां देत जरा धीर !
गात ' चिमुकली कविता ' ' मुरली ' ' राजहंस निजला ',
' एकाद्याचें नशीब ' रडवी ' अल्लड प्रेमाला '.
गोड ' गुलाबी ' कोडें सुटलें ' प्रेमपाठ ' गांता !
एका शब्दासाठि विनंती ' प्रेमकाळ ' येतां !
' पुनर्जात प्रेमास ' लागली ' हुरहुर ' ' ती कोण ' !
' कधीं ' जिवाची बाला देइल ' प्रेम आणि मरण ' !
' कृष्णाकाठीं कुंडल ' सुचवी ' विचार ' ' घुबडाला ' !
' दसरा ' देतो ' विरामचिन्हें ' ' स्मशानगीताला ' !

'वेडा' पुसतो 'काय करावे' 'निर्दय बालेस'!
'पहिलें चुंबन' घेतां गाई 'त्याच तारकेस'!
'गोड निराशेपुढें' ठाकला 'प्रेमप्रलयकाळ'!
दीन मनोहर, कविराया, तव पायांची धूळ!
महाराष्ट्रा, तव सात्त्विक प्रेमाचा हा शाहीर,
रसवंतीला गोविंदाग्रज कविचा आधार!
बाल कवीच्या, श्रीगोविंदाग्रजकविच्या, देशा
कवि कृष्णाच्या, पूर्णकाव्यमय, हृदयंगम देशा.

'उषःकाल' उठवीत तुला मग 'सूर्योदय' फुलवी,!
'मध्यान्हीचा सूर्य' बंभनें, महाराष्ट्रा, नटवी!
'गड आला पण सिंह चालला' हो 'वज्राघात',
'आजकालच्या गोष्टी बघतां' हंसे चंद्रगुप्त!
'मायेचा बाजार' भुलवितो 'रूपनगर कन्या',
'मी' मी करितां 'असेंच जग हें' गुंगवितें मान्यां!
हरि नारायण नवलकथांची माळ तुला देत,
'दिव्य भयंकर' 'कोण परी हें घेतो लक्षांत'!
जिथें कडाडे श्रीकृष्णांची थरारती वाणी,
तिथें गडकरी तुझिया नयनां आणितात पाणी!
जेथें केलें श्रीकृष्णांनीं 'बंड नायकांचें'!
तेथें झालें नरसिंहांच्या 'बंड तातयाचें'!
'कृष्णार्जुन युद्धांत' फडकला 'प्रेमध्वज' जेथें!
'एकच प्याला' तेथें रडवी 'पुण्यप्रभावातें'!
'वीरतनय' झुंजतो संगरीं 'मूकनायकाशीं'!
'वधूपरीक्षा' कारण झाली 'प्रेमशोधनाशी'!

ग्रंथ संग्रहालय ठाणे
8093

‘ भावबंधना ’ साठीं झुरतो जयंत संन्यासी !
‘ तोड माळ ही ’ म्हणे ‘ शारदा ’ ‘ जन्मरहस्यासी ’
गंधर्वांचें गाणें कोमल, मंजुल, तान जिथें,
शुद्ध पहाडी कडाडती घे केशव तान तिथें.
‘ माधव ’ राष्ट्रप्रेमी शाहिर, प्रेमळ ‘ आनंद ’
‘ अरविंदाची ’ अजुनी फुलते कळी मंदमंद !
नव्याजुन्यांच्या रसवंतीचा हा बंदा दास
रानफुलांची ओंजळ वाही तव साहित्यास !
तुला गावया सजला गोविंदाग्रज शाहीर,
प्रतिध्वनी ये हृदयामधला केवळ बाहेर.
आकाशाची कुऱ्हाड पडली तोच तुझ्यावरती !
अश्रु वाळले नाहीं अजुनी तुझ्या मुखावरती !
वागीशांची नाचे; बघुनी तुजला, रसवंती
कशी न येईल अजाण हृदयां प्रेमाची भरती ?
सद्भक्तांची भक्ती येथें, योग्यांचें ज्ञान !
सच्छिष्यांची सेवा येथें, कर्णाचें दान !
नरवीरांचें शौर्य खेळतें येथें दिलदार !
संपत्तीचें कुबेर उधळी येथें भांडार !
सह्याद्रीवर सदा खेळतो वसंत पुष्पांचा,
देशावरती वर्षा वर्षे तो धनधान्याचा !
सौंदर्याला पूर येतसे, येथें गंभीर !
गाणीं गाती सात्विक प्रेमालागीं शाहीर !
गंधर्वांचे आलाप कोमल येथें घुमताती
कलाविशारद सरस्वतीचे भक्त येथ रमती !

गुणगणमंडित, पवित्र, सुंदर, शूर, मायदेशा
गोड करूनि घे, मनोहराची भक्तीची भाषा !

१९२१, बनारस

---

## मायदेश

स्वार्थावरी लाथ, देवावरी चित्त, धर्मावरी भिस्त, न्यायीं रती !
कर्तव्यभक्ती सदा, धर्मनीति, तशी राष्ट्रभक्तीहि आचारिती !
ऐसे महाभाग ज्या मायदेशामधें कोणताही असो देश तो !
उत्कर्ष पावेल तो देश, ते लोक, तो धन्य भूभागही वाटतो !

---

## छत्रपति

नमो नमो श्री स्वतंत्र देवी, नमो भरतभूमि
स्वातंत्र्याची ज्योत सदोदित जळो हिंदधामीं !
धांव धांव रे, धाव दयाळा काळ कठिण आला !
स्वातंत्र्याचा धुगधुगणारा प्राण कंठीं आला.
दास्याच्या पंकांत बुडाली भरतभूमि गाय,
अन्नाभावीं काय रोडली, मोकलि ही धाय !
अपमानाचा पाऊस धो धो ! दुःखाचा वारा !
मेघ फितूरी स्वतंत्र-सुख रवि गिळिती बघ सारा !
सहानुभूतिच्या आकाशानें कृष्णवदन केलें !

जुलुमी मारा-वर्षावानें ऐक्य रोप मेलें !
हे अनंत नभ हो भुवन !
पवन हें अन्न !
दशदिशा वसन !
शौर्याची ज्योतहि विझली, त्वेषाची विजली थिजली !
मानाची लाट ओसरली !
स्वतंत्र मित्रा कपटी शत्रू राहूनें गिळले !
विश्वपालका, देशोद्धरणीं नेत्र काय मिटले ?

* * *

राष्ट्राचा हा धावा फोडी पाझर प्रभु-हृदया !
गडबडली मग कसोटिची प्रभुशांती त्या समया !
भक्त-काम-कल्पद्रुम प्रभुचें मानस गहिंवरलें !
नेत्रांतोनी कृपाबिंदु मग टपटप भुविं गळले !
भारतभूच्या उद्धारास्तव, मंगल विश्वाचें
मंगल करण्या महाराष्ट्रिं मग शिवरूपें नाचे !
स्वातंत्र्याच्या वसंत हांसत सह्याद्रिस आला !
भरती आली स्वातंत्र्याच्या स्वतंत्र कवितेला !
प्रभुचरणानें पवन झाली महाराष्ट्रभूमी,
आनंदाचा कंद वंदनिय नांदे ज्या धामीं !
राष्ट्रास जागृती आली !
चेतना भरली !
शक्ति सळसळली !
जय होईल स्वातंत्र्याचा, बीमोड पुरा दास्याचा,
उद्धार हिंदभूमीचा,

" हर हर हर हर महादेव, " हें गीत मुखें गाऊं
स्वातंत्र्याच्या स्वराज्यरविला अघ्यादक देऊं !

✤ ✤ ✤

दिल्लीपतिची ज्येष्ट कन्यका शिवराया बघुनी,
मूढ जाहली, वांछी व्हावा स्वपति हा स्वमनीं !
" हृदयमंदिरीं, प्रेममंचकीं, सुखशेजेवरतीं
तारुण्याच्या फुलल्या पुष्पें पूजन करूं प्रीतीं
शिवरायाच्या चरणीं अर्पुनि जीवनपुष्पाला !
पुनीत व्हावें शिवसेवेस्तव झिजवुनि कायेला !
शिवमूर्तीचें ध्यान करोनि जन्म सार्थ व्हावा, "
वाटे भोळ्या यवनबालिके शिव निज-सुख-ठेवा !
" परि हिंदभूप शिवराय,
यवनि मी हाय !
काय उपाय !
सौंदर्ये मोहुनि त्याला, भुलवीन वैभवें त्याला !
कोण ना वळे प्रेमाला ? "
भुलली नी प्रेमांध बालिका श्रीशिवभूपाला,
सुंदर रंभा भुलवूं झटली मुनिवर शुकबाला !

✤ ✤ ✤

तारा कुसुमें उडूनि गेली, भू-सुमनें फुलली !
क्षितिजावरती मांगल्याला बालरवी उधळी !
प्रभातकाळीं शुचिर्भूत तो महाराष्ट्र-वीर
गुरुपदकमलांवरी ढाळितो भक्तीचें नीर !
" संसृति-गत अति आधि व्याधि या दुबळ्या चित्ताला
यदा गांजिती, तदा स्मरावें गुरुपदकमलाला !

गोड किती ती ! अहा ! गोड किती स्मृति गुरुरायाची !
गुरुगेहाची ! गुरुसंगाची ! गुरुपदकमलांची !
विस्मृति पडते भोंवतालिच्या सगळया वस्तूंची !
स्मृति--पट--चित्रित गुरुमूर्तीला मनश्चक्षु वाची !
गुरुराय तूंचि आधार,
संकटीं तार,
विघ्न हें घोर,
राज्याचि स्थापना व्हावी, धर्मांचि तारणा व्हावी
यवनांची तळि उचलावी !
स्वराज्य होउनि सुराज्य व्हावें, हेंच ध्येय ठेऊं
स्वातंत्र्याच्या स्वराज्यरविला अर्घ्योदक देऊं.

✢ ✢ ✢

तोंच पातला सुंदर, मोहक, एक यवन वीर,
शिवभूपतिला वंदन करि निज नमवोनी शीर.
कोमल काया, नाजुक बांधा, चंचलता नेत्रीं,
तारुण्याची विजयपताका वदनावरि नव्हती !
बोले, " सम्राटाची कन्या अभिवादन करुनी,
विनवी दासी पुनित करावी सेवा घेवोनी !
तव मुखचंद्रा बघुनी आली हृदयाला भरती !
तव चरणीं हा देह वाहिला, मान्य असो विनती. "
आश्चर्यानें चकित जाहला भूपति शिवराजा,
बोले, " मोंगल तरुणा जाई, निरोप वद माझा
परयुवती माझी भगिनी,
ध्यान सोडुनी,
धर्मि राहोनी,

बंधूसम मजला मानी, उत्कर्ष असो तव भगिनी,
धरिं सदा सर्वदा ध्यानीं,
नीति सोडुनी अनीतिचा तो मार्ग न कधिं सेवूं "
स्वातंत्र्यांच्या स्वराज्यरविला अर्घ्योदक देऊं.

* * *

नेत्र भरोनी आले तेव्हां मोंगल युवकाचें,
मंदिल, तैसा झगा काढितां नवल होय साचें.
तरुण जाऊनी तरुणी बनली नयनमनोहारी !
केशकलापें दिधली शोभा वदनाला भारी !
अनिमिष नयनीं पाहत होती शिवभूपा तरुणी !
भूमीवरती दृष्टि शिवाची जाय तदा खिळुनी !
भूमीवरती टेकुनि जानू, यवन- भूप--कन्या,
वदे, " जीविंच्या जीवा, देवा, शिवराया मान्या,
तव पदकमलीं चित्त भाळलें, जिव वेडा झाला,
जीवित तुजविण उदास, झुरतें तुजसाठीं बाला.

दासी घ्या पदरीं दीन,
यवनि जरि दीन
प्रेम परिपूर्ण, "

कारुण्यपूर्ण ती दृष्टी, त्या कामिक, मोहक गोष्टी,
शिवहृदया करिती कष्टी,
वज्रापरि परि कठिण होय शिवहृदय नवनीताचें !
चारित्र्याचें रहस्य ऐसें लोकनायकाचें !

* * *

शिवहृदयाची कसोटीच ही, सीमा धैर्याची !
ढळली नाहीं दृष्टि शिवाची परि भूमीवरची !
सौंदर्याची, तारुण्याची विलास-भू बाला,
सम्राटाच्या अभिमानासह नत शिवचरणाला !
ऐहिक, चित्तेप्सित सौख्यांचा संगम, कमनीय,
विद्ध करी रमणीची दृष्टी जगताची काय !
श्रीशिव वदले, "ऊठ, ऊठ, मम प्राणप्रिय भगिनी,
महाराष्ट्र वीरांना मोही अन्य न कुणि रमणी।
धर्म सनातन महाराष्ट्राचा देशाची भक्ती,
धर्मी प्रीती ! परनारीस्तव सदा अनासक्ती !
वागवी सदा चित्तांत,
महाराष्ट्रांत,
नीतिची ज्योत
निशिदिनीं प्रकाश दावी, तम पापाचा क्षणिं पळवी
अनीतिचा पगडा उठवी,
देशभक्तिचा, धर्मभक्तिचा झेंडा जगिं रोवूं"
स्वातंत्र्याच्या स्वराज्यरविला अर्घ्योदक देऊं.

* * *

प्रेमयाचना निष्फळ झाली यवन बालिकेची !
सत्त्वपरीक्षा होय शिवाच्या मनोविकारांची !
भग्नाशा ती सात्विक बाला चित्ता आवरुनी
स्फुंदुनि बोले, शब्द न उठती , उर आला भरुनी !
"विजय असो तव सदा, हेंच तुज शेवटचें नमन,"
जाऊं लागे शिवभूपावरि खिळले परि नयन !

" नमस्कार तुज प्रेमळ भगिनी " बोलुनि शिवराय,
नयन झांकुनी चित्तीं स्मरती सद्गुरुचे पाय !

✤ ✤ ✤

चारित्र्याचें तेज शक्तिच्या देइ जाणिवेस,
दख्खनच्या वीराला रुचणें कां बंदीवास.
मग भवानिला वंदुनी,
संधि साधुनी,
प्रभातीं क्षणीं,
पेटाऱ्यामध्यें बसुनी शिव सुटले बंदीतोनी
अरि–करीं तुरी देवोनी !
फसवुनि कपटें कपटी अरिला बंदिपार होऊं !
स्वातंत्र्याच्या स्वराज्यरविला अर्घ्योदक देऊं.

✤ ✤ ✤

आनंदानें सह्याद्री कां फुलला हा आज ?
महाराष्ट्र-भू तनुवरि घाली कां सुम-सुख-सांजे ?
कृष्णामाई घुटमळते कां गिरिच्या पायाशीं ?
साद घालिती आनंदानें कोणास्तव पक्षी ?
घंटा, भेरी, शिंग, नगारे, ढोल, वाजतात,
सनईचा स्वर मंजुळ गेला मिसळोनी त्यांत.
भूदेवांचे वेदघोषही कर्णीं घुमतात,
शाहीरांची थाप डफावर आली रंगांत ?
महाराष्ट्राचा कलिजा प्यारा, खूण रामदासी,
भगवा झेंडा डौलानें कां डुलतो आकाशीं ?
महाराष्ट्राची विघ्नमालिका आज काय सरली ?
आनंदाची लाट उसळली रायगडीं कसली ?

पातले शिवाजी भूप,
दावुनी धूप, फसवुनी खूप,
दिल्लीच्या पातशहाला, महाराष्ट्र आज
गहिंवरला ! अभिषेक काल हा आला !
चला, चला, सोहळा सुखाचा डोळ्यांनीं पाहूं
स्वातंत्र्याच्या स्वराज्यरविला अर्घ्योदक देऊं.

✤ ✤ ✤

रायगडावर सडा घातला आनंदाश्रूंचा !
अस्मानाला भिडे चांदवा गुढ्या तोरणांचा !
कनकभूषणीं, दिव्याभरणीं सजवुनि गजपंक्ती
शिलेदार, सरदार, शिबंदी स्वार, सज्ज होती.
अखंड मंगल वाद्यें, झडती तोफांचे बार,
अभिषेकास्तव रायगडावर भरला दरबार.
विद्वद्रत्नें, द्विजवर, योगी, भक्त, रामदासी,
प्रसन्नहृदयें आले द्याया आशिर्वचनांशी.
करीं आरती घेऊनि आल्या सुवासिनी तेथें
भाट, बंदिजन, शाहिर, जमले आनंदित चित्तें.
देशदेशचे वकील आले बहु इतमामानें,
मानकरी, दरबारीं, जमले सजुनी डौलानें.
पातले नभीं रणगाजि !
वीर तानाजी,
शूर प्रभु बाजी,
ते दोस्त शिवाचे सच्चे, रणसिंह
महाराष्ट्राचे, अभिमानी शिवशाहीचे,

दण्डक विपिनीं रामराय जणुं होती अभिषिक्त
पुनरपि आले दोस्त जिवाचे, दाशरथी भक्त!

✣ ✣ ✣

वाद्यांचा कडकडाट झाला, तोफा धडधडती,
जयजयकारें दिशा सर्वही दणाणुनी जाती.
अखंड वाहे रायगडावरि वेद–घोष--गंगा!
वाहे आशिर्वादांचीही मूक चंद्रभागा!
भूदेवांचें आशिर्वच शिरिं सविनय घेवोनी
समर्थचरणां मनीं ध्यायिलें श्रीशिवभूपांनीं.
पवित्र, निर्मल सागर तीर्थें भरल्या कलशांनीं,
यथासांग मस्तकीं सिंचिलें देव ब्राह्मणांनीं.
भवानिला वंदिलें शुचिर्भुत श्रीशिवरायांनीं
माय जिजाई पदां न्हाणिलें आनंदाश्रूंनीं!
अमृतसिद्धि योगावरती, शुभ, मंगल काळीं
महाराष्ट्राच्या मनोरथांची पूर्ण सिद्धि झाली!
तो धन्य रायगड होय! जिजाई माय,
धन्य शिवराय,
महाराष्ट्र धन्य बहु झाला! अभिषेकुनि
शिवभूपाला, ‘ जय छत्रपतींचा ’ बोला!
दुमदुमला जयनाद सह्यगिरि दरी कंदरांत!
स्वातंत्र्याची उषा हांसली! पळे दास्य-रात!

✣ ✣ ✣

राजद्वारीं उभी सुसज्जित हय, वारण पंक्ती
स्वार शिबंदी, राउत, भालाईत वाट बघती.

सुवर्णयष्टी करीं घेऊनी राजद्वाराशीं
भालदार, ते चोपदार, त्या उभ्या दास दासी.
अंतर्भागीं तमाम भरला स्वतंत्र दरबार
वकील आले मानकरी मावळे, ऐटदार.
तोंच ऊठली बंदिजनांची विजयी ललकारी
' निगा रखो शिवछत्रपती-की ' नरेंद्र दरबारीं.
दिली खडी ताजीम सभेनें सविनय, सप्रेम,
पाहुनि दिपली सभा मनोहर, शिवमूर्ती श्याम.
मुखीं झळाळे शिसोदियाचें रक्त राजतेज,
राजकारणी, मुत्सद्दी, नरपुंगव शिवराज !
महाराष्ट्राचा वीरकेसरी, शिष्य समर्थांचा,
गो-ब्राह्मण-प्रतिपालक, कर्दनकाळ अविंधांचा.
भरजरिचा पोशाख, त्यावरी रत्नालंकार,
शिरस्त्राण शिरिं, कटिला लटके भवानि समशेर.
सुवर्णसिंहासनीं मढविल्या माणिकमोत्यांनीं,
छत्रचामरें ढळती तेव्हां शिवभुजावरुनी !
साभिमान प्रिय दरबाराची घेतांना प्रणती,
हास्य चमकलें, शांत, भव्य शिवराजमुखावरती.
मुजरा केला छत्रपतींना पंतप्रधानांनीं,
सेनापतिंनीं, नंतर सगळ्या अष्टप्रधानांनीं.
कुर्निसात मग लवुनी केला म्लेंच्छ वकीलांनीं,
सलाम केला, हात बांधुनी, श्वेत फिरंग्यांनीं.
अनामिकांचा ' रामराम ' ही मोदें शिव घेती,
माय जिजाई, गुरुजन, द्विजवर आशिर्वच देती.

नजराणे, पतिभेट जाहली वकिलांची पुढती,
वस्त्र-भुषणें, विडा दक्षिणा विप्रां शिव देती.
विडे दिले, पोषाख, बक्षिसें, मावळ सेनेला
अन्नदान संतर्पण केलें दीन अनाथांला.
दारिद्र्य जाय विलयास !
पडे सुखरास
तृप्त हो आस !
दुःखानें काळें केलें ! परदास्य दिवंगत
झालें, स्वातंत्र्य सुखानें हंसलें !
सुवर्णतूला झाली, राजे रंकाचे बनले !
दिव्य महोत्सव ऐसा कीं तें रामराज्य गमलें !

तळहातावरि शीर घेउनी, रात्रंदिन खपुनी,
श्रीशिवजीवित सार्थक झालें स्वराज्य स्थापोनी.
असो; मानसीं छत्रपतींची ठेवुनि नित्य स्मृती,
उद्योगानें सतत करावें तनुसार्थक जगतीं.
महाराष्ट्राच्या रायगडाच्या फत्तरांत अजुनी,
'स्वराज्य' ऐसे शब्द उठति, जा, ऐका कोणी !
फत्तर केवळ निर्जिव सृष्टी 'स्वराज्य' तो बोले
सजिव माणसें आम्ही कां मग झांकावे डोळे ?
रडूं नको शिवशाही विभवा, रायगडा, पूस
डोळे, पुनरावृत्ति होइल इतिहासीं खास !
महाराष्ट्र प्रभूचा प्यार
शूर, दिलदार,
शांत, गंभीर,

...ग्रंथसंग्रहालय ... नं. ... ता. ... ता. मे.

हा देश रामदासांचा, तानाजि, बाजि,
शिवबांचा, प्रिय प्राण लोकमान्यांचा !
भारतभूला स्वातंत्र्यानें घालिल हा न्हाऊं !
' मनोहराला ' ला झालें केव्हां महाराष्ट्र पाहूं !

१९१२, बनारस.

---

## सारंगीवाला.

रम्य रजनी सुप्त सारी,
वायुची ये मंद लहरी,
मधुमास चंद्रिका जगीं वाहवी आनंदाचा पूर.
श्रांत रमणी रमण हृदयीं
सुप्त, स्वप्नें गोड पाही
अभिसारिकेस हा प्रभात-तारा सांगे ' चल हो दूर ' !
विश्व निजलें, प्रेम फुललें !
शांतता साम्राज्य सगळें,
आनंदसमाधी जगास लागे, हृद्गार हुरहूर !
शांततेच्या रामप्रहरीं
कोण आला हा भिकारी ?
करि झोप मोड हा करुणरसाची गाउनिया कुरकूर !
वादनाचे ढोंग सारे
पोट भरण्याचे पसारे
धिःकार तयाना कला विकिति जे गानकुशल वाक्शूर.
गात फिरतो संगिताला
पोट आपलें जाळण्याला

या हाकुनि त्याला फोडुनि त्याची सारंगी बेसूर.
आम्रराई, माळरानें,
भरुनि टाकी गायनानें,
निःस्सीम भक्ति जर वाग्देवीवर काय तुझा मगदूर !
गायनाच्या घोडदौडी,
करुनि गाई आत्म-प्रौढी,
हा मूढ आम्हाला देत इशारा आत्मश्लाघी बाक्शूर !
किरण नाहीं ज्या सुखाचा,
प्रेम-वीणा झंकृतीचा
रव पडे न कानीं, गाती गाणीं गायक ते भेसूर !
कोरडीं हीं भावगीतें,
बेगडीं तैशीं सुनीतें,
चमकती दृष्टिच्या पुढें शलाका, रडगाण्या ये पूर !
राजशाला, बंदिशाला,
भासली कां एक तुजला !
जा, निर्जन विपिनीं मोड तुझी ती सारंगी बेसूर !

१९२२, मुंबई.

---

## माता कीं कांता

हास्य सुखाचें मुखीं विलसतां दृष्टी वळते सखीकडे !
डोळे भरुनी येतां दुःखें मन मातेस्तव हो वेडें !
संपत्तीच्या हंसऱ्या दिवशीं जीवाला सखिचा ध्यास !
आपत्तीच्या रडव्या रात्रीं मातेवर सगळी आस !

क्षणभंगुर स्वर्गात नांदते राणी हृदयाची-कांता,
चिरंजीव जगतांत घालिते पांखर मायेची, माता !
वसंतकाली, चटक चांदण्या हृदयीं धरितो अस्मान !
वर्षाकाली, राख फासुनी रडे सारखा बेमान !
हृदयदेविला घाली तारुण्याची रसवंती साद !
गदार्त वार्धक्याची भाषा आईचा घेई नाद !
तारुण्याचा वसंत भुलतो सुंदर ललना सृष्टीला !
शिशिर हळहळे वार्धक्याचा स्मरुनी प्रेमळ मातेला !
जुनी पुराणी विसरुनि माता नवीन कांतेच्या मागें
यौवन धावे ! परी, 'मनोहर' वंदी माता अनुरागें !

१९२१, बनारस

---

## पूर्वीं आणि आतां

हजार फसव्या जीवामागें फिरणें सरलें या पुढती !
दृष्टी आतां खिळली एका सुंदर जीवावरती !
नैराश्याचें गाणें सरलें ! झालीं दुःखें दूर
आशा हासे कवितेसंगें प्रेमाला ये पूर !
अश्रु वाळले ! दीर्घ उसासे सरले सगळे आतां !
आनंदाचा सडा शिंपिते हृदयावरती कांता !
प्रेमाच्या बाजारीं सरली पांथस्थाची मुशाफरी !
प्रीतीचा सौदागिर थांबे गृहसौख्याच्या दारीं !
जीवनरामायणीं लागलें आनंदाचें कांड !
दमला लढुनी कर्मक्षेत्रीं योद्धा तरणाबांड !

प्रेमसुखांची माळ पसरली पूर्वीं रानोमाळ !
हृदयाच्या राणीस वाहिलें आज मनाचें फूल !
प्रेमासाठीं कितीं विनविलीं कठोर हृदयें पूर्वीं !
प्रेमदेवता हास हासुनी पुनः सुखाला उरवी !
कल्पनेंतली अंधुक तारा प्रेमाऽऽकाशीं दिसली
पूर्वीं जी, ती चटक चांदणी आतां हातीं आली
सखी जिवाची सदैव खेळे हृदयाच्या बागेंत !
मनोहराच्या मुशाफरीचा केव्हां होइल अंत ?

१९२१, बनारस.

---

## विनंति

बाजार प्रीतिचा तव हृदयीं भरलेला
वेल्हाळे ! सौदागिर प्रेमोत्सुक आला !
मधु-हास्य-सुधेचा होऊं दे वर्षाव,
चिर निराश हृदयीं वसंत नाचवि दिव्य.
ती प्रेमरसाची दृष्टि एकदां टाक,
होतील युगांचे नग दुःखाचे खाक !
तूं सुंदर चपला या कृष्णाऽऽकाशाची !
कल्पना गोड तूं कविच्या प्रिय काव्याची !
वाहिलीं जिवाचीं सुमनें एकांतात,
प्रीतिला पुजावें कैसें बाजारांत !
ते गोड बोल, तव गोड राजसे, बोल
घे मनोहराच्या जीवाचेंही मोल.

१९२१, बनारस

---

## सांत्वन

कुठवरि आतां रडशिल ? वेड्या ! जीवा डोळे पूस !
होणारें होणार, हास वा दैवावरती रूस !
उत्कंठेनें वाट बघावी येत्या सौख्याची !
औदास्यानें वाट धरावी मरत्या आशेची !
होणारें ना चुकेल, मग या जीवाला कां त्रास !
नसत्या आशा सौद्यासाठीं उगीच वासाधीस !
जीवांचेंही मोल देउनी सुख-सौदा जर ठरता,
महर्गता कधिं सौख्याची ना भेटायाची जगता !
भोग भोगिल्यावाचुनि नाहीं सुटावयाचा जगतीं
मनोहरा कां विषण्ण होसी ? नैराश्याच्या रातीं !

१९२२, बनारस.

---

## रांगोळी पुसलेली पाहून

होती द्वारें बसून काढित सुखें चित्रें कुणी बालिका,
रेखी गोष्पद, पद्म, सोज्वळ तशी रांगोळिनें स्वस्तिका,
होता खेळत मंद वायु कुरळ्या केशासवें कौतुकें !
हांसे बालरवी मुखीं खुलविण्या त्या कुंदपंक्ती सुखें !
नाना चित्रविचित्र रंग भरतां तें शोभलें प्रांगण,
रांगोळी मग पूर्ण होय, खुललें त्या बालिकेचें मन,
चित्रें पाहुनि एक एक मग ती बाळा मनाशीं हंसे,
चित्राच्या चिमण्या जगांत रमली, प्रत्यक्ष हो नाहिंसें !

आला, तों सहसा भटिंगण त्वरें तेव्हां कुठोनि तरी,
रांगोळी रमणीय, पायीं तुडवी उद्दाम तो सत्वरी,
मातीला मिळतां क्षणांत सगळी विच्छिन्न चित्रावली,
बाला ओरडली बहूपरि, जलें नेत्रांमध्यें साचलीं !
ऐकोनी रुदनास उर्मट तदा हांसे बहू भेसुर !
आळेला पथ आक्रमीत पुढतीं मग्रूर गेला नर !

* * *

—ऐसी नित्य मनोरथांस कुतुकें आशा मनःप्रांगणीं !
चित्रे पाहुनि सौख्ययुक्त असली हांसे मनाच्या मनीं.
भावी सौख्य मनोरथांस तुडवी दुर्दैव तें निर्घृण !
आशा मावळते कधीं न, रडतें दुःखें बिचारें मन !
" साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे ! "
रांगोळी पुसली बघून नयनीं दुःखाश्रुधारा गळे !

१९२१, सातारा.

---

## जीवनास—

—परी, जीवना, आयुष्याचे असेच दिन कां जायाचे ?
आशा थकली ! पुसुनी पाणी डबडबलेल्या डोळ्यांचें !
निष्प्रेमाच्या शेजेवरती तळमळतां परदेशांत.
भावि सुखाच्या संसाराचें स्वप्न हांसवी हें चित्त !
परी उघडितां मिटली दृष्टी, धक्का बसतो जीवाला,
प्रत्यक्षींचा रंक हांसतो मनोरथांच्या राजाला !
डोळे झांकुनि हृदयपटावरि अनुपम चित्रें रेखावीं
डोळे उघडुनि अश्रुजलानें सर्वेच पुसुनी टाकावीं

आशा थकली ! चित्रें विरलीं ! डोळ्यांचें पाणी अटलें !
मनोरथांची उडी थांबली ! फूल मनाचेंही सुकलें
वर्तमानचीं जिवंत भूतें, परी मनाला छळितात !
भविष्य मांत्रिक दमला म्हणुनी सौख्याचे मेले मंत्र !
सखी जिवाची गेली, कुठला विरह ? परी मानस वेडें !
फसवायाला मना बांधितें मनोरथांचे नव वाडे !
अंधारांतुनि दुर्दैवाच्या लागतात ठेचा हृदया !
मनोहराचा जीव कळवळे ! कोणाला येईल दया ?

१९२२, बनारस.

---

## अंतरपाट

मंगलवाद्यांचा गोंगाट,
युवतिजनांचा कलकलाट,
आनंदाचा कडकडाट,
लग्नाच्या वेळीं.
दूर जाहला अंतरपाट,
मंगलाक्षता पडती नीट,
उत्सुक डोळे बघती वाट,
पाहिल्या नजरेची.
नजरा भिडतां हृदयें हसलीं,
सलज्ज बाला बघते खालीं !
वदनावरती दृष्टि खिळली,
प्रेमळ तरुणाची.

बोलतात या नजरा काय ?
लाली गालावरी न माय,
अनिमिष दृष्टी गीतें गाय,
पहिल्या नजरेचीं.

## लग्नसोहळा

परिचय नसतां पूर्वी अगदीं,
नव्या विचारांची मनिं गर्दी,
भावी संसाराची नांदी
मूक मनें गाती.
नजर चुकवुनी बघते वाला,
क्षणीं मिळे डोळ्याला डोळा,
खेळ चोरटा रंगा आला
जनसंमर्दात.
चुकून होतां स्पर्श तनूला,
बहार येई रोमांचाला!
लग्नाचा हा गोड सोहळा
देवा दे रोज.

१९२२, बनारस.

---

## विरह-गीत

कुणा जिवाच्या आधारावरि विरहीं दिन काढावे ?
कोणासाठीं उत्सुकतेनें पाउल घरिं ठेवावें ?
रम्य कुणाचें वदन बघावें जातांना बाहेर ?
देइल आतां कोण रसिक कविकाव्याला आहेर ?

करांत धरुनी कर कोणाचा, परेश पूजावा ?
कुणाबरोबर आयुष्याचा उदास दिन कंठावा ?
सुखदुःखाच्या संसाराच्या फिरत्या चक्रांत,
कोणा प्रेमळ जीवावरती ठेवावी भिस्त ?
प्रभुरायाच्या इच्छामात्रें फिरतां तकदीर,
त्रस्त मनाला देइल तेव्हां कोण प्रीतिचा धीर ?
श्रमलें मस्तक शेजेवरती ठेवावें कोठें ?
हौस विनोदी शृंगाराची, पुरवावी कोठें ?
कोण सुखाची भागी हसतां नशिबाचा तारा,
ऐश्वर्याच्या आकाशाला कोण प्रीतिची तारा !
छबी सुखाची, आनंदानें दावावी कोणां,
बहार कोणासंगें यावा प्रेमाच्या गानां ?
कर्तव्यानें दमल्या जीवां कोण हासवील,
नैराश्यानें बुडत्या हृदया कोण आश्वसील ?
हृदय भरोनी येतां कोणा जीवाला सांगावें,
डबडबलेले डोळे कोणा जीवावरि लावावे ?
अचरट तारुण्याच्या हौशी मावळल्या आज !
कोणा प्रेमळ जीवासंगें मारावी मौज ?
कोण सुखाच्या गानां देइल प्रेमाचा ताल,
ताळ्यावरती कुणी अणावें हृदयाला बेताल ?
सखी जिवाची, निधी प्रीतिचा, सर्वस्वाचें सार
मनोहराच्या हातीं केव्हां, परमेशा, येणार ?

१९२२, बनारस.

## नजर भेट

"मनाच्या प्यार दिलदारा, कधीं भेटाल रणवीरा !
निघेना धीर या जीवा, सुखाचा भंगला पांवा !
सुखाचा स्वर्ग मज दावा ! चला, या प्रीतिच्या गांवा !
कुणाची भीड या हृदया ? दयेला नियम ना सदया !
रडे ही एकली शेज ! मरे या दृष्टिची नीज !
हंसे हा चांद अस्मानीं ! फुलें हीं प्रीतिची रजनी !
मनाला लागली आग ! जळे ही प्रीतिची बाग !
वियोगी तळमळे आस ! जिवाला प्रीतिचा ध्यास !
सुखाची चैन अमदानी, विदेशीं झुरतसे रानीं !"

* * *

"नभीं हा उधळतो वाजी, कुणाचा ? कोण रणगाजी ?
करीं त्या नाचतो भाला, दिसे ही ढाल पाठीला.
निजे ती प्यार कमरेला, बघोनी जीव हो गोळा !
कपाळीं केशरी गंध, जरी मंदील जरतारी !
गडाला पातली स्वारी, जहाल्या थक्क नव पोरी !
भिडे जों नेत्र नेत्राला, मनाचा धीरही सुटला !
सुखाचें सार गंभीर ! रुपाचें गेह भरदार !
दिसे या शीणल्या नयनां, सुखानें उचलिल्या माना !
भमाचें जाहलें चीज, शरीरीं शोभतो साज !
उदेली रात सौख्याची ! मुखांच्या मूक भाषेची !
दयाळा ! याच रातींत, जिवांचा होऊं द्या अंत !

१९२२, बनारस.

## दुर्दैव

" दर्या तुफान अफाट, वरि नाचरी हि लाट !
पाऊस भरमसाट, पुरवीत वात पाठ !
काळोख हाय ! दाट, उमजे मुळीं न वाट !
चल, साजणी, घराला, "
कवळी गळ्यास बाला !

" पसरे हि काळरात ! दावीत वीज दांत !
अंधार अभाळ खात ! रडते अभागी प्रीत !
गेले थकून हात, करि कम्नशीब मात !
चल, साजणी, घराला, "
कवळी गळ्यास बाला !

ओठास लावि ओठ कवळी गळ्यास घट्ट !
डोळ्यांत पाही नीट, आतां पुन्हां न भेट !
बांधी न लग्नगांठ ! जगतांत प्रीत धीट !
जाऊं, चला, घराला
बेभान मर्द झाला !

" दर्यात या फिरावें, दुनियेस वीसरावें,
नयनीं स्वरूप भरावें ! मनिं प्रेमगीत गावें,
प्रिय प्रीतिच्याच नांवें, ऐसें मरूनि जावें !
जाऊं, चला, घराला
बेभान मर्द झाला !

* * *

गेली बुडून नाव, उरलें जगीं न नांव !
" दुर्दैव घालि घाव, मग होइ रंक राव !

जीवा, कशास ह्रांव ? जवळी न प्रेम गांव ! ”
दारुण प्रेमलीला,
रडवी मनोहराला !

(library stamp)

१९२३, सातारा.

---

## धावा

या हो ! गोपाळा, वेल्हाळा, विलंब कां हा केला !
चैत्राची रात, गगनांत, खेळे तारानाथ !
मंजुल हा पवन, दरवळुन, टाकी हें कुंजवन !
पुष्पांची शय्या, प्रभुराया, तुमच्याविण ही वाया
गोकुळ तळमळतें, तडफडतें, कालिंदी ही रडते !
मनमोहन देवा, पद दावा, सौख्यसमाधी लावा !
मुरलीचा सूर, हुरहूर, करील केव्हां दूर ?
या संसारांत, प्रियनाथ, झुरते वेडी प्रीत !
अंत किती बघतां ? या नाथा, चरणावरि हा माथा
वाट बघे बाला, गोपाला, जिव हा झाला गोळा
या हो ! गोविंदा, सुखकंदा, विनवी भोळी राधा
केव्हां भेटेल, घननील, चिरविरह जाळील !
कालिंदीकाठीं, जगजेठी, सत्वरिं द्यावी भेटी.
करुणेची छाया, पसराया, धावा हो प्रभुराया.
विषयाचा ध्यास, हृषिकेश, नाहीं या जीवास,
परि मोहक मूर्ती, सुखपूर्ती, पाहुनि नाहीं पुरती !
प्रभुराया यावें, भेटावें, ‘ मनोहरा ’ सुखवावें.

१९२३, मुंबई.

---

# जड जीवित

नजरेस येइना आशेचाही किरण
सुख शवास जाळी मनोरथांचे सरण!
बेगुमान बसती देशसेवका लत्ता
हृदास पेटुनी छळिते जुलुमी सत्ता.
काढोनि घेतले दीनमुखांचे घास
घातली विदेशी चोरांपुढती रास.
किति अमीर झाले फकीर देशाकरिता
तो धन्य महात्मा त्याच्या चरणीं माथा
न्यायाच्या नांवें अन्यायानें खून
पाहिले वाढत्या देशभक्तिचे पूर्ण!
बेबंदशाहिला कानूंचा आधार!
चालवी परार्थावरी स्वार्थ तरवार.
ही इकडे थप्पड, इकडे मिठी बात,
थोतांड शिस्तिचे, कुंपण खाई शेत!
वसुदेव महात्मा कंस घालि बंदींत,
वाढता कृष्ण परि पाडिल त्याचे दांत.
भनानदशा लावील आग ब्रह्मांडा
जळतील विदेशी चटोर पोरें रांडा.
बंदींत कोंडता वीर हजारों रोज,
होईल तयांची सुटतां कडवी फौज.
भरताच पूर्ण हे जुलुमी भांडें आतां
पिढि पुढील मारिल या चोराना लाथा.
अंधार विदेशी घालितसे धिंगाणा

मुरगळील त्याच्या स्वदेश भानू माना.
परि केव्हां येइल भाग्यवंत तो काळ
संपेल कधीं हा जुलुमि सत्ता खेळ !
होऊ दे उदय भानूचा-सत्वरी,
अंधार मरू दे आतां—लौकरी,
प्रभुराज विनंती हीच-तोंवरी,
जड जगांत जगणें जीवा अवघड वाटे
अन् मनोहराच्या नयनीं अश्रू दाटे.
१९१३, मुंबई.

## विनंती

उठ, महाराष्ट्र—सम्राटा, उठ, टिळका, वाग्भट धीटा,
ठाकला प्रसंगहि मोठा, उसळती भयंकर लाटा,
शौर्याचा अटला साठा, ओसाड धनाच्या पेठा,
जुलुमाचा तापद ताठा, दळवितो शांतिचा कांटा,
उठ दावि सुखाच्या वाटा, बघ, आग लागली पोटा
ऐक्याची फाटाफूट, मतभेद आणिती वीट
उठ, काढि शत्रुचा काटा, राष्ट्रैक्य करी रे सुभटा.
१९२४, मुंबई.

## वीर वंदन

धैर्याचा गिरि, शांतिसागर असा हा वीर सत्याग्रही,
तेजस्वी जणु कीं, पुराण मुनि, हा तारी तपानें मही !
अत्याचार न स्वप्नि येत न घडे हिंसा मनानें कधीं,
मानी, हिंद सुपुत्र, वंद्य जगतीं गांधी महात्मा सुधी.
होता थोर अमीर नांदत सुखें दिव्य प्रयागीं जरी,
आला धांवुनि जन्मभूमि बुडतां दास्यार्णवी ही परी,
देशोद्धार करावयास झटतो हा शूर रात्रंदिनीं,
विद्वान् पंडित हा फकीर बनला लोभास निर्दाळुनी.
स्वार्थाला तुडवी, सुखास बुडवी, हा वीर वंगेश्वर,
देइ मंत्रिपदा झुगारुनि, सदा संधान शत्रूवर,
शौर्यें सिंह जसा, तसा बहुगुणि वक्ता, कवि प्रेमळ !
देशाला करि देशबंधु सततोद्योगें जगीं उज्वल.
केलें वंदन भावपूर्ण हृदयें राष्ट्रीय त्रैमूर्तिला,
तों– झाली स्मृति, लोकमान्य वदतां ! हा कंठही दाटला.

१९२५, मुंबई.

---

## पृच्छा

गेलें बाल्य पळून हाय ! सरलीं वर्षें जगीं पंधरा !
नाहीं भाव परंतु मात्र विरला ! उन्माद आला भरां !
रूपाचें क्षण एक दर्शन यदा झालें, मनें हांसलीं !
प्रेमोर्मी हृदयांत, हाय ! नयनीं हीं आसवें सांचलीं !

आहे काय मदीय प्रेमवशता स्वार्थी ? खुळा फत्तर —
नक्षत्रास सदैव पूजित वसे, भारी जरी अंतर,
कोठें हा जमिनीवरी, परि कुठे तें दूरशा अंबरीं !
खालीं फत्तर रुक्ष ! सुंदर परी नक्षत्र हांसें वरी !
तें खेळे गगनांत, पृथ्विवरि हा नातें असावें कसें ?
पाहोनी गळतां परंतु दुसरे तारे नभीं गोडसे,
याचा जीव थरारला, चरकला चित्तांत हा फत्तर !
' निःस्वार्थी मन आळवी परसुखासाठींच सर्वेश्वर !
" देवा दाव दया, मदीय सखया, घाडू नको भूवर "
हा कां स्वार्थ असे ! मनोहर पुसे, या हो कुणी उत्तर.
१९२४, धुळें

---

# यशोगिरीस

आहे खोल, विशाल सागर बहू सारस्वताचा जगीं,
रत्नांची कर लूट जा, बुडुनिया रत्नाकराच्या तळीं,
रत्नांची मग माळ सोज्वळ करी वाग्देवीला अर्पण,
पाणी व्यर्थ कशास तूं उडविसी या पृष्ठ भागावरी ?
प्रेमाच्या सुमनें सदैव भरला हा काव्यकल्पद्रुम !
सौख्याचा रस लूट, होउनि गुणग्राही जसा कीं अली,
वा पुष्पांजली ही भरून असली वाही जिला तूं प्रिय,
कांटेरी तरुवीच या झगडुनी कांहींसि रक्तांकित!
प्रेमाचें मृदुगान सात्विक तसे आलापही मंजुळ,
गावोनी रिझवी सदैव थकल्या जीवांस विश्वास वा,

प्रेमाच्या सुखगायनांत बुडवी भेसूर चितारव !
मात्सर्यें जळुनी कशास म्हणसी बेसूर गाणीं फुकीं !
कीर्तीलालस मानसा, प्रिय सुहृद् ! श्लाघा, पुरे घोषणा
कीर्तीची जगतांत गांठ पडते मृत्यूचिया नंतर !

१९२४, धुळें

---

## मुशाफर

[ ही एका शिवकालीन शिपायाची प्रेमकथा आहे. या कथेची लांबी बनारसपासून सातान्यापर्यंत आहे. ]

तारुण्याच्या मनांत दुसरें, रसिका, घोळे काय ?
प्रेमदेवतेवांचुनि मंगल, विरह कुणाला गाय ?
तरुण मनाचीं प्रेमळ गाणीं तरण्या हृदयीं स्फुरती !
रसिका तरुणा, प्रेम घाढवी तारुण्याची महती !
तारुण्याच्या फुलांत भरला प्रीतीचा नव वास !
तरुण सागरावरती लोळे, बघ, प्रीतीची रास !
तारुण्याच्या गगनीं शोभे गोड प्रीतिची कोर !
प्रीतीची लांडोर नाचवी प्रेमळ तरणा मोर !
तरण्या शौर्याला ती निजवी प्रीतीची शेज !
तरण्या मेघालागीं खुलवी नभीं प्रीतिची वीज !
मनास माझ्या वेड प्रीतिचें पहिल्यापासुनि फार !
त्यांत नवा हा विरह उगवला आतां दावेदार !
हृदयाच्या बागेंत वाहती प्रीतीचे मृदु स्रोत !
रानफुलांनीं दरवळलें हें माझें वेडें गीत !

मनांत आला असा उमाळा गोड नव्या प्रीतीचा !
वदनीं फुलला प्रेमसुमांचा बहार रसवंतीचा !
मुशाफराच्या वाटसरोचें आवडतें हें गाणें
अहंमन्य पढिकांस कदाचित गमेल लाजिरवाणें.
हंसेल विद्वत्ता या वेडया चार वाकडया बोलां !
प्रेम घालिते बहिष्कार परि चंचल निंदास्तुतिला !
रुसलें तर तें रुसो छंद वा व्याकरणाचें शास्त्र,
तारुण्यानें कां न बघावी आनंदाची रात्र ?
पढिकांनाही रंजविण्याचा विडा उचलिला नाहीं !
प्रेमळ रसिकां, देते तुम्हां कविता माझी ग्वाही !
सरळ मनांतुनि उठती वेड्या प्रीतीच्या या लहरी !
दिधल्या उधळुनि समानधर्मी रसिकांच्या दारीं !
भावाची ही भेट, कीर्तिचा मोबदला ना येथें !
नाहीं घालायाची गळही लक्ष्मीच्या चरणातें !
माझी भोळी कविता नाहीं नांवाकरितां रुसली !
भेटायाला नको नाचरी, लक्ष्मी चंचल बिजली !
प्रेमपूजनीं विद्वत्तेची कशास रसिका, हाव ?
शिष्टपणाला, यौवनलीला-दरबारीं मज्जाव !
जगास दावायाचीं नुसतीं शिष्टपणाचीं सोंगें !
विनोद, अचरट लीला, खेळे पहिल्या प्रेमासंगें !
खरा जिवाचा सूर सोडुनी बेसुर कां लावावा ?
काय म्हणोनी ताल प्रीतिचा लोकास्तव सोडावा ?
रानफुलांची ओंजळ, रसिका, भावभेट ही असली,
प्रेमाखातर असे वाहिली तुमच्या चरणांजवळीं !

पहिलें गाणें, नवीन प्रीती गाते एकांतांत !
ऐकायाला चलाच रसिका डोंगराळ रानांत.
नव्या मनाच्या करांत दिधला जुन्या प्रीतिचा हात !
चात प्रीतिचा उरते, जाते रुसुनी सगळी रात !
सह्याद्रीचे मोठेमोठे पहाड जिकडे तिकडे
कड्यावरुनिया उड्या घेत ही कृष्णा, पळती ओढे.
माळावरुनी पळतो वारा, जंगल माजे दाट,
रानगांवच्या वनराईंनीं भरला कृष्णाकांठ.
कडेकपारीं फिरतां होइल, रसिका, तुम्हां शीण
खणल्यावांचुनी सांपडते कां सोन्याची खाण ?
प्रेमाच्या या विचित्र लीला दरीं कपारीं बघतां
दचकुनि जाऊं नकाच, रसिका, हा प्रीतीचा रस्ता !
सातान्याहुनि हां हां म्हणतां हें कुंडलचें रान
पहा गांठलें, सकाळची ही वेळ गुलाबी छान.
दरीं कपारीं फिटलें होतें अजुनि पातळ काळें !
वनदेवींचें काळ्या अंधाराशीं हितगुज चाले !
हळूच अंबरमहाल उघडी पूर्वेचें मग दार !
वसुधाबाला लाज लाजुनी झाली बहु बेजार !
गगनतरूवर हंसरीं तारासुमनें फुललीं फार !
प्रभातवायु निष्ठुर त्यांना उडवी दारोदार !
लाल चांदणी चौक, हिंडुनी रात्रीं तारानाथ.
लाजुनि फिक्कट, आला आतां अपरेच्या दारांत !
गगनश्रीच्या पदराखालीं चांद विलासी निजला !
रागानें हा लाल जाहला, परि देवाचा डोळा !

करडा भास्कर डोकवितां या गगनाच्या दारीं !
पळुनी गेल्या घरांत सासुरवासी तरण्या पोरी !
प्रभुरायाचें गूण गात हीं उठलीं पिकलीं पानें,
रसवंतीचे राघू प्रेमळ, उठले-ही नेमानें.
उठली दुनिया, उठली प्रीती विलास शय्येवरुनी !
उठल्या पुष्पांमधुनी गेले मधुकर दूर पळोनी !
उठले पर्वत, उठले सागर, होता वाहत वारा,
रिमणे पक्षी उठले, झाला भुगोल जागा सारा !
भुगोल झाला जागा सारा, शाहीरा म्हणसी !
कोण आळशी अझुनी निजला कृष्णाकाठासीं ?
ढाल उशाला, हाताखालीं भाला पल्लेदार,
प्यार जिवाची जवळी निजली नंगी समशेर !
वस्त्रावरती पडले होते रक्ताचे बहु डाग,
तोंड वासुनी पडला होता जंगलांतला वाघ.
किरण कोवळा हळूच तेथें आला काढित वाट !
सुंदर, दमल्या वीरश्रीला उठवी कीं जणुं भाट !
उठुनी बसतां पहिली दृष्टी कोणावरती पडली ?
बालरवी हा कुठली दुनिया प्रेमें न्याहाळी !
कृष्णाकाठीं हिंडत होती कोणी, सुंदर, पोर,
गात मनाशीं गाणें अपुल्या नादीं होती चूर.
हांसत जवळी आला, परि ती गुंग आपल्या नादीं
लागे अस्मानाची सुंदर दुनियेवरती तंद्री !
“ कोण कुणाची भाग्यदेवता फिरे एकली रानीं ?
रंगुनि गेली आनंदानें कोणासाठीं वाणी ?

कल्पतरूचें पुष्प फुले कां चुकुनी या रानांत?
रान-समुद्रामधुनी किंवा लक्ष्मी वरती येत!
ऐन विलासीं गगनश्रीची तुटली मोहनमाळ!
त्यांतुनि एकादी कां मुक्ता पळते रानोमाळ?
आकाशाच्या सरोवरीं जीं हमेश कमलें फुललीं,
त्यांतुनी एकादें कां पडलें चुकुनी रानीं खालीं?
कुणां कवीला सोडुन फिरते सुंदर प्रतिभा रानीं!
भाग्यवान ही कुणा जिवाची वनवासी राणी?"
"कशास गरिबीला हें असलें मोलाचें परि लेणें!
झोपडीस कां शोभा येतें सोन्याच्या कळसानें?
पोर अडाणी, रीतभात ही असेल कुठली ठावी?
सुमगुच्छाची शोभा कैशी रानफुलाला यावी?
शहरगांवच्या सरदारांना येइल कां परि राग
पुसतां? कोणी पावन केला डोंगराळ हा भाग?"
"रायगडावर अमीर माझा राहे दिलदार,
उमरावाचा बंदा मी, त्या कुंडलचा सरदार?
सज्जनगडचा फकीर सात्विक संन्यासी वीर,
करितो प्रेमें नित्य धावत्या मनवारूला स्थीर!
कृष्णाकाठीं कुंडल आलें धावुन प्रेमाकरितां!
पहिल्या अल्लड प्रेमाला कां मिळेल येथें गोता?
वनराणी ही येइल कां त्या कुंडलच्या दरबारीं?
पहिली दृष्टी खिळली आतां या प्रीतीच्या दारीं!"
"आम्ही रानच्या पोरी भिरभिर फिरतों रानोमाळ
नदीकिनारीं भटकत फिरतां जातो सगळा वेळ.

शहरगांवच्या सरदारांना आवडेल कां रान ?
वणवण फिरुनी आम्हासंगें उगाच होइल शीण ! "
" शहरगांवच्या मनांत वाही बेपर्वाई वारा !
अनोळखी नव प्रेमा रडवी लाख फुटाणी, तारा !
खोट्या प्रेमें सदैव फुलले श्रीमंतीचें झाड !
भोळी गरिबी आनंदानें करि प्रेमाचे लाड !
ताराराणी बघतां गगनीं चांद सारखा वाढे !
जीव भाळला सांगायाला कशास आढेवेढे ?
निर्जन रानावनांत फुलतां प्रेमाचें मृदु फूल !
सुस्वर्गाचा सुवास तेथें दरवळुनी जाईल ! "
" साधी भोळी पोर पाहुनी वेड जिवां लावावें !
रंगाचा बेरंग कराया, नांव टाकुनी द्यावें !
नित्याचा हा खेळ खेळतां होतो तुमचा खेळ !
डोळे भरुनी येती परि हे, उडतो मनिं कल्होळ ! "
" कृष्णाकाठीं कुंडल बांधी ही जन्मांची गांठ !
सोडायाचा नाहीं आतां धरलेला हा हात !
जिवा जिवांची ओळख पटतां कशास आतां भीड ?
परिचित बेपर्वाई असली सोड, साजणी, तेढ "
" वनांतल्या या देवी बघती उघड्या निज नयनांनीं
मैनेचा कर करांत धरिला कुंडलच्या राजांनीं !
कृष्णामाई, गिरि, वनराई ही साक्षी ठेवोनी
देह वाहते ही मान्यांची मैना तुमच्या चरणीं ! "
" मनांतल्या या नित्य जागत्यां देवां ठेउनि साक्ष
ठेविल राया कुंडलचा हा मैनेवरतीं लक्ष

ज्या जीवाच्या वाटेवरती खिळली होती दृष्टी !
आज लाभली तीच सुखाची, सौंदर्याची सृष्टी !"
"पदरीं घेउनि पवित्र केली या दासीची काया,
प्रेमाच्या या घरांत पहिलें पाउल ठेवा, राया !"
"मान वळवितें खालीं कां हें लाजाळू झाड ?
अधीर प्रीती धरिते अजुनी लज्जेची भीड !
वयांत आली नसेल अजुनी परि ही अल्लड पोर !
झालें आहे उघडें कां या तारुण्याचें दार ?"
"असलें कसलें विचारणें हें ? येउनि गेला पदर !
"तरीच छातीवरच्या पोरी पदरीं करिती कहर !
अधीर झाला जीव, साजणी, लज्जेच्या बुरख्यांत
चल, प्रेमाचें गीत सांगतों सौख्याच्या कानांत !
बोलत बसलों, पडलें जेव्हां पिवळें कोळें ऊन्ह,
बघतां बघतां पहा, साजणी, झाली भर मध्याह्न !"
"जिवाजिवांच्या पहिल्या भेटीमध्यें विसरें भान !
पळत्या वेळाकडे असे मग कोणाचें, वद, ध्यान ?"

* * * *

कृष्णाकाठीं कुंडल आलें धावुनि प्रेमासाठीं !
मनोहराचा जीव धावतो सात्त्विक प्रेमापाठीं !

* * *

स्वार मराठी लुटुनी आले सुरत फिरंग्याची
समर्थ चरणीं रास घातली सोन्या मोत्यांची.
मूर्तिमंत त्यागास कशाची परि पर्वा लक्ष्मीची
तुडुंब भरली चिद्रत्नानीं झोळी नित दासाची.

स्वराज्यसेवक करडे नमिती राजगुरुंना प्रेमें,
सद्भावानें माथा धरीतीं मग आशिर्वच कुसुमें.
" सुकलें कां परि आज इांसरें कुंडलचें हें फल
मलूल दिसतो कां हा राया लागे कसलें खूळ.
घोड्यावरची दौड मारुनी वद दमसी कां बाळा,
साताऱ्याहुनि कुंडल वाटे खेळ तुला वेल्हाळा. "
तोंडांमधुनी शब्द फुटेना, आला भरुनी उर
मनांत प्रीति वदनीं लज्जा उठवी परि काहूर.
" तुमच्या पासुनि चोरुनि ठेऊं काय समर्था देवा?
विषयापासुनि सन्मार्गावरि स्वामी बालक न्याया.
क्षमा करा, दासास नावरे मन हें बहु ओढाळ,
नाद घराचा मनास करितो, प्रभुराया, बेताल.
सांगायाला लाज वाटते समर्थ चरणा जवळीं
विनाइ शेजेवरती झाली वैराग्याची होळी!
विषयाचा झंझात घालतो मनांत या थैमान!
गुरु चरणावरि चित्त बसेना अजुनी हें नादान.
कामाचा पर्जन्य झोडपीं मनःप्रवासी दीन!
विषयांच्या मृगजळांत रमतो मनोरथांचा मीन."
क्षणभर हांसे कौतुकमात्रें दासांची ती मूर्ती,
चरणावरती ढाळी अश्रु पश्चात्तापी भक्ती.
" वैराग्याचा दीप मालवी क्षणांत कामुक वात,
अगाघ विद्वत्ता ही जोडी विषयापुढती हात!
घरास जाऊं द्या, शिवबा, हा कुंडलचा सरदार
निसर्ग नाहीं उल्लंघाया कोणाला येणार.

समर्थचरणां, छत्रपतींनां क्षणांत वंदन करुनी,
टाच मारुनी घोड्याला मग वीर उडाला गगनीं.

✣ ✣ ✣

" घरास माझे येतील केव्हां कुंडलचे सरदार ?
एकलीच मी कशी पूजूं ही नवी मंगळागौर ?
स्वारीचा हा मनास बाई किती तरी परि नाद ?
मोहिम होतां परतायाची राहिल कां मग याद ?
कर्तव्याच्या मागें लागुनि घात प्रीतिचा केला !
परतुनि केव्हां घरास येइल जीवाचा अलबेला ?
शिवरायाच्या तैनातीला नाहीं दुसरे स्वार
म्हणुनी नेला का हा माझा कुंडलचा सरदार ?
या रणवीरा, घरास आतां यकला रडुनी जीव !
वाट बघावी किती राजसा, येइन कां मुळि कींव ?
जगांत खोटे हांसुनी जावें एकांतांत रडाया !
स्मरुनी स्वारी स्वारीवरची अबलांचा जिव वाया.
उडवित घोडा दौड करी हा कोणाचा जासूद ?
कशास जागी करितो निजली ही रात्री गर्द ?
दरवाजाशीं टाप कुणाच्या घोड्याची ही वाजे ?
खरेंच आले असतिल कां प्रिय प्राणपती माझे !
शेजेवरुनी उठे न जों, तों कोणी उघडी दार
क्षणांत घाली मिठी गळ्याला तारुण्याचें सार !

✣ ✣ ✣

" सांग कशी तुज गेली पहिल्या खेपेची ही रात ? "
" आयुष्याच्या सौख्यावरती या रातीची मात. "

"या रातीचा याद द्यावया, एकच मिटला डोळा
भरल्या संसारांत खुणावी हृदयाच्या राणीला.
अधीर अगदीं पुरुषांची ही, सखये, नवखी प्रीती !
उतावळ्या घाईस निघेना दम सुटतां गाठीं !
चार युगांचा स्वर्गसुखांचा या पहिल्या रातीला,
लुटावयाला खुशाल जावें सातहि पाताळाला !
मिटल्या ओठीं गोष्ट कशाची कथिती वारंवार !
१०नाजुक समरीं धीर न धरवें जेव्हां नाचे स्वार !
भरुनी आल्या छातीवरती दमलें शिर ठेवोनी
रणमर्दांची गुर्मी जोडी अबला पुढती पाणी !
या रातीची महति सांगू, गडे, कशी मी तुजला ?
धर मर्दाचा हात, आणि जा, प्रेमाच्या गांवाला !
कळल तुजला लोटुनि देतां महालांत एकांतीं,
या रातीची महती गाते मुक्या वाणीनें प्रीती !"

* * *

"पोर पाहुनि अशी एकली भयाण या रानांत,
काळें वेरें मनांत आलें तुझ्या मुसंड्या येथ.
शिवरायांचा सह्याद्री हा नाहीं अजुनी निजला,
तुझी, फिरंग्या, तोडायाला दाढी वेळ न त्याला.
काय पाहसी, ऐसा रेड्या, वटारुनीया डोळे ?
धनी घराचे जों न पातले तों कर येथुनि काळें !
हांस, अविधा, निलाजऱ्या, पण शेवटचें हें हंसणें
एक-जाहलें त्या स्वारींचें घराकडे हें येणें.
काय ? नाहि कां कुणीच आलें ? मनास पडली भूल ?
ये तर, घोडा, पुढें घेतली उडी जरी दरि खोल !

तुरी देऊनी हातावरती तुझ्या मराठी पोर,
कड्यावरुनिया पहा चालली, आवर आपलें ढेर !"
"पळशिल कोठें आतां ? असली नाजुक नवती नार,
मिळावयाचा मोका येतो असतां परि तकदीर.
दख्खनची ही मंजुळ मैना नेतों हिंदुस्थानीं,
लुटावयाला खुपसूरत ही प्यारी उमदी ज्वानीं."
'घुसे मराठी कट्यार पोटीं बघ घे ते प्राण !'
'बोंथट झाली कट्यार आंगीं चिलखत संपूर्ण !'
'धांवा, धांवा, कोणी राखा दीन गाइची लाज'
'भयाण रानीं तुला चढवितो सौख्याचा बघ साज.'
फुलांत फुलल्या तारुण्याच्या रस हा नव नवतीचा !
लुटावयाला मधुकर आला बघ तव सौभाग्याचा.
नजरा भिडतां ओळख पटली छपलेल्या सोंगाची,
फिदा जाहली स्वारावरती राणी मग हृदयाची !
"काय सोंग हें, बाई, असलें क्षमा करा दासीला,
बोलूं नये ते बोल बोलले भिऊनी या सोंगाला.
हांसत हांसत नवबालेच्या स्वार गळा मग पडला
नाजुक गालीं बहार आला क्षणीं गुलाबाला !
हात घालुनी गळ्यांत वदला "रानीं सुंदर पोर
पाहुनि नाहीं भुलावयाचा कुठला अट्टल चोर ?
तुरी देऊनि कां न जात ही हातावरती पोर ?"
"चोरानें मज धरिली रानीं आतां या शिरजोर !"
"गगनाच्या रानांत सांपडे ही चवथीची कोर !"
"कां न करीना नाच प्रीतिचा आतां नाजुक मोर !"

" कुठल्या स्वारीवरी तयारी इतुक्या लौकर केली ?
कमेरेवरची प्यारी अजुनी नाहीं कां ही दमली ?
किती धांवपळ अशी करावी सदा मोहिमेवरती ?
दमल्या वीरा, घरीं विसावा घ्या म्हणते प्रीती !
भरुनी आली नाहीं अजुनी जखम मस्तकावरची !
शिणल्या देहा जरा घेऊं द्या सेवा प्रिय प्रीतीची !
मोहिमेंत या नुकता झाला वार गुलाबीला
जरा विसावा घेऊं द्या, रणवीरा, या भाल्याला ! "
' रणवीरांच्या पाचविला ही पुजली आहे स्वारी "
' तशीच नारी पडली आहे रणवीरांच्या पदरीं !
स्वारी तुमची प्यारी आणिक नारी कां दुस्मान ?
स्वारीवरती लक्ष तेवढें घरांत कां अनमान ! '
' रणदेवेची सेवा करणें हा मर्दांचा धर्म '
' गृहदेवीचें नांव टाकणें असेल हा ही धर्म !
रणदेवीला तुम्ही पुजतां, पुजे तुम्हा गृहदेवी !
कर्तव्याला वंदन करितां, प्रीत तुम्हाला विनवी ' !
' कर्तव्याची हांक ऐकतां प्रेमाची ती फिकिर !
करुनी नाहीं भागायाचें तशी सुखाची जिकिर !
कर्तव्याच्या समरा मागुनि गोड प्रीतीचे खेळ !
कर्तव्याच्या गानीं मरती, सखे, प्रीतीचे हेल !
डोंगरमाथ्यावरची सुंदर, हिरवी, नाजूक शेज !
ऐन पहाटे सोडुनि उठतां फांके रविचें तेज ! '
' सागरशय्येस्तव तो धांवें परी संपता काज !'
' आणिक माझ्या रविराजाला घरीं कोणती सांज ?

अर्ध्या कार्ये वरतां आम्हा रमणींची ही उक्त !
कर्तव्याच्या लत्तेला हा नित्य प्रितिचा माथा !
कुठें जायचें नाहीं आतां आली ही संक्रांत !
मकराची दिनरात असावें घरांत सांगे प्रीत !
' कर्तव्याच्या वृक्षावरती चढे प्रीतिची वेल !
कर्तव्याच्या सांवाला हा नव्या प्रीतिचा बेल !
" लाथाडुनिया गृहदेवीच्या सौख्याचें हें ताट !
भोळी प्रीती सदैव पाहिल शौर्याची परी वाट !"
कोपलीच कां जीव सुमांची माझ्या या फुलराणी !
प्रेमापुढती रणवीरांची मिजास जोडी पाणी !
लढावयाचें नाहीं आतां जाणें परी दरबारीं !
दिल्लिपतीच्या शिवरायासह, देवी, मंगळवारीं !
" सोडसाजणी दिवस कासराभर हा वरती आला, "
दे प्रेमाचा निरोप आलें पाणी कां डोळ्याला ?
" क्षणभर थांबा, देवा, करिते या चरणांची पूजा,
राख सुखी, तुळजाई, माझा हा परदेशी राजा.
टिळा कपाळीं, वरती शोभे मंदिल हा जरतारी ,
दृष्ट लागण्या जोगी माझ्या वीरांची ही स्वारी !
कमरेवरची प्यार जिवाची करांतला हा दोस्त,
पाठीवरती ढाल शोभते रणवीरांना मस्त !
सांभाळुनि ने, गडे, गुलाबी, दोस्त जिवाचा प्यारा,
आणशीलना घरास लौकर पाठीवरच्या स्वारा ?
रिकिबी वरुनी पाय ठवितां खाली काढील कोण ?
मंदिल शिरिचा कोण हासुनि हरिल मनाचा शीण ?

विरह क्षणाचा या चरणांचा करी जिवाची दैना,
चिरविरहीं या झाडवील ही कोण उदासी मैना ?
खिन्न एकली फिरतां मजला उठेल खाया रायी !
पहाडाच्या हृदयावर लोळे बाला कृष्णाबाई !
भयाण रातीं, उघड्या शेजेवरती, जागी होतां
मिठी कुणाच्या गळयास मारूं भिऊनी सांगा, नाथा ?
लांब रात ही थंडीची या वयांत तरण्या ऐन,
जाईल कैशी " ? " स्मरूनी पहिल्या रात्रीचो ती चैन !"
" खांद्यावरती किती वेळ परि टाकशील ही मान !
मिठी गळयाची काढ, साजणी, करूं नको मुख म्लान "
" पाय पुन्हां ये दिसतिल केव्हां ?" " येईन लौकर फार,
न्हाति धुती बायको टाकुनि कोण फिरे बाहेर ?
कुठवर बघशील फिरवुनी वरती भरले डोळे ?
छातीवरचा पदर सारखा वरी वरी कां हाले ?'
' पुरविल आतां कोण सख्या ही पहिलेपणची हौस ?
गेले थोडे' 'काय साजणी !' 'गेले थोडे दिवस !'
' शेवटचा हा मुका...आणखी एक...गोड शेवटचा
असे काय हे, हांसुनि आतां निरोप ते प्रेमाचा. '
' कर्तव्याच्या सागरांत जा उडि सुखें घ्या, नाथ !
कर्तव्याच्या दिवसामागुनि उगवे प्रेमळ रात !'
' पतिव्रतेच्या पुण्याईचा शौर्याला आधार !
देवावरती दांपत्याच्या संसाराचा भार !'
अबलख घोडी स्वारासंगें उधळे वर चौफेर !
स्वार एकदां मागें बघुनि सुटला जैसा तीर !

* * * *

महाराष्ट्राची धनदौलत ही पचावयाची नाहीं,
दिल्लीपतीच्या भांडाराला; हिरा न ऐरण खायी !
स्वतंत्र सीतामाई संगें महाराष्ट्राचा राम,
पंचवटीला वळला फसवुनि दिल्लीपती बेफाम.
कापटयाची मूर्ती केवळ शहा दिल्लीचा क्रूर,
फसतां निघती हृदयातूंनी मग सूडाचे सूर !
मुक्या मनांचा तळतळाट, हा धेनूंचा हंबरडा,
निरपराध जीवांचे शापहि उभारिती बंडा !
राजस्थानीं मूर्तिमंत तो प्रताप सुत दे ताप,
स्वदेशप्रेमा स्वार्थत्यागा ज्याचा नाहीं माप !
उत्तरेतला चवताळुनि तो उठला मग पंजाब,
आणि शहाच्या सामर्थ्याची दोरी तुटली लांब !
दिल्लि नृपनीतीलाही स्वर्गाची ती वाट,
महाराष्ट्राचा वीर केसरी सुटला बिनबोभाट.
' जा, शिवराया, या शय्येवर निजेल राया नीट,
दक्षिणेंतली स्वराज्यलक्ष्मी पाही तुमची वाट !
ऐकुनि देवा, अभद्र बेसूर दुःखद या वार्तेला,
महाराष्ट्राचा जीव घाबरा असेल आतां झाला.
महाराष्ट्राच्या सेवेसाठीं पडेल जरि ही काया
या शय्येवर, होइल तर हा धन्य धन्य मग राया.
शिवरायांचा वेष घेऊनि निजला राया धीट,
शय्येवरती वाट मृत्युची पाही गौप्यस्फोट !
हकीम आले, गेले, होतां तो निजलेला राया
' बिमार झाला फार शिवाजी राजा या समया.'

काळ्या काळ्या रात्रीं केलें झोपेनें ही काळें
बाहेर पडला राया तेथुनि सकाळच्या वेळें.

* * *

" मुसाफरा कां सांग एकला हिरमुसला बससी दूर ?
घरीं जिवाची राणी झाली असेल विरहानें चूर !
विशाल वक्षावरी ठेवुनी मान निजे कुठली नार ?
हृदय कुणाचें उचंबळवि हा शूर वीर दिल्दार ?
धनी जिवाचा बघुनि होतो जीव कुणाचा वेडा ?
नजरा भिडतां विसरुनि जाते कोण मनाच्या तेढा ?
गालावरती गाल ठेवितां मिटे कुणाची दृष्टी ?
नशिबवान ही नार कोण मग गुलगुल करिते गोष्टी ?
झटतां अंगीं कोण लाजुनि बळेच मारी मुरका ?
कोण जिवाची धनीण करि तव दमलेला जिव हलका ?
उड्या हजारो घेतिल नारी जीवासाठीं तुझिया !
परदेशीच्या मुसाफरा कां मनांत झुरसी वाया ?
रोशन, भूषण जहापन्हाच्या जनानखान्याचें मी,
मर्द मराठ्या, वळव नजर या आनंदाच्या धार्मी.
हा इष्काच्या प्याला भरला लाव आतां ओटाला,
रुचिरपादपा सावर झुकत्या कोमल या वेलीला !
अरसिक अगदीं नवखा दिससी इष्काच्या सौद्यांत !
चुकलेला तूं वाटसरू या प्रेमाच्या मार्गांत !
पुरे भीड ये, उतर संगरीं प्रेमाच्या, रणवीरा,
इष्कानें बेहोष होऊनि नाच सुखें दिलदारा !
भास्कर फुलवी गुलाब, रसिका, उषेच्या या गालीं !
तारानायक सलज्ज प्राची प्रेमें बघ कुरवाळी !

आकाशाच्या सताड उघड्या भव्य आंगणांत !
सलज्ज पोरी धरुनी जाती रमणांचा हात !
जातां जातां वसुधेला रवि हळूच मारी डोळा !
गिरिच्या सौधावरती चुंबी अप्सरेच्या गाला !"
"वैराग्याची मूर्ती वसुधा तपस्विनी भू माता,
शांत मनानें रविरायाच्या चरणीं ठेवी माथा !
तपःसाधनासाठीं करुनी सागरतीरीं स्नान,
रविरायानें एकांतीं हे पहा लाविलें ध्यान !"
" वसुंधरा बाजार बसवि ही केवळ लंपट नार !
मधुमासाची माशुक तरणी पोर नवी गुलजार.
नव ज्वानीचा बहार लुटुनी वसंत रायासंगें !
वयातीत तो होतां धांवे करड्या ग्रीष्मामागें !
परि कामाचा दाह न शमवी ग्रीष्माची ती आग !
रडव्या वर्षावरी दाविते छिनाल बहु अनुराग !
शरदावरती डोळा टाकी कामुक ही श्रीमान !
पोरपणाचें वय गेलें तरी उधळितसे बहु गूण !
वयस्क हेमंताची असली गरती प्रौढा नारी,
शिशिराला चवचाल भवानी मधुनी डोळे मारी !
शिवाय शशिरवि रोज नवनव ठाऊक कोणाला ?
तरणे निर्झर सदा भेटती गांवाच्या गंगेला !
राकट सागर धांव धांवुनी हात महिचा धरितो !
मत्त प्रभंजन बेरात्रीला नको नकोसा करितो !
वसुंधरा ही पवित्र असली, चल प्रेमाच्या गांवीं,
दो दिवसांची अमदानी ही मौज मारुनि घ्यावी !

# भाव-भेट

रान हांसते सभोंवार ही राई पसरे शांत,
डोंगराळ भागांत राजसा सुंदर हा एकांत !
रान फुलांची आंथरली ही छान सुवासी शेज !
गगनाच्या दारांत चढवि रवि अपरेला सुखसाज !
पायापाशीं बसलें मी, हा आला नुकता पदर !
बाग सुखाची फुलव, कुणाची करिशी आता कदर ?
तुझ्या सुखास्तव पहा पसरिली ही कायेची शय्या,
निवांत एकांतांत तुला हा हुकार माझा राया !
पाक नार मी, झोकदार तूं, सुंदर तरणा, बांड,
गोड वेळ ही काय पाहसि ! फिरवितोस कां तोंड ?
तारुण्याचें उघडे केलें अमोल तुज भांडार !
अनोळखी प्रेमाला लाजुनि कां घेशी माघार ?
लूट मोहना, फुललेला हा बहार नव नवतीचा !
पुरव एवढा हेतु आतां अल्लड या पोरीचा !
क्षणांत सौदा पटव एवढा, सख्या, नव्या इष्काचा,
विलंब सौदागिरा आतां कां ? माल फार मोलाचा !
हृदयाच्या या वीणेवरती छेड सुखाची तार !
दे प्रेमाचें दान उदारा, काकुळती ही पोर !"
"उत्तरेतल्या अल्लड पोरी, खरा मराठी स्वार,
भुलावयाचा नाहीं बघुनि छिनाल परकी नार.
शिवशाहीचा बंदा मी, त्या दःखनचा रहिवासी,
धनीण माझी म्हणते राया रानगांवचा मजसी.
रायगडच्या शिवास काया विकलेली कायमची
हृदयावरती सत्ता गाजे मान्यांच्या मैनेची !

रानीं नाहीं शेत, तसें तें घर मजला गांवांत,
कमेरला तरवार नाचते, भाला हा हातांत.
उठवळ बिजली बघुनी भुलतिल उत्तरेंतले मेघ !
दक्षिणसागर लागुं न दे परि तिला मनाचा थांग !
चटक चांदण्या कैक उगवती सह्याद्रीवर रोज,
सागर पचवी निराश नाजुक नक्षत्रांची फौज !
वित्तेशाची दिशा भरविते विषयांचा बाजार !
यमधर्माच्या परी दिशेला नीतीचा आधार !
इकडे खेळे कम् अस्सल ही इष्काची अवलाद !
कृष्णाकांठीं प्रेम घालितें पावित्र्याला साद !
शौर्याच्या गानांत नाचतो धर्माचा मृदु सूर !
कर्तव्याच्या कृष्णेला ये त्यागाचा बहु पूर !
चंचल प्रेमा भुलावयाचा नाहीं दःखन वीर !
देशासाठीं, धर्मासाठीं तळहातांवरि शीर !
सोड नाद हा चंचल पोरी, ही नरकाची वाट,
विषयपथानें कधीं न पडते परमेशाची गाठ !"

* * * *

"घुटमळसी कां येथें पांथा" "चुकली माझी वाट
"कोठें जाणें" ? "सुखस्वर्गाला तारुण्याच्या नीट !"
"सुखस्वर्गाचा राजमार्ग हा नाहीं जंगल दाट !"
"परंतु येथें मळलेली ही दिसते पाऊल वाट !"
"राजपथानें जातां भागे प्रीत खुल्या बाजारीं,
तारुण्यानें सौंदर्याला बघावयाची चोरी !"

" सौंदर्याच्या राशी बघुनि मनांत व्हावें चूर !
आशा धरिते हात, परि ते सौख्य धांवते दूर. "
" म्हणून कांहीं आडवाट तूं काढिलीस शोधून ?
फसशिल परि तूं, नैराश्याचें हें काटेरी रान ! "
" चुकलेल्या या मुशाफराला वाटेवरती न्यावें,
अनोळखी प्रेमास असें कां वाटेला लावावें ?
आकाशाला मिठ्या मारिती रात्रीं चुकल्या तारा !
दिवसा फुटतां वाट उडोनी जाती वाटा बारा !
सुमहृदयावरि लोळे रात्रीं भ्रमर, प्रवासी चुकला,
वाट मोकळी होतां भ्रमरीं पाठी उडुनी गेला !
वनराईच्या मांडीवरती निजला उघडा माळ,
चुकला दिनकर दारीं येतां लाजे अपरा बाळ !
नैराश्याच्या अंधारीं ही खुटली माझी वाट,
आशा तरणी थांबविते हा चिरसौख्याचा कांठ !
अनोळखी या पांथस्थाचा हात धरावा रातीं,
ओळख नाहीं देत रातची उघड्या दिवसा प्रीती !"

* * *

हिमालयाच्या पायापाशीं उघडी पडली खाण !
सौंदर्याची उत्सुकनयना नाहीं जेथें वाण !
काश्मिरप्रांतीं सौंदर्याला मुळीच नाहीं मोल !
बोल सुखाचे ऐकुनि होतो जीव तरुण बेताल !
फुकटावारी सांडी येथें सौंदर्याचें पाणी !
सौंदर्याचीं पुष्पें फुललीं एकलकोंड्या रानीं !
श्रीमंतीच्या सौंदर्याला बुरख्याचा आधार,
परि गरिबीच्या सौंदर्याचा उघडा हा बाजार !

हिमालयावरि चारु अप्सरा विलास करिती रातीं,
दिवस उगवतां लाजुनि येती हळूच काश्मिरप्रांतीं !
हिमालयाचा शुभ्रवर्ण हा भिनला ललना देहीं,
गुलाबरस रानास सोडुनी गालांवरती राही !
लखलखती या सदैव तारा कृष्णधनुष्या आंत,
ओठांवरती गुलाब फुलती, कुंदपंक्ति वदनांत !
वसनाखालीं दडली सारी स्त्री जातीची लाज !
पीन पयोधर, सिंहकटीचा द्विरदगतीला साज !
भिरभिर पळती नितंबप्रांतीं काळे कुरळे केश,
भारतभूच्या सुंदर देशीं सुंदर ललना वेश !
गरगर फिरती डोळे, तारुण्याची भाषा मूक,
मुशाफरांना भूल पाडिते भावभेट अंधूक !
सौंदर्याच्या तारुण्याच्या उघड्या या गगनांत,
स्थान ध्रुवाचें गोड प्रीतीच्या, देवा दे मज फक्त !
सौंदर्याच्या समुद्रास या तारुण्याच्या लाटा !
मनोरथांच्या वनास फुटती या आनंदी वाटा !
नकोच विद्या, नको कीर्ति ही; नकोच ती संपत्ती,
सौंदर्याची तारुण्याला गांठ पडो या जगतीं !
क्षणभंगूर या जगांत नाहीं मुळींच कांहीं स्थीर,
आयुष्याच्या पुष्पाचा हा तरुण वास अस्थीर !
आयुष्याचा प्याला भरला दुःखाच्या पाण्यानें !
कधीं तरी सुखबिंदु नाचती त्यावरती दैवानें !
सुखबिंदूचा घोट घेऊनी, तरुण वास हुंगावा
मरो स्वर्ग तो, मरो नर्कही, जो श्रद्धेला ठावा.

नकोच देवा कांहीं देऊं दुसरें या संसारीं,
तारुण्याचा सौंदर्याशीं सौदा हो बाजारीं !
जिकडे तिकडे सुंदरता ही फिरते उघड्यावरती,
परि मोहाच्या रातीं, हातीं नैराश्याची माती !

✤ ✤ ✤

बघून घ्या ही इकडे गौळण, सौंदर्याची मूर्ती
हात घागरी वरी नाचती, कुच कंचुकिच्या प्रांतीं !
जातां जातां डोळे मोडी, हळूच हांसे गालीं
मुशाफरा, कां वेडा होसी ? बघ ही माळिण आली.
ताज्या दुग्धें भरलें असतीं घडे नवे हे दोन,
तृषिता पान्था, मोल फार ही नाहीं, केवळ हो, न !
परदेशीच्या मुशाफरा, घ्या लज्जत या आम्राची,
दुनियेमधें नाहीं कोणा सर यांची यायाची.
परी प्रवासी भोळा झुकला तसा पुढें बाजारीं,
नयनांपुढुनी आल्या गेल्या कितीक सुंदर नारी.
तटिनितटावरी जमला सुंदर अप्सरसांचा मेळा,
रसिकपवनही पर्वणींत या स्नानालागीं घुसला !
जन लज्जेचें वस्त्र उडवितो काम प्रभंजन क्रूर !
एकांताच्या रानीं लागे प्रेमाचा मग सूर !
ओल्या वस्त्रांआंतुनि दिसते नाजुक गोरी काया,
वस्त्रांतर होताना भासे मदनाची मृदु माया.
सौंदर्याच्या सरास एकांताच्या डोहीं पूर,
काम केलिला वेड लावितो तारुण्याचा नूर !
रसिकप्रवासी वेडा झाला स्मरुनी प्रेमळ बाला,
कर्तव्याच्या मार्गे लागुनी घात प्रीतिचा केला !

ग्रंथ संग्रहालय

विरहकाल हा मुळी न जाई, अजुनी पुष्कळ लांब,
जळुनी जाइल तो वरि हृदयीं मरतां आशा कोंब !
धुंद होउनि दिवस लागतो रात्रीच्या पाठीं !
म्हणुनी सुटती रात्रीं नाजुक लज्जेच्या मृदु गांठी !
मुशाफराच्या फिरतीचा तो होईल केव्हां अंत ?
कुणास ठावें; कर्तव्याची मनांत उपजे खंत.

१९२२, बनारस. अपूर्ण

## भेट

भेट झाली, लोभ जडला, चित्त वेडें जाहलें,
भाग्यशाली रूपवतिला आदरें मीं वंदिलें.
रूप असलें पाहुनीया सुप्त रसवंती फुले
रसिकता ही दर्शनाच्या सुखदसंस्मृतिनें डुले !
उंच बांधा, गौर काया, तनुलता नाजुक ही
केश कुरळे, स्वैर रुळती, कोकिळा कंठांतही.
यौवनाची चारुता, सुकुमारता, शरिरावरी
नयनिं जादू गोड विलसे, दो खळ्या गालांवरी !
धर्मशाळा ही भिकारी पुनित झाली पदरजें,
रूपश्रीचा तव मुरारी धन्य, त्यांचे भाग्य तें !

१९२८, मुंबई.

# गोविंदाग्रजास—

महाराष्ट्र कवि-कुल-सम्राटा, प्रेमशाहिरा, कवि चतुरा,
सरस्वतीप्रिय कंठाऽभरणा, गोविंदाग्रज, रसिकवरा,
कशास केली इतकी घाई ? 'रिकामपणची कामगिरी'
अर्धी सोडुनि, अंगिकारिली कुठली आतां मुशाफरी ?
प्रेमाचा संन्यास घेउनि जीव जगाला कां विटला ?
भावबंधनासाठीं आतां कोठें कविराया झुकला ?
'एकच प्याला' गळीं उतरतां जीव चरकला कीं काय ?
'वेड्यांचा बाजार' सोडिला पुण्यप्रभावास्तव हाय !
किंवा बाष्कळ बडबड ऐकुनि सरस्वतीच्या दरबारीं
जीव तापला, भग्नहृदय मग पडलें मरणाच्या दारीं.
महाराष्ट्र-शारदा-सुंदरी दुःखानें झाली वेडी,
कोण सोडविल तिच्या मनाचीं आतां कविराया कोडीं ?
मृतमूर्तीला बोल लाविती अहंमन्य कोणी शिष्ट,
चिरंजीव कीर्तीस वंदिती रसिक-मित्र कोणी धीट.
सुवास, शोभा विसरुनि बघती सुमनांचे काटे कोणी
दोष विसरुनि, गुणगौरवही करिती कोणी रसिकमणी.
सरस्वतीच्या दरबाराचे थोर तुम्ही उमराव,
मनोहराचा प्रणाम घ्यावा शाहीरा, कविराव.

१९२१, पुणें.

## प्रेमगड

"कटीवरची समशेर रक्त प्याली,
ढाल पाठीला दिसे विजयशाली
दोस्त हातीं तो नाचतसे भाला,
वाजि उधळित हा कोण वीर आला ?
वदन घर्मानें पूर्ण दिसे व्याप्त
काय धुळिनें भरलि नखशिखान्त
तात आले ! — छे, रक्तस्नात स्वारी !"
स्वार धडके येऊनि दुर्गद्वारीं.
"राजनंदन, कां आज गडा आला ?
सांज झाली मी एकलीच बाला,
तात गेले मम, समर करायाला,
नाहिं अवसरही अतिथि पूजनाला."
" राजनंदन मी नाहिं, तुझा दास,
तुझ्या प्राप्तीची एक मनीं आस,
नेत्र भुलले पाहूनि रूपरास,
नित्य चित्ताला एक तुझा ध्यास."
" परी आतां येतील घरीं तात,
घ्यावि विश्रांती तोंवरी निवांत,
कसा होइल आमुचा अरी ठार !
नसे चित्ताला दूसरा विचार.
पाणि डोळ्याला काय म्हणुनि आलें ?
नाथ, ऐसें कां खिन्नवदन केलें !

राजकुमरा, होईन चरण दासी,
विजयी ताताना येऊ द्यां घरासी."
"प्राण अरिचे, कां प्रेम तुला प्यार?"
"अरिप्राणाहुनि प्रेम नाहिं प्यार!"
क्षणीं उपसे समशेर धीर वीर
अरिप्राणासह प्रेम करी ठार!
"अरि आमुचे ते कोण?...हाय, नाथ!
वैर सरले जगतांत, मरे प्रीत!
वीरबाला होईन वीरकांता
विरह निमिषाचा सोसवे न आतां."
स्वकुल वैरी, प्रियनाथ तयासंगें
गेलि स्वर्गा बाला, न राहि मागें,
दोन प्रेमी जीवांस मरण देई
प्रेमगड तो परि अझुनि हंसत राही.

१९२२, तोरणमाळ.

---

## विनवणी

सोड, सोड, सुंदरी, नयन बाण हे उरी.
वाटेचा वाटसरू,
उदरंभर, पोटभरू,
येत तुझ्या दरबारीं, करि कृपाच ही तरी!
रूपाचा दीन दास,
जीवाला रूप ध्यास,

रूपसुरी प्राण हरी, उसळतील सुख लहरी !
रूपाला जीव भुले,
चपलेनें मेघ खुले,
रजनी दिवसास वरी ! उंच गिरी रमवि दरी !
हीन दीन मी अती,
जगतीं तूं रूपवती,
स्थिति समान नाहिं जरी, भुलवि प्रेम अंतरीं !
रूपाचा वारकरी !
रूपानें ठार करी,
नयनशरें वार करी, मन हांसे जन्मभरी !

१९२५, धुळें

---

## वीर-वंदन

[ कल्याणच्या सुभेदाराची रोशनआरा शिवाजीला म्हणते. ]

प्रणाम, वीरा, तुला नसे तव गुणांस जगतीं तुला.
तूं महाराष्ट्र भूपती,
चतुरंग तुझें दळ किती,
भुलसि ना यवनयुवतिला, नृपाला प्रणाम वीरा तुला.
तूं मर्द मराठा गडी,
संकटांत घेसी उडी,
वांकडी नजर अवकळा गमे तुज, प्रणाम वीरा तुला.
झुंजार वीर तूं रणीं,
थरथरे तख्त यावनी,

परनार माय परि तुला नृपाला प्रणाम वीरा तुला.
ही गजान्त लक्ष्मी हंसे !
शरिरांत जोम रसरसे !
परदार पिसें बुद्धिला नसे तव गुणांस जगतीं तुला.
तारुण्य खुलवि चारुता,
अनि अगाध परि शांतता,
जिंकील कोण रिपु तुला नृपाला आजिंक्य तूं भूतळा.
ऐकिलें नांव आजवरी,
कल्पना जहाली खरी,
तव कीर्त नसे चंचला दयाळा, प्रणाम वीरा तुला.
आदरें मती रंगली !
कृतज्ञता मुकी जाहली !
दे आशिर्वाद साध्वीला दयाळा प्रणाम वीरा तुला.
१९२७, पुणें.

---

## वीर-वंदन

" करिशिल कां मज गंगापार ? गूहका,
करिशिल गंगापार ? "
" गतजन्मीचें पुण्य उदेलें, पादकमल तव दिसलें,
पावन करि ही जीवननौका,
वंदन तव पदकमलीं.
वीरा, वंदन तव पदकमलीं.
राजकुमर तूं वैभवशाली, बनलासी वनवासी !

सत्यपालना, दुर्जनहनना, वरिसी वैराग्यासी
वीरा, वंदन तव पदकमलीं.
चित्त-दण्डका वनीं माजला काम-दशानन भारी !
भक्ति-मैथिली चोरुनि नेली, राम, विरागी, तारी.
वीरा, वंदन तव पदकमलीं.
कोटिकोटि कंदर्प रूप हें सुकेल भीषण विपिनीं !
कर्तव्याचा पथ दुःखाचा ! रणीं न मंजुळ वाणी !
वीरा, वंदन तव पदकमलीं.
रूपधनाची आस सुटेना संसारीं बाजारीं !
मोहबंधनें तोडुनि, चुकवी चौऱ्यांशींची फेरी,
वीरा, वंदन तव पदकमलीं.
ये, रघुवीरा, परमउदारा, करितों गंगापार
गोड मानुनी घे ही सेवा, करि मजला भवपार, "
वीरा, वंदन तव पदकमलीं.

१९२७, पुणें.

---

## विरह-गीत

अंबराच्या अंगणांत, चांददीप उजळीला,
शोभा चांदणी चौकाला.
सांज खुले, गेला रवी अपरेच्या महालांत.
याल केव्हां घरीं नाथ ?
रात खेळे चांदासंगें, तारा नाचती चौफेर,
धडधडे माझा ऊर !

चांद चुंबी रजनीला, गालीं गुलाब फूलले,
माझें मानस भूकेलें !
नभ कुंजीं खेळताती तारा गोपी, चांद कान्हा,
हुरहूर माझ्या मना !
रासक्रीडा खेळूनीया श्रांत निजे ताराकांत,
जीव हैराण हा होत !
काळ्या अंबरांत मंद वाहतसे वात
दाह माझ्या शरीरांत !
नभ पादपाच्या प्रेमसुमां सुख वास !
पाणी माझ्या नयनांस !
काळ्या अंधारांत प्रीत खेळे लपंडाव !
तुम्हांवरी माझा जीव !
यौवनाच्या मंदिरांत, वाट पाहूं कुठवरी ?
झुरतसे मी अंतरीं.
कुठवरी वाट पाहूं ? नाथा, तळमळे जीव,
अझुनि कां न ये कींव ?
जुन्या गोड आठवणी मना करीती बेजार !
माझ्या नयनाला पूर.
कां हो राया रागावला ? गेला टाकून मजला ?
जीव विरहें गांजला.
मिठ्या मारीती नभाला किति चांदण्या रातींत !
टाका गळ्यामधें हात.

१९२७, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें

## कर्तव्यपथ

पर्णांआडुनि पाहते कुणिकडे मुग्धा मनोमोहिनी ?
मेघाच्या बुरख्यामधून बघते कोणास सौदामिनी ?
कोणा वीररसास ही भुलतसे शृंगारिची कल्पना ?
ऐसा कोण सभाग्य जीव जगतीं मोही सुदें अंगना ?
होता एक विनीत, प्रेमळ युवा प्रासाद सौधावरी
ज्याचा केवळ हस्तस्पर्श खुलवी रम्या लता लाजरी !
होता गुंगत तो सदा सुरुचिरा स्वर्गीय देवीसवें
काव्याच्या लहरींत नित्य उभवी प्रासाद प्रेमें नवे.
दृष्टीला भिडतां तदा नजर ती वाटे तया तत्त्वता
आली रूप धरून सुंदर जगीं त्याची मनोदेवता !
चित्ताला पटली क्षणांत मग ती अन्योन्य भाषा मुकी,
गेली दृष्टि खिळून रम्य रमणी रूपावरी सारखी,
सौंदर्यें भरल्या जगीं, सहृदया तारुण्य प्रीती वरी !
जाळी त्या हृदया कधीं विरह हा ! कर्तव्य मार्गावरी !

१९२७, पुणें.

---

## वंदन

सौधा भूषविती, कुणी खुलविती वातायना कामिनी,
बाला रम्य प्रशांत प्रौढ वनिता, मुग्धा मनोमोहिनी,
सौंदर्यें भरल्या पथीं भटकतां डोळे विलासी किती ?
भोळे जीव किती सुखास हृदयीं आशेवरी टांगिती !

नेत्रांची मधुवृत्ति चंचल कुणा अज्ञात या यौवनीं !
रस्त्यानें पद चालती, मन फिरे नेत्रांसवें गुंगुनीं !
आली दृष्टिपथांत एक रमणी, प्रौढा न जी बालिका,
गेला लाजुनी पूर्णचंद्र बघतां त्या भाग्यशाली मुखा !
श्रीमंती जणुं लोळते तनुवरी, शालीन वृत्ति अती,
नेत्रांची रमणीय दावि सुषमा पावित्र्य पूर्णा मती !
ज्याची ही गृहदेवता न मुळिही भाग्यास त्याच्या मिती !
त्या गेहीं सुखस्वर्ग नित्य असतो तें धन्य, धन्या सती !
नेत्रानें करितां प्रमाद असला संत्रस्त होई मन,
त्याची आज निराकृती म्हणुनिया साध्वी तुला वंदन !

१९२७, पुणें.

---

## आवाहन

श्रीगुरुराया या या, जगा ताराया,
भक्तियुक्त हृदयांस छळी तो काम निर्दळाया,
गुरुवरा या या.
सात्विक जनता मोहीं बुडते हात तिला द्याया,
गुरुवरा या या.
भवचक्राला जिव हा दमला त्यास उद्धराया,
प्रभुवरा या या.
विश्वधर्म तो, विश्वबंधुता जगतीं स्थापाया,
प्रभुवरा या या.
कृष्ण, खिस्त वा बुद्ध कुणीही या या मैत्रेया,
जगा ताराया.

विलया गेला धर्म, मातला कली निर्दळाया,
प्रभुवरा या या.
प्राच्य तारका संघ जाहला उत्सुक वंदाया,
कृष्णजी या या.
पदरक्षा मी तुमची देवा, कुरवंडिन काया,
गुरुवरा या या.
दर्शन दिधलें पूर्वी दासां पटलि न खूण तया,
खूण पटवाया.
पूर्वीचें खळ अजुनि नांदती त्यांना दंडाया,
प्रभुवरा या या.
मनमोहन ते रूप मनोहर भक्तां दावाया,
कृष्णजी या या.
आळविते जग करुणरवानें देवा, या समया,
सत्वरीं या या.

१९२७, अड्यार, मद्रास.

---

## विरहगीत

प्रिय प्राणनाथ गेला, दूर देशाला ध्रु.
वाटत होतें 'खूळ मनाचें' जाइल विलयाला,
नाथ परि गेला.
विद्येस्तव कां टाकुनि जातां भोळ्या जीवाला !
याल कधिं बोला !
मित्र कशाचे वैरी मेले धाडिति नाथाला
दूर देशाला.

परके मोठेपण तें खोटें, घरच्या प्रेमाला,
जीव कां विटला ?
राजस कान्हा खेळायाला अजुनि नाहिं झाला !
नाथ कां गेला ?
अवसर पुरता मुळि न मिळाला, हितगुज करण्याला
नाथ, परि गेला.
दृष्टि लावुनी वाटेवरती जिव भोळा बसला,
हाय ! परि फसला.
संध्या खुलली, रजनी हंसली, परि न जीव फुलला !
नाथ, कां रुसला ?
भवमुरलीला जिव हा भुलला, गुप्त कुठें झाला ?
मुरलिधर काळा.
संसाराची हौस न पुरली तोंच विरह आला
जीव घ्यायाला.
भयाण रातीं, उघड्या शेजेवरि जागा झाला
जीव घाबरला !
पहाट झाली, स्वप्नसंगमा शेवट परि आला !
नाथ, कां गेला ?
संसाराच्या चित्रपटावरि रंग नाहिं भरला,
चितारी रुसला !
तळमळतो हा जीव निशिदिनीं, नाथ कसा गेला
दूर देशाला ?
गृहदेवीहुनि किर्ति गमलि का प्रेमळ नाथाला ?
प्रश्न हा पडला.

मुल्खाची ती उठवळ बिजली कवळी कंठाला !
नाथ भुलवीला.
भोळें माझें दैवत भुललें ! टाकुनि जाइ मला,
विरह तीराला.
विरहाचा हा डोंगर पुढती उठला खायाला
दीन जीवाला.
केशवकुमरा, चित्तचकोरा, विरही जीवाला
ध्यास तव सगळा.

१९२७, पुणें.

---

## ओढणी

ओढुं नको ओढणी, मानिनी, ओढुं नको ओढणी.
झिरझिरीत ही ओढणी,
चमकते आंत चांदणी !
कशि ओढ लागली मनीं, मानिनी, ओढुं नको.
हांसुनी कुणां पाहसी ?
मुरकुनी कुणां लाजसी ?
चमकते बिजलि ही जशी, मृगाक्षी, कुणा न मोहिल अशी ?
नाचरी नयनिं बाहुलि !
गालावरि खेळे खळी !
मुखछबी पाडि मोहिनी, मानिनी, ओढुं नको.
गालावरि लाडिक हंसे,
मुखि मौक्तिक पंक्ती बसे,

नवयौवन हें रसरसें, राजसे, मनास लावी पिसें.
बालिका अशी हांसरी,
नयनांत जणुं भिंगरी !
कचकलाप गालावरी, सुंदरी, रुळति तया आवरी.
ही नजर विखारी खरी,
ही हंसरी मुख माधुरी,
मारील जगाच्या उरी, सुंदरी, सदैव हंसरी सुरी.
१९२७, पुणें.

---

## विधुराचें लग्न

पुन्हां विधुराचें आणि लग्न झालें,
परी बालेचें चित्त झुरुनि मेलें !
थोर झाला आनंद घरीं दारीं,
नवी आली माउली राबणारी !
वरातीचा केवढा थाटमाट,
भरुनी आला बालिका नयन कांठ !
आणि विधुराच्या स्वर्ग करीं आला,
मोद बालेचा स्वर्गवासी झाला !
पुढें झाला सानंद गृहप्रवेश,
बालिकेचें अन् चित्त हो उदास,
अधिर नयनें जणुं विधुर तिला भक्षी !
नेत्र झांकुनि बालिका कुणा लक्षी ?

विधुर संपत्ति सजवि बालिकेला,
गरिब तरुणाचा ध्यास त्या मनाला !
तोंच आवडती हाक कानीं आली
प्राणज्योति मग तिची मग विझुनी गेली !
वीर विधुरा, करिं नवें पुन्हां लग्न
कोण आणूं धजणार तुला विघ्न ?

१९२९, धुळें.

---

## वीर वंदन

सत्ता सुलतानी गांजते,
ज्वाला जुलमाची भडकते,
उसळला प्रभंजन अंबर भेदी जगीं !
झाल्या न्यायाच्या चिंधड्या,
जनता कारागृहिं घे उड्या,
कल्लोळ माजला स्वार्थी जुलुमामुळें.
योगी शांत परि संगरीं,
नाहीं स्वार्थलेश अंतरीं,
सत्यार्थ झगडतो रात्रंदिन भूवरी.
पसरीं तत्त्व अहिंसा जनीं,
नाहीं हिंसा याच्या मनीं,
हा धन्य महात्मा, विश्ववंद्य, बहुगुणी.
वीरा, वंदन तव पदतला
संस्कृति बंधन आमच्या गळा,
तळमळे जीव परि उडि घ्याया संगरीं.

१९३० धुळें.

# अभंग

मन झालेसे व्याकूळ, संसाराचा हा जंजाळ,
वेडी माया मोह लावी, मन चिंतनें झूरवी,
देवा नाहीं मना धीर, माया मोहें नयना नीर,
ऐसा कैसा हा प्रपंच ? मन करी सदा नाच !

✤ ✤ ✤

संकटाची वार्ता आली, चित्तवृत्ती भांबावली,
मन झालेसे उदास, पुरे संसाराचा ध्यास,
परी सुटतां सुटेना, मन परमार्थी रमेना,
देवा करा आतां दया, धीर तरी द्या हृदया.

✤ ✤ ✤

सुख दुःखाचे ते घाव सोसायाची नाहीं हांव,
परी देवा, धैर्य द्यावो, मग जे होइल ते होवो,
द्यावें नाम मुखीं सदा, मनीं प्रेम द्या मुकुंदा,
जीव आला काकुळती, मना होइना उपरती.

✤ ✤ ✤

तुम्हावरी माझा भार, भवार्णवीं करा पार.
आतां जीव कंटाळला, कांहो देवा, रागावला ?
तुझ्या चरणांचा दास, मांडिला कां सत्यनाश ?
तुमच्या चरणांची प्रीती आणि संसारीं ही रती !
कांहीं साधेना जगतीं, हळहळ वाटे चित्तीं.

✤ ✤ ✤

कोण सोडवील ऐसीये संकटीं, जगजेठीं तुम्हा वांचूनिया ?
किती काकुळती येऊं आतां देवा, धांवा, रमाधवा हात द्याया.

परनारी दिसे, मन होई पिसें, मनोरथ मीपें भोगूनीया
राजवैभवाला वेडे लाचावलें, कल्पीयेले मेले मनोरथ !
माझे मनोरथ सत्य होतील कां ? रुक्मिणी नायका सांगा मज.

✤ ✤ ✤

आला जीवाचा कंटाळा, स्वार्थ परमार्थ मेला,
नाहीं वैभव हातांत, परमार्थ गोते खात,
कांचनाची मना भूल, विषयांचें जीवा खूळ,
शेजे सुंदर बाईल, देह समूळ खाईल,
केव्हां सार्थक होईल ? मना हीच तळमळ.

१९३०, धुळें.

✤ ✤ ✤

हृदयाची मोठी आस मेली, जीव हो उदास.
अहो देवा, नको ज्ञान, घडो कांहीं आचरण,
आला ज्ञानाचा या वीट, दिसे आचरणाची वाट,
बोल बोल ते विपूल, चित्तीं संसाराचा मळ,
मायामोह आवरेना, मन सुखाला सोडीना.
सूख देहाला मिळेना मनोरथ विरमेना.
ऐशीं जगीं कुचंबणा कां हो करितां नारायणा ?

✤ ✤ ✤

दास विनवी जगजेठी, द्यावी आतां झणीं भेटी,
संसाराची यातायात, करितां बुडे परमार्थ.
मोह पटल विरेना, आस मनिंची जिरेना.
आतां धांवा नारायणा, कां हो येईना करुणा,
विनवितों रात्रंदिन झणीं दावा हो चरण.

१९३०, धुळें.

परमार्थी तळमळ, कांहीं न चले येथें बळ,
देवा, धांवा गुरुराया, आवरा संसाराची माया,
किती करूं विनवणी, अहो धांवा चक्रपाणी.

* * * *

अहो देवराया, बापा, करुणाकरा, दीन या पामरा उद्धरावें,
कामिनीकांचन भुतें ही जबर, पाठीसी गबर लागताती !
भूतबाधा झाली, देव सेवा मेली, परमार्थाची होळी झाली आतां.
भूतें मारा, तारा, दीन या रंकासी, जीव कासाविसी किती सांगू ?
सुखाच्या वैभवा जीव हा भुलला, परमार्थ गेला रसातळा,
परमार्थाची आंस, संसाराचा ध्यास, झाला सर्व नाश, आयुष्याचा.
संसाराची हौस, पुरली नाहीं देवा, परमार्थाचा ठेवा कोण करी ?
मन सुखापाठीं धांवतसे रोज, परमार्थाचें काज काय आम्हां !

कामिनीचें ध्यान क्षणोक्षणीं मना, संसारीं कांचना बहुमान.
कीर्ति नको-लोकीं, तोंडाची ती वाफ ! जिरे आपोआप मेल्यावरी !
आदर, सन्मान, वरीवरी सोंगें, मत्सराच्या रोगें जग भागें.
कोण जाणें काय होईल शेवटीं, संसाराची मिठी सुटेचिना !

१९२९, धुळे.

# सती

पुढती भिक्षुकगण चालला,
रडतो मागुनि अबला मेळा,
वाजती नगारे, मंगल वाद्यें किती !
पातली दीन बिचारी सती,
चितेवरि जरठ तिचा तो पती,
तरवार परजुनी सैनिक ते भोंवती !
धडाडे दाहक भेसुर चिता,
भिक्षुक उधळिती मंत्राक्षता !
कळवळुनि ओरडे बाला, जन ऐकती !
लोटली आंत तिला शेवटीं,
म्हणती ' धन्य धन्य ही सती ' !
चरकली मनीं निरपराध बाला अती.
गेली करपुनि कोमल काया
सद्गति जरठ पतीला द्याया !
डोळ्यांत आसवें थरारवी ही सती.

१९३०, धुळें.

## बंदी

कारागार द्वार उघडलें,
बंदी उत्सुक मनिं जाहले,
बालका घेउनि आली कुणि माउली.
पाहुनि पतिचा कारावेष,
सतिचें मानस होय उदास.
भडभडून आलें हृदय सतीचें अती.
घाली बाळ गळ्याला मिठी
पडल्या वहुत दिसांनीं गांठी
शब्दही फुटेना पतिपत्नींच्या ओठीं.
चुंबी राजबंदि बालका,
"चला, ना आज तरी घरिं काका"
पतिवदनावरती नजर सतीची खिळली.
हृद्गत मूक नजर बोलली,
हृदयीं दंपति बहु गंहिवरली,
चिमुकल्या करांची मिठी गळ्याला पडली.
रक्षक फत्तर हृदयीं परि ते,
टाकिति हलुच पुसुनि अश्रूंतें,
पाहुनी चित्र पतिपत्नीच्या भेटिचें.
ठरला अवधी संपुनि गेला,
सोडि न बालक परि बंदीला,
डोळ्यांत आंसवें तरारली साध्विच्या !

१९३०, धुळें

# हुतात्मा

उघडा पडला चांदणि चौक !
अंबर आंगणिं हाकाहाक,
चांदण्या पळाल्या अभ्रें आलीं म्हणून !
सुटला भीषण झंझावात,
झाली सगळी वाताहात,
थराथरा कांपती तारा मेघा बघून !
गेला चांद बिजेचा विझून,
नाहीं चाहुल रविची अझून,
लुकलुके तरी ही शुक्रचांदणी मधून.
खाया उठली भेसुर रजनी,
चांदणी एक दिसेना गगनीं,
भयभीत मेदिनी होय नभाला बघून !
आला पूर वरुनि वाहत,
रजनी दुःखाश्रू ढाळित,
वसुधेस न्हाणिलें जलदें जल शिंपडन.
गेला मळ पायाचा धुवून,
पाही देव कसोटी कसून,
फटफटित उजाडे, हांसत आला अरुण.

✣ ✣ ✣

परके दुष्ट मेघ ग्रासिती,
तारा– हिंद भूमिच्या सती,
निजधर्म रक्षिती वीर हुतात्मे मरून !

### भाव-भेट

हत्याकांड परी संपलें,
कडवे धर्मवीर खवळले,
उगवला रवी, परधर्मतमाला गिळून !

१९३१, धुळें.

---

## मदिरा

करि दानव मानवास मदिरा,
संसाराची करिते होळी,
शीला जाळी, क्षणांत मदिरा,
एकच प्याला, ने नरकाला,
सुधाकराला, ऐशी मदिरा,
संजिवनीला, ब्राह्मण मुकला,
सुरा प्रतापें, दारुण मदिरा.

१९३२, सातारा

---

## शुद्धि संघटन

संघटणा शुद्धि मंत्रा जपुनि भुतें गाडलीं.
संघटणा करुनि गुंडां माती बळें चारिली.
बघुनि सूर्य श्रद्धानंदा, घूक कुळें मेलीं.
धर्मभास्करानें गोमांतकीं शुद्धि केली.
धर्मवीर मुंजे मलबारांत होय वाली.
शुद्ध नौबदीनें निद्रा हिदभूाच नली.
करुनि संघटण हिंदूचें, जरब दाखविली.

१९३२, सातारा.

## धर्ममार्तंड

धर्ममार्तंड, पोटास्तव करिती बंड !
पुराण म्हणजे यांचा वेद !
यास वावडा नवमत वाद !
मृतस्मृतींची घालिती साद,
सर्व थोतांड, पोटास्तव करिती बंड.
दान दक्षिणा म्हणजे धर्म !
विधवा वपनीं वाढे धर्म,
पुनर्विवाहीं होत अधर्म !
असे पाखंड, पोटास्तव करिती बंड.
जातिभेद धर्माचा पाया,
अस्पृश्यांची यास न माया
सुधारकांना उठती खाया,
असे हे भोन्ड, पोटास्तव करिती बंड.

-१९३२ सातारा

---

## वीर-वंदन

नाहीं ओळख देख कांहिं अथवा नातें न गोतें मुळीं,
नाट्याचार्य, पदावरी सविनया अर्पी प्रणामाञ्जली.
भाषा सुंदर, पाणिदार, रुचिरा मानी विचाराऽवली,
बुद्धी गाढ, प्रगल्भ, वृत्ति करडी स्वार्थी न जी रावली !

गेले देउनि लोकमान्य असिवत् हें देशसेवा व्रत,
कीर्ति सारुनि दूर, द्रव्यहि तसे, तें पाळिलें संतत.
नाहीं शस्त्र कधीं वृथा उचलिले दैवी महात्म्यावरी,
नाहीं मंचक पण्डितापरि कधीं गेला विधी मंडळीं.
आत्मप्रौढि तुम्हां कधीं न शिवली निंदा परांची अहा !
झाला केसरि सुत, तोंच ऊगवे मानी नवा काळ हा.
तो संचालक शब्दशूर, परि हा मौनीच संपादक !
भाटांनीं स्तविला घनास्तव बहू साहित्यसम्राट् तो !
सत्कारोत्सव गाजवी बहुपरी साहित्य-रत्नाकर !
कृष्णा, धांवत कीर्ति मागुनि तुझ्या, सेवा तुझी सुंदर.
१९३२, मुंबई.

---

# भालतिलक

चारुतेची लाट उसळे,
भूषणांचा डौल डोले !
मधुमास उत्सवीं युवयुवतींच्या मोदाला ये पूर.
भाग्यशाली थोर युवती,
कुंकुमातें देति घेति,
परि जीव एकटा दीन अभागी बैसे अंधारीं.
रुचिरकाया भूषवाया;
यौवनाची फार माया,
त्या गोड स्वभावा जोड हाय ! परि त्या कमूनशिबाचीं

जीवनानाचा साद्यकारी,
रूपश्रीचा तो मुरारी,
तिज टाकुनि गेला निष्ठुर पुढती कुठल्या कामाला ?
सौख्य कुठलें गतधवांना ?
अशुभ मानी जग तयाना !

✤ ✤ ✤

साजिरी ये गोड बाला,
कुंकुमातें लावि भाला !
मग पुसे तियेला ‘ तिलक कुठें तव भालाचा ?’
कंठ आला हाय ! भरुनी
अश्रुपूरें अवनि न्हाणी !
आणूनि तिला देईल कुणि कां भालतिलक आतां ?
१९१६, धुळें

---

# दिग्विजय यात्रा

भाविक, प्रेमळ हरिजन दूर,
नास्तिक, मग्रुर स्पृश्यहि थोर !
मंदिर प्रवेशीं धर्म बुडाला हाय !
होतां हिंदू जो जन्मानें,
झाला म्लेंच्छ, ख्रिस्त, कर्मानें,
परि स्पृश्य वाटतो धर्मभ्रष्ट तो भाई !

हरिजन धर्मप्रेमि अस्पृश्य !
हरिजन धार्मिक तरि तो निंद्य,
हा धर्म कशाचा ? त्याची केवळ थट्टा !
हरिजन मंदिरिं आले, बुडला
यांचा धर्म; लयाला गेला,
अन् देव विटाळे ! झाला हाः हाः कार !
बुडतां धर्म तारण्यासाठीं
मंदिर शुद्ध राखण्यासाठीं
दिग्विजयी यात्रा पहा निघाली मोठी !
' व्यक्ती मर्त्य, सनातन धर्म,
आम्हां ज्ञात श्रुति-स्मृति-मर्म,
प्रायोपवेशनें भिणार नाहीं आम्ही !
हरिजन नकोत आम्हां जवळी,
येऊं न देउं तया राउळी,
धर्मांतर केलें तरी न आम्हां खंत,
पंडित, शास्त्रि धर्ममार्तंड,
बाकी सर्व लोक पाखंड,
करि धर्मांचा उद्धार दिग्विजय यात्रा !

१९३२, सातारा.

---

## टीकाकारांस—

तुझ्या सेवेला रानफुलें माझीं,
भेट म्हणुनी धाडिलीं, सख्या, ताजीं.
देई फेंकुनि, चुरगाळुनी मजेनें,
पदीं किंवा तुडवी तया सुखानें !
तुला वाहियलीं हेंच समाधान,
मनुज कृति कां निर्दोष असे पूर्ण ?
कलावंता, दिसतील जरी दोष,
वृथा स्तुतिची मुळि नाहीं मना हौस !

१९३२, पुणें.

REFBK-0004713
REFBK-0004713
8093